




गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर


**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शनिवार, ६ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:९५ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

# पर्यायी रस्त्याचा अभाव, थेट पोलिसी दबाव
## एमएसआयडीसीच्या कामावर शेतकऱ्यांचा संताप

**रत्नाकर पाटील। महासागर**

**अलिबाग,** एमएसआयडीसीच्या कार्ले खिंड - थळ - वायशेत रस्त्याच्या काँक्रिटीकरणाच्या कामावरून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. एमएसआयडीसी (महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ) कडून रस्त्याचे काम सुरु असताना, शेतकऱ्यांच्या शेतात जाण्यासाठी कोणताही पर्यायी मार्ग किंवा रस्ता ठेवण्यात आलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांची दररोजची शेती, घरकुल, जनावरांचे व्यवस्थापन या सर्व आधारभूत आर्थिक व सामाजिक

> ही गंभीर समस्या केवळ एका गावापुरती मर्यादित नसून, राज्यभरातील विकासकामांमध्ये स्थानिक शेतकरी व मालकांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केल्यास असंतोषाचा भडका उडू शकतो, हे या प्रकरणावरून स्पष्ट होते. न्याय, संवाद, आणि न्याय्य विकास हे कोणत्याही नागरी भागातील आणि ग्रामीण भागातील लोकशाही व्यवस्थेचे खरे अधिष्ठान आहे, हे लक्षात ठेवणं आवश्यक आहे.
>
> **संजय सावंत,**
> **सामाजिक कार्यकर्ते**



प्रश्नांवर मोठे संकट निर्माण झाले आहे. अलिबाग येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना शेतकऱ्यांचे निवेदन ईमेलद्वारे पाठवून त्यांच्याशी दूरध्वनीद्वारे याबाबत चर्चा केली आहे.

दरम्यान, शेतकरी सीताराम शामराव कवळे यांनी एमएसआयडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना लिहिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, त्यांनी व इतर शेतकऱ्यांनी वारंवार ठेकेदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे पर्यायी रस्त्याची मागणी केली. मात्र, याकडे दुर्लक्ष झाले. उलटपक्षी, विनंती करणाऱ्या शेतकऱ्यांची नावे थेट पोलिसांकडे देण्यात आली. शेतकऱ्यांना पोलीस ठाण्यात बोलविण्यात येऊन समज देण्यात आली. त्यामुळे ठेकेदाराकडून शेतकऱ्यांवर पोलिसी दबाव आणण्याचा आरोप करण्यात आला आहे.

**शेतकरी हक्कांवर घाला**

कार्ले खिंड - थळ - परहूर परिसरातील शेतजमिनी शेतकऱ्यांचा एकमेव आधार असून, या रस्त्याखालचा प्रश्न आता शेतीच्या भवितव्याशी थेट जोडला गेला आहे. रस्ता पूर्णपणे काँक्रिटचा झाल्यानंतर घर, शेत, जनावरांचे गोठे अशा ठिकाणी जाण्याचा कोणताही मार्ग शिल्लक न ठेवता काम सुरू ठेवण्यात आल्याने शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यात, शेतकरी प्रतिनिधींशी प्रत्यक्ष बैठक घेण्याची विनंतीही करण्यात आली होती. मात्र, ठेकेदारानी कोणतीही संवेदनशीलता न दाखवता, सर्व विनंत्यांकडे सपशेल दुर्लक्ष केले.

**शेतकरी आक्रमक, संघर्षाची तयारी**

शेतकऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर त्वरित पर्यायी मार्ग दिला गेला नाही, तसेच पोलिसांचा दबाव थांबवला नाही, तर पुढे शासन, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, सार्वजनिक बांधकाम खाते व सर्व संबंधित यंत्रणांच्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. या प्रकरणाची दखल न घेतल्यास, न्यायालयीन प्रक्रियेकडेही वळण्याचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक पातळीवर ग्रामसभा बोलवण्याची, सर्व शेतकऱ्यांची एकजूट होत आंदोलनासाठी मैदानात उतरण्याची जोरदार मागणी सुरू झाली आहे.

**शेतकऱ्यांच्या मागण्या**

परहूर तलाठी कार्यालयाजवळ शेताकडे जाण्यासाठी रस्ता/मार्ग त्वरित उपलब्ध करावा. शेतकऱ्यांवर आणला जाणारा दबाव तातडीने थांबवावा. ठेकेदार व अधिकारी यांनी शेतकऱ्यांची प्रत्यक्ष बैठक घेऊन समस्या सोडवावी. शेतकऱ्यांची उपजीविका, शेती व हक्क यांना धक्का न पोहोचवता रस्त्याचं काम पारदर्शक व न्याय्यतेने मार्गी लावावे.

# लायन्स क्लब कोलाडच्या वतीने आंबेवाडी, वरसगाव, येथे मोफत नेत्र,मधुमेह,तपासणी शिबीर संपन्न

**संतोष सातपुते। महासागर**

**रोहा,** सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळ आंबेवाडी वरसगाव नाका व लायन्स क्लब कोलाड यांचे संयुक्त विद्यमाने तसेच लायन्स हेल्थ फाऊंडेशन चोंढी अलिबाग यांच्या विशेष सहकार्यातून डॉ. गांधी नर्सिंग होम कोलाड, तसेच सामाजिक बांधिलकी जपत ३ सप्टेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी, मोफत मधुमेह तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर सार्वजनिक श्री गणेश उत्सव मंडपात आयोजित करण्यात आले होते. याला येथील रुग्णांनी उत्सपूर्त प्रतिसाद देत या शिबिराचा लाभ घेत श्री गणरायाचे दर्शन घेतले.



यावेळी लायन्स क्लब कोलाड चे अध्यक्ष ॲड.रविंद्र लोखंडे,उपाध्यक्ष डॉ.श्याम भाऊ लोखंडे, लायन विठ्ठल सावळे, दिलीप मोहिते, लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग येथील तपासनीस आलेले डॉक्टर डॉ.हिताली परब, निलेश म्हात्रे, श्रावणी मासुरकर, सुजित पाटील, लॅब पॅथॉलॉजी अश्विनी जांभळे, योगिता बारस्कर, आंबेवाडी नाक्यावरील सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत लोखंडे, गणेश शिंदे,उत्सव मंडळाचे अध्यक्ष ओम वाचकवडे, कुमार लोखंडे,गणेश वाचकवडे, महेश वाचकवडे,महेंद्र वाचकवडे, शैलेश सानप, सतीश बने, प्रफुल बेटकर, मंगेश मारणे,सह आदी सार्वजनिक श्री गणेश उत्सव मंडळ आंबेवाडी वरसगाव नाका मंडळाचे सर्व पदाधिकारी तसेच लायन्स क्लबचे पदाधिकारी आणि तपासणीसाठी आलेले रुग्ण बहुसंख्येने उपस्थित होते.

तर सदरच्या आयोजित शिबिरामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अश्रू ग्रंथी (लासूर) या नेत्र विकारावर मोफत उपचार व मोती बिंदू नेत्र तपासणी शस्त्रक्रिया तिरळेपणा या नेत्र विकारावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया, त्याच बरोबर मोफत मधुमेह तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया संदर्भात एकूण शंभरहून अधिक रुग्णांच्या नेत्रांची तपासणी केली तर पाच रुग्णांवर मिळणार नवी दृष्टी त्यांच्यावर होणार मोफत शस्त्रक्रिया तसेच प्रसंगी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

# बाप्पा जाताच गावांचा 'आनंद' हरपला
# घरादारांना लागली कुलूपे

**श्रीकांत नांदगावकर। महासागर**

**तळा,** गेले पंधरा दिवस घराघरात जणू चैतन्यच निर्माण झाले होते. गणेशोत्सवानिमित्त अवघ्या तळा तालुक्यातील खेडी माणसांनी फुलून गेली होती. बंद दरवाजे सताड उघडे रहात होते. माणसांची वर्दळ या घरातून त्या घरात सुरु राहिली होती. गोडाधोडाच्या पदार्थांचे मधूर सुवास अवघ्या गल्लीत पसरत होता. विसर्जनानंतर करण्यात आलेल्या चमचमीत मटण रस्स्याचा सुवासही असाच भूक चाळविणारा ठरत होता. हजारो चाकरमान्यांमुळे बंद असणारी घरेही बोलकी वाटत होती. पण विसर्जन होताच हीच बोलकी घरे अबोल झाली आणि पुन्हा एकदा या घरांना टाळे लागले.

अशी स्थिती तळा तालुक्यातील प्रत्येक गावागावात झाली आहे.तळा तालुक्यात सण-उत्सवात ग्रामीण भाग ते शहरात गणेशोत्सव व होळी उत्सवासाठी चाकरमानी मोठ्याप्रमाणात गावाकडे येत असतात त्यातच गणेशोत्सव हा सर्वात मोठा सण व उत्सव मोठ्याप्रमाणात साजरा केला जातो. या गणेशोत्सवात



गावागावात चाकरमानी मंडळी आपल्या कुटुंबासह गावात आली होती. सारा गाव माणसांनी फुलून गेला होता. सर्वघरे प्रकाशमय झाली होती. सर्वांच्या आनंदाला भरते आल्याचे एक आगळेवेगळे आनंदीमय चित्र पहावयास मिळत होते. सर्व घरे जणू काही आनंदाने बोलकी झाली होती.

शेजारी पाजारी मोठ्या आनंदाने एकमेकांकडे जाऊन आनंदाने विचार व्यक्त करताना दिसत होती. साऱ्या गावात कोठे ढोलकीचा आवाज तर कोठे भजनाचा आवाज, तर कोठे बाल्या नाच, तर कोठे सत्कार समारंभ, तर कोठे गावविकासाठी सभा, तर कोठे गावचा विकास आराखडा नियोजन असे विविध कार्यक्रमांचे आयोजन होत होते. साऱ्यागावात माणसांची रेलचेल होती मात्र आता गणेशोत्सव संपला आणि चाकरमानी मंडळी पुन्हा आपल्या कामावर रूजू होण्यासाठी मुंबई पुणेकडे परतीच्या प्रवासाला लागून गावे रिकामी झाली. फुललेल्या गावात आता शुकशुकाट पहावयास मिळत आहे.आता राहीली ती फक्त वयोवृद्ध माणसे व अनेक बंद घरे आता गावांतील येणारा आवाज, सर्व काही शांत झाला आहे. हिच माणसे येथे राहीली तर. परंतु येथे राहण्याच्या दृष्टीने एखादा उद्योगधंदा, व्यवसाय असायला पाहिजे, हाताला काम मिळायला पाहिजे तरच राहता येईल या साऱ्याचा विचार करता तळा तालुक्यात कोणतातरी उद्योगधंदा अथवा कारखाना होणे आवश्यक आहे. उद्योगधंदे येथे निर्माण झाले

# समाजसेवक जमीर भाई देशमुख यांच्या संकल्पनेतून गणेश भक्तांसाठी साकारला आरती संग्रह

**निलेश लोखंडे । महासागर**

**महाड,** महाड तालुक्यातील थोर समाजसेवक जमीर भाई देशमुख यांनी एक अगली वेगळी मुंबईहून येणाऱ्या गणेश भक्तांच्या सेवेसाठी साकारला एक आरती संग्रह जमीर भाई देशमुख यांच्या या आरती संग्रहाचे कौतुक सर्व महाड तालुक्यातील गणेश भक्तांनी खूप कौतुक केले आहे जमीर भाई यांची ही अगदी वेगळी समाजसेवा संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये चर्चेचा विषय झाला आहे जमीर भाई देशमुख हे महाड तालुक्यातील प्रत्येक गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी तत्पर होऊन जात असतात ते खाडीपट्ट्यातील एक थोर समाजसेवक म्हणून परिचित आहेत त्यांच्या या आगळ्यावेगळ्या आरती संग्रहाबद्दल सर्व सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील




मान्यवरांनी त्यांचे खूप कौतुक केले आहे जमीर भाईंनी साकारलेल्या आरती संग्रह अत्यंत सोप्या आणि चांगल्या भाषेमध्ये वाचण्याजोगे आहे जमीर भाईंच्या या कार्याबद्दल सर्व खडेपट्ट्यातील जनतेने व गणेश भक्ताने त्यांचे खूप खूप कौतुक केले आहे



दिघीसागरी पोलीस ठाणे बोर्लीपंचतन येथील गणपती बाप्पाचे दर्शन दिवेआगर सरपंच सिध्धेश कोजबे यांनी घेतलै त्या वेळी कोजबे यांचा पोलीसांनी श्री फळ व शाल देउन सन्मान केला, दिघी सागरी पोली ठाणे चा हा कार्यक्रम कौतुकास्पद च आहे. (छाया उदय वि,कळस)

# शिवसेनेतर्फे मराठा बांधवांना पुलाव व पाण्याचे वाटप

**दत्ता कुलकर्णी । महासागर**

**पनवेल,** शिवसेना पक्षप्रमुख यांच्या आदेशाने मुंबई परळगांव शाखा क्र.२०४ च्या महिला शाखा संघटिका सौ कांचन घाणेकर आणि शिवसैनिक यांनी मोठ्या प्रमाणात मराठा बांधवांना मदत केले विशेष म्हणजे सूचना दिल्यानंतर संध्याकाळी जवळजवळ दीडशे ते दोनशे लोकांचे जेवण्याची व्यवस्था व पुलाव वाटप आणि पाणी



आझाद मैदानाला घेऊन गेले यासाठी त्यावेळी श्री चंद्रकांत मोजड श्री रोहित पाटेकर व श्री दिगंबर पाटील यांनी खूप मेहनत करून मराठा बांधवांना मदत केली.

# अनुजा गोगरने पटकाविले रौप्यपदक

**संजय करडे । महासागर**

**मुरुड,** महाराष्ट्र राज्य अॅथलेटिक्स असोसिएशन ने राज्यस्तरीय अॅथलेटिक स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धांमध्ये जिल्हा स्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या, महाराष्ट्र राज्यातील विविध भागातील स्पर्धक सहभागी झाले होते. या राज्यस्तरीय स्पर्धेत जिंदाल माध्यमिक विद्यालय साळाव ता. मुरूड येथे शिकणारी अनुजा रेखा देवानंद गोगर या विद्यार्थिनीने स्पर्धेत सहभागी झाली होती. या राज्यस्तरीय भालाफेक स्पर्धेत अनुजाने दुसरा क्रमांक मिळवून रौप्य पदकावर आपले नाव कोरले. या भरीव यशाबद्दल अलिबाग मुरूड चे आमदार महेंद्र दळवी यांनी तिचे कौतूक केले.



तसेच तालुक्याचे गटविकास अधिकारी राजेंद्र खताळ आणि गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, जिंदाल माध्यमिक विद्यालय साळावचे मुख्याध्यापक मुकेश ठाकूर,उप मुख्याध्यापक मंगेश बामनोटे सर यांनी शिक्षण विभागातर्फे अभिनंदन केले. अनुजाच्या या यशाबद्दल कोर्लई ग्रामस्थ तसेच शाळेच्या शिक्षकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



माणगाव तालुक्यातील न्हावे गावचे सुपुत्र श्री परेश विठोबा अंधेरे यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन करताना शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चालके, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, शिवसेना संपर्कप्रमुख प्रताप घोसाळकर, विभाग प्रमुख रविंद्र टेंबे शुभेच्छा देताना (छायाचित्रे राम सिताराम भोस्तेकर माणगाव)



रायगड जिल्ह्यात रोहा शहरातील अष्टमी भागातील मराठा आळीतून ढोल ताशांच्या गजरात निघणारा हा एकमेव गौरा आहे. त्या नंतर गौरा महाराज मराठा आळीतील गजानन चव्हाण यांच्या घरी पिढ्यानपिढ्या विराजमान होत आहे. गौरी गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी गौराची मूर्ती तयार करतात. पेंड्यापासून बनविलेल्या गौऱ्याची मूर्तीला कपडे व मुखवटा लावून लाकडी खुर्चीत बसवुन संपूर्ण अष्टमी मध्ये घरोघरी नेण्यात येतो व सर्व घरोघरी आरती व नवस केले जातात

# "शेल इंडिया" ने अभय योजनेअंतर्गत शास्तीच्या रकमेत मिळवली तब्बल 95 लाख इतकी सूट...

**दत्ता कुलकर्णी । महासागर**

**पनवेल,** पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दिनांक 15 सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट राहणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्तांधारकांबरोबरच तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मालमत्ताधारकांना अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील मालमत्ताधारकांनी अभय योजनेचा लाभ घेण्यास सरुवात केली असून, यामध्ये शेल इंडिया मार्केट्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने आपला



> पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

मालमत्ता कर भरून तब्बल 95 लाख रूपयांची शास्ती वाचवली आहे.

पनवेल महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणार मालमत्ता कर हा कायदेशीर असल्याची जाणीव झाल्याने आता अनेक कंपन्यांनी अभय योजनेचा मार्ग स्वीकारून कर भरण्याचा पर्याय निवडत असल्याचे दिसून येत आहे.

"अभय योजना" ही कंपन्यांसाठी एक सुवर्ण संधी असून सर्व मालमत्ता कर एकरकमी भरल्यास शास्ती च्या रकमेत ९० टक्के म्हणजे मोठ्या प्रमाणात सूट मिळत आहे. त्यामुळे तळोजा

> **ऑनलाईन पध्दतीने कर कसा भरावा :**
> 1. प्ले स्टोअर मध्ये जाऊन पीएमसी टॅक्स ॲप किंवा पनवेल कनेक्ट ॲप डाऊनलोड करावे.
> 2. ॲप डाऊनलोड झाल्यावर आपल्याला विचारलेली योग्य ती माहिती भरावी.
> 3. आपला मालमत्ता टॅक्स पावती क्रमांक अचूक टाकावा.
> 4. त्यानंतर खाली मालमत्ता कराचे विवरण दिसेल.
> 5. विवरण योग्य असल्यास Pay या ऑप्शनवर क्लिक करावे.
> 6. त्यानंतर आपण क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, यूपीआय, क्यू आर, कोड यांचा वापर करून मालमत्ता कर भरू शकता.
> 7. कर भरून झाल्यावर आपली पावती योग्य ती सांभाळावी.

औद्योगिक वसाहतीमधील इतर मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेच्या वतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त 2 टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील 2 टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.



गणेशोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठनेते वाय.टी. देशमुख, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत यांनी मिडलक्लास हौसिंग सोसायटी, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, कळंबोली तसेच ठिकठिकाणी विराजमान झालेल्या गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. (छाया: दत्ता कुलकर्णी)

गणपती बाप्पा मोरया
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

शनिवार, ६ सप्टेंबर २०२५

किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## मुंबई गोवा महामार्गावर अपघात, एक ठार, पाच जण जखमी

**रत्नागिरी, दि. ५ प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. मुंबईहून कणकवलीच्या दिशेने जाणारी महिंद्राची मेराझो कार अचानक थेट ट्रकच्या खाली घुसली आणि त्यामुळं हा भीषण अपघात झाला आहे. अपघातानंतर लगेचच पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून, जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. मुंबई–गोवा महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे पुन्हा एकदा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विविध कारणांनी या महामार्गावर अपघात होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अशा अपघातात अनेकांचा मृत्यू देखील झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. दरम्यान, आज अपघातात एकाचा मृत्यूझाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे.

**अग्राग्रलेख**

## खरीखरी

## परमपूज्य दादा, स. न. वि. वि.

आदरणीय दादा प्रत्येक वादा निभावण्यात जगभरात त्यांची ख्याती आहे. पण ही ख्याती आता मातीत मिसळते की काय अशी भीती आम्हाला वाटत आहे. दादा बोलतील तो वज्रआवाज, दादांनी आश्वासन दिले म्हणजे वज्रलेख, दादा म्हणजे एक घाव दोन तुकडे पण आता आपले सरळ सरळ दादा वाकड्या मार्गाने का जात आहेत, हा प्रश्न आहे. दादांनी म्हटले येणार म्हणजे दादा येणार, पण आज दादांनाही आपला शब्द फिरवावा लागला त्यामुळे त्यांच्या बिचाऱ्या कार्यकर्त्यांना अगदी जिवाभावाने दादांच्या दरबारात आपली व्यथा मांडण्याची जी संधी मिळाली होती ती हुकली. परंतु दादांनी आपल्या गणेश दर्शन दौऱ्याचा कार्यक्रम रद्द करून दौऱ्याचा सगळा सातबारा कोरा केल्यामुळे जिकडे तिकडे चोहीकडे, चर्चेवर चर्चाच घडे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. काका शरद पवार यांच्या छत्रछायेतून बाहेर पडल्यावर दादा आपली दादागिरी विसरलेत की काय, असे प्रश्न आम्हा मानवांच्या समोर उभे राहिलेले आहेत. दादा म्हणजे आपले आधार कार्ड आहे असे केवळ सामान्य जनांनाच वाटत नाही, तर ज्यांच्याजवळ पॅन कार्ड आहे त्यांनाही तसे वाटते. आपल्या या नावलौकिकाची तमा बाळगणे हा या पवारांचा प्लस पॉइंट होता. तावा तावात येऊन काहीतरी बोलणे आणि राजधानीत जाऊन विसरणे हा दादांचा स्वभाव नाही. म्हणूनच दादांच्या शब्दाला भाव आहे आणि शब्द पाळण्याच्या बाबतीत दादांचे नाव आहे. यामुळेच आज सर्वत्र दादांच्या अचानक थांबलेल्या चाकांची चर्चा होत आहे. दादांनी आपल्या प्रियजनांना असे अनाथ सोडण्याचे कारण काय, हा प्रश्न आता दादाप्रेमी लोकांच्या चर्चेचा मोठाच विषय बनलेला आहे. आजच्या राजकारणात बोललेले शब्द पाळणे यापेक्षा ते शब्द गाळणे, हाच बहुतेक राजकारणी लोकांचा धंदा असतो. पण दादांचे तसे नाही त्यामुळे दादांचे सच्चे मित्र असलेल्या त्यांच्या कार्यकर्त्यांना दादांचे न येणे हा हृदयभंगासारखा धक्का वाटतो. आपले दादा येतील, काहीतरी करतील आणि आपले जीवन बदलेल अशा आशेवर असलेल्या कार्यकर्त्यांची दादांच्या अचानक न येण्याने पार निराशा झालेली आहे. त्यामुळे दादांनी यापुढे तरी आपण दिलेला शब्द पाळावा, अशी त्यांना नम्र सूचना आहे.

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# माझा उद्देश कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये हस्तक्षेप करण्याचा नव्हता

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी अखेर व्हायरल व्हिडिओवर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सोलापूर जिल्ह्याच्या कुर्डू गावात बेकायदा मुरुम उपशावरील कारवाई थांबविण्यासाठी गावातील काहींनी थेट अजित पवारांना फोन केला होता. त्यावेळी, अजित पवारांनी त्याठिकाणी असलेल्या आयपीएस महिला अधिकारी अंजली कृष्णा यांना फोनवरुन कारवाई थांबविण्याचे आदेश दिले होते. तसेच, आपकी इतनी डेरिंग असे म्हणत दादागिरीचीही भाषा केली होती. त्यामुळे, कर्तव्यदक्ष आणि रोखठोक असलेल्या अजित पवारांवर सर्वच स्तरातून टीका होऊ लागली. महिला पोलीस अधिकाऱ्याचा असा अवमान योग्य नसल्याचंही अनेकांनी म्हटलं. आता, अजित पवारांनी या व्हायरल व्हिडिओवर आपली प्रतिक्रिया दिली आहे.**

सोलापूर जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांसोबतच्या संवादाच्या संदर्भात काही व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित होत आहेत. मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, माझा उद्देश कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये हस्तक्षेप करण्याचा नव्हता, तर त्या ठिकाणी परिस्थिती शांत रहावी आणि ती अधिक बिघडू नये याची काळजी घेण्याचा होता. आपल्या पोलीस दलाबद्दल तसेच धैर्यानं आणि



प्रामाणिकपणे आपलं कर्तव्य बजावणाऱ्या महिला अधिकाऱ्यांबद्दल मला सर्वोच्च आदर आहे. माझ्यासाठी कायद्याचं राज्य हेच सर्वात महत्त्वाचं आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. तसेच, मी पारदर्शक प्रशासकीय कारभारासाठी आणि बेकायदेशीर वाळू, माती, खडक उपशासह प्रत्येक बेकायदेशीर कृतीवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करण्यासाठी कटिबद्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या घटनेवरुन विरोधकांनी ट्विट करुन अजित पवारांना लक्ष्य केलं होतं, तर खासदार संजय राऊतांनी अजित पवारांची शिस्त आता कुठ गेली, असा सवाल उपस्थित केला होता. अखेर, सर्वच स्तरातून टीका होऊ लागल्याने अजित पवारांनी एक्सवर पोस्ट करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

गावातील मुरुम उचलण्याच्या मुद्यावरुन कुर्डू गावातील नागरीक आणि अंजली कृष्णा यांच्यामध्ये शाब्दिक जुगलबंदी रंगली. यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबा जगताप या कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोन लावून अंजली कृष्णा यांच्या हातात दिला. मात्र, त्यांना अजित पवारांचा आवाज ओळखता आला नाही. तिकडून अजित पवार दोनदा सांगताना दिसले की डीसीएम अजित पवार बोल रहा हूँ. ये कार्यवाही बंद करो...मेरा आदेश है.. त्यावर कृष्णा म्हणतात मेरे फोन पर कॉल करें.. त्यावर पवार म्हणताहेत.. की तुम पे ॲक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी.. मेरा चेहरा तो पेहचानोगी ना.. असे अजित पवार रागवेलल्या सुरात बोलले. त्यानंतर, अजित पवारांनी व्हिडीओ कॉल केला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाला असून अजित पवारांनी आता स्पष्टीकरण देत महिला पोलीस अधिकाऱ्याची पाठराखण केली आहे.

## अजित पवारांचे स्पष्टीकरण

## विरोधकांचा जोरदार हल्ला

काँग्रेसचे आमदार नाना पटोले म्हणाले, "अजित पवारांसारख्या वरिष्ठ नेत्यांनी महिला अधिकाऱ्यावर फोनवरून दादागिरी करणं ही राज्यासाठी लाजिरवाणी बाब आहे. अधिकारी नियमाप्रमाणे कारवाई करत असताना नेत्यांनी हस्तक्षेप करणं म्हणजे भ्रष्टाचाराचं थेट समर्थन." महाराष्ट्र काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात म्हणाले, "अधिकाऱ्यांना घाबरवून कारवाई थांबवायची, हा प्रकार लोकशाहीला काळा डाग आहे. मुख्यमंत्री यावर स्पष्ट भूमिका घ्यावी." मनसे नेते संदीप देशपांडे यांनी ट्विट करून विचारलं, "महाराष्ट्र अजूनही कायद्याने चालतो की अजूनही नेत्यांच्या फोनकॉलने?"

**अंजली दमानिया आणि समाजसेवींचा रोष**

भ्रष्टाचारविरोधी कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी थेट पवारांवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या, "अधिकाऱ्यांवर दबाव आणणे हा सत्तेचा उघड गैरवापर आहे. जर कारवाई चुकीची असेल तर कायदेशीर मार्ग आहेत, पण धमकावणे हा लोकशाहीचा अपमान आहे."

महिला सुरक्षा मंचच्या अध्यक्षा वंदना चव्हाण यांनी म्हटले, "महिला आयपीएस अधिकाऱ्याशी अशा प्रकारे वागणे धक्कादायक आहे. यामुळे महिला अधिकाऱ्यांच्या स्वाभिमानाचा प्रश्न निर्माण होतो."

'लोकशाही संरक्षण अभियान'ने तातडीने चौकशीची मागणी केली असून, 'भ्रष्टाचारविरोधी समिती'ने राज्यपालांकडे तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

**महाजन आणि राऊत यांची टीका**

भाजप नेते प्रकाश महाजन यांनी या घटनेवर प्रतिक्रिया देताना म्हटले, "अजित पवार नेहमी सत्तेचा वापर करून अशा प्रकारचे हस्तक्षेप करतात. कायदा मोडून अशा पद्धतीने अधिकाऱ्यांना थांबवणे म्हणजे गुन्हेगारांना पाठीशी घालण्यासारखे आहे."


तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) नेते संजय राऊत म्हणाले, "महिला अधिकाऱ्यांशी अशा प्रकारे बोलणे शोभादायक नाही. अजित पवार उपमुख्यमंत्री आहेत, पण त्यांचा सूर पाहता ते लोकशाहीला न जुमानता राजेशाहीसारखी वागणूक देत आहेत. हा प्रकार महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेला धक्का देणारा आहे."

# मी आणि देवेंद्रजी सत्तेचे ताम्रपट घेऊन आलो नाही- भुजबळ

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

राज्य सरकारने उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर मराठा आरक्षणाच्या मागण्या मान्य करत हैदराबाद गॅझेटियरचा जीआर जारी केला आहे. त्यानुसार, मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यातील मराठा समाजाला याचा फायदा होणार असून सातार गॅझेटियरचा देखील जीआर काढला जाणार आहे. त्यामुळे, ओबीसी समाज आक्रमक झाला असून ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्या नेतृत्वात विविध ठिकाणी आंदोलने सुरू आहेत. विशेष म्हणजे, छगन भुजबळ यांनी स्पष्ट शब्दात आपली नाराजी व्यक्त केली असून या निर्णयाचे दूरगामी परिणाम होणार असल्याचे त्यांनी म्हटले. मुख्यमंत्र्यांनी मला आश्वास्त केलंय, पण मी आणि देवेंद्र हे सत्तेचं ताम्रपट घेऊन आलो नाहीत, असे म्हणत भुजबळांनी भविष्यातील चिंता व्यक्त केली आहे. एबीपी माझाच्या कार्यकारी संपादक सरिता कौशिक यांनी छगन भुजबळ यांची मुलाखत घेतली. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणावर भाष्य केलंय.

मी मुख्यमंत्र्यांना हे दाखवलं, उतरंड, वंशावळप्रमाणे कागद पुढे केला. हैदराबाद गॅझेटियरच्या खाली आता हे आलंय असं मी म्हटलं. त्यावर, मुख्यमंत्री फडणवीसांनी मला आश्वस्त केलंय, पण मी आणि देवेंद्रजी सत्तेचं ताम्रपट घेऊन जन्माला आलो नाहीत. हे आळवावरचं पाणी आहे, मंत्रिपद आणि हे, उद्या १० वर्षांनी दुसरं कोणी येईल. पण, हे डॉक्युमेंट तर तसंच राहतात ना, असे म्हणत छगन भुजबळ यांनी भविष्यात या जीआरच्या आधारे ओबीसीवर अन्याय होऊ शकते, असे संकेत दिले आहेत. तसेच, एका तासामध्ये दोन-दोन जीआर निघाले. त्याच्यावर महाराष्ट्र



शासनाच्या सचिवांची सही देखील आहे. पहिल्या जीआरवर मराठा समाजाच्या 'पात्र' व्यक्तींना म्हटले. जरांगेंनी ऑब्जेक्शन घेतले अन् पात्र शब्द काढायला सांगितला. त्यानंतर दुसरा जीआर काढला. त्यात पात्र शब्द काढला गेला. जर चुकीचं होत असेल तर मी कसं काय गप्प राहू शकतो? मी माझे मत मांडणार, असा इशारा राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा ज्येष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी राज्य सरकारला दिला आहे.

मराठा आरक्षणाबाबत मंत्री छगन भुजबळ यांचे काही प्रश्न असतील तर मी स्वतः त्यांची भेट घेईल अस जलसंपदा मंत्री आणि मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियर लागू करत आरक्षण दिलं आहे. त्यामुळे ओबीसीमध्ये घुसखोरी झाल्याच मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं. त्यावर विखे पाटील यांनी, छगन भुजबळांना भेटून स्पष्टीकरण देईल असं म्हटलं आहे. मराठा अरक्षणातील हैदराबाद गॅझेटियरच्या जीआर बाबतीत मंत्री छगन भुजबळ यांनी आपण कोर्टात आव्हान देणार असल्याचे म्हटले. त्यावर, भुजबळ असं काही करतील अस वाटत नाही, या जीआरबाबत भुजबळ यांच्या मानतील संभ्रम दूर करू, ओबीसी आरक्षणाबाबत मराठा समाजाने देखील कधी विरोध केला नाही, असेही राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे.



विघ्नहर्ता कॉलनी मित्रमंडळ.. चिंचपाडा कल्याण पूर्व एंजल हायस्कूल शेजारी वर्ष ११ वे... अध्यक्ष.. विष्णू पाटील

## आम्ही रशियाकडून तेल खरेदी करत राहू- केंद्रीय अर्थमंत्री


**नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था**

रशियाकडून तेल खरेदीवरुन भारतावर अमेरिकेचा दबाव वाढला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ वाढवला आहे. दरम्यान, आता केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शुक्रवारी एक मोठे विधान केले आहे. भारत रशियन तेल खरेदी करत राहील. देश त्यांच्या ऊर्जेच्या गरजा आणि हितसंबंधांवर आधारित निर्णय घेईल, असे अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे. 'भारत रशियन तेल खरेदी करत राहील. आपल्याला आपल्या गरजांनुसार तेल कुठून खरेदी करायचे हे ठरवावे लागेल. हा आमचा निर्णय असेल, असे सीतारमण यांनी एका मुलाखतीत सांगितले. मोठ्या प्रमाणात शुल्क असूनही, भारत अमेरिकेच्या दबावाखाली येणार नाही, असेच या विधानावरून दिसत आहे.

# आम्ही भारत आणि रशियाला गमावले- ट्रम्प

**वॉशिंग्टन, दि. ५ वृत्तसंस्था**

गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानमध्ये आपला कौटुंबिक व्यवसाय वाढविण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात टेरिफ वॉर सुरू केले होते. याचा परिणाम असा झाला की जगातील तीन महाशक्ती एकत्र आल्या आहेत. भारत, रशिया आणि चीन यांच्यात नुकतीच मोठी बैठक पार पडली. यावरून आता डोनाल्ड ट्रम्प यांना भीती वाटू लागली आहे. भारत आणि रशियाबाबत ट्रम्प यांनी एक मोठे वक्तव्य केले आहे.



अमेरिकेने भारत आणि रशिया यांना चीनमुळे गमावले असे वाटत असल्याचे ट्रम्प म्हणाले आहेत. आपण भारत आणि रशियाला चीनच्या सर्वात खोल आणि अंधाऱ्या छावणीत गमावले आहे. आशा आहे की त्यांचे संबंध दीर्घ आणि समृद्ध राहतील, अशी पोस्ट त्यांनी त्यांचा सोशल मीडिया ट्रूथवर केली आहे. सोबत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचा फोटो पोस्ट केला आहे.

शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) शिखर परिषदेसाठी हे तिन्ही नेते नुकतेच भेटले होते. आता रशिया, चीन आणि भारत एकत्र येत असल्याने अमेरिकेच्या चिंतेत वाढ झाल्याचे ट्रम्प यांच्या या वक्तव्यावरून स्पष्ट दिसू लागले आहे. भारत गेल्या काही काळापासून रशियाकडून कच्चे तेल खरेदी करत आहे. अख्खा युरोपही रशियाकडून आपली गरज भागवत आहे. परंतू, ट्रम्प यांना भारत डोळ्यात खुपत आहे. यामुळेच त्यांनी भारतावर २५ टक्के टेरिफ लावताना दंड म्हणून आणखी २५ टक्के टेरिफ लादले आहे. सोबतच भारत-पाकिस्तानमध्ये सुरु झालेले युद्ध देखील मीच थांबविल्याच्या टिमक्या मारत आहेत. अमेरिकेला आता या गोष्टींचे परिणाम भोगण्याची वेळ आलेली आहे.

## अभ्यासकांनी उचलली शंका
## जरांगे म्हणाले – आमचा हक्क पक्का

**छ.संभाजीनगर, दि. ५ प्रतिनिधी**

राज्यात आरक्षणाचा मुद्दा पुन्हा तापला आहे. सरकारी निर्णय, न्यायालयीन वळणं आणि त्यावर होणारे वाद या सगळ्यांच्या केंद्रस्थानी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील आल्याचे चित्र आहे.

सरकारने जारी केलेल्या जीआरनंतर राज्यभरात चर्चांचा भडिमार सुरू आहे. कुणी याला कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाही, असं म्हणतंय; तर कुणी याला ऐतिहासिक पाऊल ठरवतंय. अभ्यासकांच्या मतमतांतरे, राजकीय नेत्यांच्या भूमिका आणि समाजातील वेगवेगळ्या घटकांची नाराजी हे सर्व वातावरण अधिकच तापवतंय.

या पार्श्वभूमीवर जरांगे पाटील यांनी आपल्या खास शैलीत प्रत्युत्तर दिलं. त्यांनी स्पष्ट शब्दांत म्हटलं, "जीआर निघाल्यावर अभ्यासक निघू लागले. आम्ही आरक्षण टप्याटप्प्यात मिळवलं. सरकारी नोंदीनुसार आरक्षण मिळणारच आहे. कोर्टात जावा, काहीही होत नाही. आमचा हक्क आम्ही मिळवला."

जरांगे पाटलांच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा हालचाली सुरू झाल्या आहेत. विरोधकांनी यावर आक्षेप घेतला असला तरी मराठा समाजात मात्र त्यांच्या वक्तव्याने नवीन जोश निर्माण झाल्याचं दिसतंय.

आगामी काळात हा जीआर आणि त्यावरचा न्यायालयीन पेच काय वळण घेतो, याकडे राज्यभराचे डोळे लागले आहेत. मात्र जरांगे पाटलांची ठाम भूमिका ही आंदोलनाला नवं वळण देणार, हे निश्चित मानलं जातं.

# मुंबई पोलिसांना ३४ गाड्यांमध्ये मानवी बॉम्ब असल्याची धमकी

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

मुंबईत अनंत चतुर्दशीच्या तोंडावर अचानक उडालेल्या एका मेसेजने संपूर्ण पोलिस यंत्रणा सतर्क झाली आहे. वाहतूक विभागाच्या अधिकृत व्हॉट्सॲप नंबरवर आलेल्या या संदेशात जी माहिती देण्यात आली, तिने थरकाप उडवला आहे.

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, या संदेशात थेट मोठ्या बॉम्बस्फोटाचा इशारा देण्यात आला आहे. "३४ वाहनांमध्ये स्फोटके ठेवली असून, ४०० किलो आरडीएक्समुळे तब्बल एक कोटी लोक मृत्युमुखी पडतील," असा थरकाप उडवणारा मजकूर या मेसेजमध्ये आहे. एवढंच नव्हे, तर धमकी देणाऱ्यांनी या स्फोटाचा वेळ अनंत चतुर्दशीपूर्वीच ठरवला असल्याचंही नमूद केलं आहे.

या मेसेजनंतर पोलिस दल सतर्क झालं आहे. उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची आपत्कालीन बैठक घेण्यात आली असून, गुन्हे शाखा आणि सायबर सेल या प्रकरणाची कसून चौकशी करत आहेत. विशेष म्हणजे, वाहनांचा उल्लेख असल्यामुळे मुंबईतील गर्दीच्या ठिकाणी आणि विसर्जन मार्गांवर अतिरिक्त पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

दरम्यान, या धमकीच्या संदेशामुळे शहरात तणावाचे वातावरण पसरले असले तरी पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आणि सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. संदेशाचा स्त्रोत शोधण्यासाठी तांत्रिक तपासणी सुरू असून, पोलिसांनी याला अत्यंत गांभीर्याने घेतलं आहे.

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर मिळालेली ही धमकी मुंबईकरांच्या मनात काळजी वाढवणारी असली तरी पोलिसांचा दावा आहे की शहर सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व पावले उचलली जात आहेत.

# बारामतीत लक्ष्मण हाकेंची शरद पवारांवर टीका

**बारामती, दि. ५ प्रतिनिधी**

सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्यासह राज्यातील मराठा आरक्षण आंदोलकांच्या मागण्या मान्य केल्याने ओबीसी समाज नाराज झाला आहे. तसेच यावरुन ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. मंत्री छगन भुजबळ यांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. अशातच ओबीसी नेते लक्ष्मण हाके हे देखील आक्रमक झाले आहेत. आज त्यानी बारामतीत ओबीसींचा मोर्चा काढत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर टीका केली आहे. शरद पवार यांनी मनोज जरांगे पाटील यांना उभं केलं आहे. शरद पवार यांनी मनोज जरांगे नावाचं भूत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवल्याची टीका हाकेंनी केली.

दरम्यान, ज्यावेळी लक्ष्मण हाके यांचे भाषण सुरु होते, त्यावेळी त्यांना वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांचा फोन आला. आंबेडकरांनी फोनवरुन उपस्थित जनतेशी संवाद साधला. जबरदस्ती दिलेलं आरक्षण आहे, आपल्याला रस्त्यावर उतरावं लागेल असे आंबेडकर म्हणाले.



लक्ष्मण हाके यांनी बारामतीत आज शरद पवार यांच्यासह अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. शरद पवार मतं आमची घेतात आणि जरांगेंना पाठिंबा देतात असेही हाके म्हणाले. मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला अस जर कोणी म्हटलं तर त्याचं कानफाड फोडा अशी टीका देखील हाके यांनी केली. देशभरात मंडल आयोग लागू झाला होता, फक्त महाराष्ट्रातच लागू झाला नव्हता. मंडल आयोगाची चळवळ शेकापचे दि बा पाटील, बबनरावजी ढाकणे, शिवाजीभाऊ शेंडगे, गोपीनाथ मुंडे, छगन भुजबळ, अरुण कांबळे, बाळासाहेब आंबेडकर या सगळ्या माणसांनी मंडल आयोग लागू केल्याचे हाके म्हणाले.

कुटुंबाच्या बाहेर कारखाने जाऊ न देणारे, कुटुंबाच्या बाहेर आमदारकी खासदारकी न जाऊ देणारे, असे म्हणत हाकेंनी शरद पवार यांच्यावर टीका केली. ४०० संस्थाचे अध्यक्ष शरद पवार आहेत. रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष हा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री राहिल असा नियम होता, मात्र त्यामध्ये खाडाखोड केली आणि शरद पवार अध्यक्ष झाले. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष शरद पवार झाल्याचे हाके म्हणाले.

# ६० कोटींच्या फ्रॉडप्रकरणी शिल्पा शेट्टीसह राज कुंद्राविरूद्ध लूक आऊट नोटीस जारी

**मुंबई, दि. ५ प्रतिनिधी**

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांच्याविरूद्ध मुंबई पोलिसांनी लूक आऊट सर्क्युलर जारी केलं आहे. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रावर जवळपास ६० कोटी रूपयांचा फ्रॉड केल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा फ्रॉड त्यांच्या बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड या आता अस्तित्वात नसलेल्या कंपनीत गुंतवणूक डील संदर्भातील आहे.

मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील सूत्रांनी सांगितले की पोलीस राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टी यांच्या प्रवासाबाबत तपास करत आहे. याचबरोबर कंपनीच्या ऑडिटरला देखील चौकशीसाठी बोलावण्यात आलं होतं.



दरम्यान, व्यावसायिक दीपक कोठारी यांनी राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीवर गंभीर आरोप केले आहेत. या जोडप्यानं २०१५ ते २०२३ या दरम्यान त्यांच्याकडून जवळपास ६० कोटी रूपये घेतले. त्यांनी हे पैसे आपला व्यवसाय विस्तारण्यासाठी घेतले होते. मात्र या जोडप्यानं हे सर्व पैसे आपल्या वैयक्तिक खर्चासाठी वापरले असा दावा दीपक कोठारी यांनी केला आहे. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांनी हे पैसे कर्जाच्या स्वरूपात घेतले होते. मात्र त्यांनी नंतर हे पैसे कर वाचवण्यासाठी गुंतवणूक म्हणून दाखवले.

कोठारी यांच्या मते या दोघांनी त्यांना घेतलेले पैसे ठराविक मुदतीत १२ टक्के व्याजानं परत देण्याचं आश्वासन दिलं होतं. शिल्पा शेट्टीनं २०१६ मध्ये यासाठी लिखीत वैयक्तिक गॅरेंटी दिली होती. मात्र काही महिन्यात शिल्पा शेट्टीनं संचालक पदाचा राजीनामा दिला. कोठारी यांनी सांगितलं की कंपनीने १.२८ कोटी रूपये थकवले होते हे त्यांना नंतर कळलं. याची माहिती त्यांना आधी देण्यात आली नव्हती.

# ॥ अष्टविनायक दर्शन ॥

मोरगावचा श्री मयुरेश्वर, सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक, पालीचा श्री बल्लाळेश्वर, महाडचा श्री वरदविनायक, थेऊरचा श्री चिंतामणी, लेण्याद्रीचा श्री गिरीजात्मज, ओझरचा श्री विघ्नेश्वर, आणि रांजणगावचा श्री महागणपती असे अष्टविनायक महाराष्ट्रात आहेत. अशी परंपरा आहे की अष्टविनायकयात्रा ही मोरगाव येथील मोरेश्वर मंदिरापासून सुरु केली जाते. सगळ्या मंदिरांचे दर्शन झाल्यानंतर पुन्हा मोरगाव येथे दर्शन करून ही यात्रा संपन्न होते. साधारणपणे अष्टविनायक यात्रेचा असा क्रम असतो. अष्टविनायक मंदिरांबद्दल माहितीआपण जाणून घेऊ या.


**मोरगावचा मयुरेश्वर**– अष्टविनायकांमध्ये सगळ्यात पहिले मंदिर आहे मोरेश्वर.मयुरेश्वर. अष्टविनायक यात्रेची सुरुवात येथूनच होते. मोरेश्वरदेवस्थान पुण्यापासून ५५ किलोमीटर लांब आहे. मंदिरात जाणारा रस्ता उत्तम आहे. मंदिर ५० फुट उंचीचे असून अत्यंत सुंदर आहे. मंदिराच्या चारही दिशांना जाण्यासाठी द्वार आहेत पण मुख्य द्वार उत्तरमुखी आहे. मंदिराच्या आवारात दोन उंच दीपस्तंभ आहेत. मंदिराच्या बरोबर समोर एक मोठी मूषक प्रतिमा आहे. तसेच मंदिराच्या बाहेर गणेश प्रतिमेच्या सम्मुख एक काळ्या पाषाणातील मोठा नंदी आहे.विशेष गोष्ट म्हणजे नंदीची,तो सामान्यतः शंकराच्या देवळासमोर असतो. गणपतीची सुखकर्ता दुखहर्ता ही आरती समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली असे म्हटले जाते. मंदिरात दिवसातून तीन वेळा सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता, आणि संध्याकाळी ८ वाजता पूजा-अर्चा केली जाते. विशेष पर्वकाळात गणेश जयंती (माघ शुक्ल चतुर्थी), गणेश चतुर्थी (भाद्रपद शुक्ल चतुर्थी), सोमवती अमावस्या आणि विजयादशमी सणांना येथे उत्सव साजरा केला जातो.



विशेष
**दिलीप देशपांडे**
जामनेर, जिल्हा जळगाव
८९९९५६६९१७

**सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक**– सिद्धिविनायक किंवा सिद्धटेक गाव अहमदनगर जिल्ह्यात्तील कर्जत तालुक्यात आहे. हे मंदिर अष्टविनायक यात्रेतील दुसरे मंदिर आहे. याला सिद्धिविनायक या नावाने संबोधिले जाते कारण येथे भगवान विष्णू यांना सिद्धी प्राप्त झाली होती. अशी ही मान्यता आहे की भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा म्हणून या गणपतीला सिद्धिविनायक म्हंटले जाते. सिद्धिविनायक मंदिर पुण्यापासून २०० किलोमीटर अंतरावर भीमा नदी च्या काठी आहे. हे मंदिर एका छोट्या टेकडीवर आहे जिला सिद्धटेक म्हंटले जाते. भाविक गणपतीला प्रसन्न करण्यासाठी या टेकडीला सात प्रदक्षिणा करतात. मंदिरातील मूर्ती तीन फुट उंचीची असून उजव्या सोंडेची मूर्ती असलेले अष्टविनायकांतील हे एकमात्र मंदिर आहे. हे या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. १८व्या शतकात देवी अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार करून सध्याचे मंदिर उभारले. मंदिर परिसरात असलेल्या इतर वास्तू विविध लोकांनी नंतरच्या काळात उभारल्या. हे उत्तराभिमुखी मंदिर काळ्या पाषाणातील आहे. मंदिराचे गर्भगृह १० फुट रुंद आणि १५ फुट उंच आहे. मंदिरात साजरे होणारे मुख्य उत्सव आहेत- भाद्रपदातील गणेश चतुर्थी आणि माघ महिन्यातील गणेश जयंती.

**पालीचा श्री बल्लाळेश्वर**– बल्लाळेश्वर देवस्थान महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात सुधागड तालुक्यात आहे. रोहा या ठिकाणाहून २८ किलोमीटर अंतरावर आहे. हे मंदिर अंबा नदी आणि प्रसिद्ध सरसगड किल्ल्याच्या मध्ये स्थित आहे. पुण्यापासून बल्लाळेश्वर मंदिराचे अंतर २०० किलोमीटर आहे. मूळ लाकडी मंदिराचा जीर्णोद्धार करून १७८० साली सध्याचे दगडी मंदिर बांधण्यात आले. हे मंदिर पूर्वाभिमुख आहे आणि त्याची बांधणी अश्या प्रकारे केली आहे की सूर्योदयाच्या वेळी गणपतीच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात. मंदिराच्या आवारात एक विशाल घंटा आहे. ही घंटा पहिले बाजीराव यांचे धाकटे बंधू चिमाजी अप्पा यांनी पोर्तुगीजांवर विजय मिळवल्यानंतर अर्पण केली होती. मंदिरात साजरे होणारे दोन मुख्य उत्सव आहेत भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी आणि माघ महिन्यातील गणेश जयंती. या दरम्यान धार्मिक उत्सवांची रेलचेल असते.



**महडचा श्री वरदविनायक**– वरदविनायक मंदिरातील मूर्ती देखील स्वयंभू अर्थात आपोआप निर्माण झालेली आहे. ही मूर्ती १६९० साली मंदिराजवळील तळ्यात सापडली होती. स्थापन केलेल्या जागेवर सुभेदार रामजी महावेव बिवलकर यांनी १७२५ साली मंदिराची उभारणी केली. मंदिरातील मूर्ती पूर्वाभिमुख आहे. या मंदिराच्या चारही दिशांना चार हत्तींची स्थापना केली आहे. या मंदिरात १८९२ पासून अखंडदीप प्रज्ज्वलित आहे. जगभरातून भाविक वरदविनायकाच्या दर्शनाला येतात. या मंदिरात भाविकांना गर्भगृहात जावून पूजा-अर्चा करण्याची परवानगी आहे. वरदविनायक महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात खालापूर तालुक्यातील महाड येथे आहे.

**थेऊरचा श्री चिंतामणी**– पुण्यापासून २५ किलोमीटर अंतरावर थेउर येथे श्री चिंतामणी देवस्थान अष्टविनायकांतील सर्वात मोठे आणि प्रसिद्ध देवस्थान आहे. हे मंदिर फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. सध्या असलेले मंदिर हे मोरया गोसावी यांनी बांधले. थोरले माधवराव पेशवे चिंतामणी गणेशाचे अनन्य भक्त होते. ते या मंदिरात नेहमी दर्शनाला येत असत. आपल्या अंतकाळी त्यांनी या मंदिरातच वास्तव्य केले होते आणि येथेच त्यांचे निधन झाले. हे मंदिर अतिशय विशाल असून दगडी बांधणीचे आहे. मंदिराच्या आवारात थोरले माधवराव यांनी लाकडी सभामंडप बांधले. मूर्तीच्या नेत्रांमध्ये हिरे आहेत. चिंतामणी देवस्थानात तीन उत्सव मुख्य आहेत. त्यापैकी पहिले म्हणजे भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी. या काळात येथे जत्रा भरते. माघ महिन्यात भगवान गणेशाचा जन्मदिनी गणेश जयंती साजरी केली जाते. कार्तिक महिन्याच्या अष्टमी ला थोरले माधवराव आणि सती रमाबाई यांच्या स्मरणार्थ रमा-माधव पुण्योत्सव साजरा केला जातो.

**लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज**– गिरिजात्मज मंदिर लेण्याद्री या नावाने देखील ओळखले जाते. हे मंदिर पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात गणेश लेण्यांमध्ये स्थित आहे. पुण्यापासून या मंदिराचे अंतर ९५ किलोमीटर आहे. या लेण्यांमध्ये एकूण ३० गुंफा आहेत. गिरिजात्मजमंदिर हे ७व्या गुंफेत स्थित आहे. या गुंफा सपाटीपासून १०० फुट उंचीवर आहेत. हे मंदिर अंदाजे १७०० वर्षे जुने आहे. भाविकांना गणपतीच्या दर्शनासाठी ३०० पायऱ्या चढाव्या लागतात. हे मंदिर शिल्प आणि स्थापत्याच्या दृष्टीने विलक्षण आहे. हे अतिशय साधे आणि प्राकृतिक असे आहे. भाद्रपद आणि माघ महिन्यात मंदिरात उत्सव साजरा केला जातो. त्याशिवाय दर महिन्याच्या चतुर्थीला मंदिर शृंगारिले जाते आणि विशेष पूजा-अर्चा केली जाते.

**ओझरचा श्री विघ्नेश्वर**– ओझर येथील विघ्नेश्वर देवस्थान पुण्यापासून ८५ किलोमीटर अंतरावर आहे. पुणे-नाशिक रस्त्यावर पुणे जिल्ह्यातील जुनार तालुक्यात कुकडी नदीच्या काठी हे मंदिर आहे. पहिले बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजी अप्पांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि मंदिराच्या कळसाला सोन्याने मढविले. मंदिराच्या पूर्ण परिसराच्या चहुबाजूला भिंत आहे आणि एक विशाल प्रवेशद्वार आहे. मंदिराच्या आवारात दोन उंच दीपस्तंभ आहेत. गणेशाची मुख्य मूर्ती पूर्वाभिमुख आहे. श्रींच्या मस्तकावर आणि बेंबीत हिरा आणि डोळ्यांमध्ये माणके जडविली आहेत. विघ्नेश्वर देवस्थानात भाद्रपद आणि माघ महिन्यात उत्सव साजरा केला जातो. प्रत्येक महिन्याच्या चतुर्थीला उत्सव आणि विशेष पूजा-अर्चा केली जाते. कार्तिक पौर्णिमेला दोन्ही दीपस्तंभ शेकडो दिव्यांनी उजळले जातात.

**रांजणगावचा श्री महागणपती**– पुणे-नगर महामार्गावर पुण्यापासून ५० किलोमीटर अंतरावर रांजणगाव येथे श्री महागणपती देवस्थान आहे. सध्या असलेले मन्दिर पेशव्यांनी बांधले. या पूर्वाभिमुख मंदिराला सुंदर आणि भव्य प्रवेशद्वार आहे. मंदिराची बांधणी अशा प्रकारे केली आहे कि दक्षिणायनाच्या काळात सूर्योदयाच्या वेळी श्रींच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात. श्रीमहागणपती मंदिरात चार मुख्य उत्सव होतात. भाद्रपद चतुर्थी, माघ चतुर्थी, श्रावण महिना आणि फाल्गुन महिना. या शिवाय प्रत्येक महिन्याच्या चतुर्थीला विशेष पूजा-अर्चा केली जाते.

हे आठ गणपती महाराष्ट्रात आणि जगभरात अष्टविनायक या नावाने ओळखले जातात. अष्टविनायक यात्रा करण्यासाठी पुणे हे उत्तम ठिकाण आहे. पुण्याहून बऱ्याच खाजगी कंपन्या दोन किंवा तीन दिवसात या सर्व मंदिराची यात्रा घडवतात. तसेच नाशिक वरून दर संकष्टी चतुर्थीला यात्रेचे आयोजन केले असते. आता तर महाराष्ट्रातून बऱ्याच ठिकाणी अष्टविनायक यात्रेचे आयोजन केलेले असते. तरीपण गणेशोत्सवाच्या काळात अष्टविनायक दर्शन घेण्यासाठी भाविकांची खूप गर्दी असते. अजूनही राजुरचा गणपती-जालना, कळंबचा गणपती-यवतमाळ, पद्मालय गणपती-जळगाव, टिटवाळा गणपती-ठाणे, टेकडी गणपती-नागपूर,जिल्ह्यातील प्रसिद्ध ठिकाण आहेत.

## महत्त्वाचे

### होरायझन अकॅडमीत 'आरोग्यदायी, संतुलित आहार' विषयावर मार्गदर्शन

**सिन्नर ।** होरायझन अकॅडमी, सिन्नर येथे विद्यार्थ्यांमध्ये पोषण आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी 'आरोग्यदायी



आहार व संतुलित आहार' या विषयावर एक माहितीपूर्ण सत्र आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात आहारतज्ञ मोक्षा काळदाते उपस्थित होत्या. त्यांनी पोषणाचे महत्त्व, संतुलित आहाराचे फायदे आणि निरोगी जीवनशैली कशी अंगीकारावी याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी जंक फूडचे दुष्परिणाम स्पष्ट करून विद्यार्थ्यांना त्यांच्या रोजच्या आहारात ताज्या फळभाज्या, फळे व पाण्याचा समावेश करण्याचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर काळदाते यांचे सत्र पार पडले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून संवाद साधला. शेवटी शपल्लवी गुजराथी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी मुख्याध्यापक नितीश नायर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्यासाठी योग्य आहार व जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शिक्षणप्रद आणि प्रेरणादायी ठरला. सत्राच्या माध्यमातून किशोरवयीन विद्यार्थ्यांना योग्य पोषणाचे महत्त्व समजले आणि त्यांनी निरोगी सवयी अंगीकारण्याचा संकल्प केला.

### वाघ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कबड्डी स्पर्धेसाठी निवड

**नाशिक ।** रा.स. वाघ माध्यमिक विद्यालय, सोनजांब येथील १४ वर्षाआतील मुले व मुलींच्या संघांनी तालुकास्तरावर कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विशेष यश संपादन केले आहे. या यशामुळे दोन्ही संघाची निवड नाशिक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी झाली आहे. या यशामागे विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.पी. ढेपले यांचे मार्गदर्शन तसेच क्रीडाशिक्षक डी.इ.




गुंबाडे यांचे क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षण व परिश्रम महत्त्वाचे ठरले. खेळाडूंनी शिस्त, मेहनत व संघभावनेच्या जोरावर ही उत्तुंग कामगिरी केली आहे. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवाजी बस्ते, उपाध्यक्ष कैलास जाधव, सरपंच प्रभाकर जाधव, शिक्षक सोनवणे, कराटे, आहेर, जाधव, गुंबाडे, भोकनळ, वडगुले यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### मराठा समाजाचा ऐतिहासिक विजय

**नाशिक ।** गेल्या कित्येक वर्षापासूनच्या मराठा समाजाच्या लढ्याला यश आले आहे. गेल्या पाच दिवसापासून आझाद मैदान येथे मराठा आरक्षणासह विविध मागण्यासाठी मनोज जरांगे पाटील हे उपोषण बसले होते. राज्य सरकारने मंगळवारी ८ पैकी ६ मागण्या मान्य केल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारचे अभिनंदन व्यक्त होत आहे. आझाद मैदान येथे गुलाल उधळत आनंद उत्सव साजरा करण्यात आला. डॉ. विलास पांगारकर, सतीश पाटील, ॲड. मिलिंद दोंदे, अतुल पांगारकर, विजय नन्नावरे आदींसह नाशिक येथून आलेले शेकडो मराठा समाज बांधव उपस्थित होते.

# त्र्यंबकेश्वर तालुक्यात रानभाज्यांचा महोत्सव





## बोरमाळ पेसा ग्रामसभेचा प्रेरणादायी उपक्रम

**हरसूल ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील डोंगर-दऱ्यांनी वेढलेल्या आदिवासी पट्ट्यातील देवडोंगरी पैकी बोरमाळ येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही रानभाज्यांचा महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. बोरमाळ गावाची पेसा ग्रामसभा अंतर्गत सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती आणि इकोनेट संस्थेच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवाला तालुक्यातील मान्यवर, ग्रामस्थ आणि महिला वर्ग यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रानभाज्या आहारातून हळूहळू नामशेष होत चालल्या आहेत. मात्र बोरमाळ येथील ग्रामस्थांनी या परंपरेला जिवंत ठेवण्यासाठी रानभाज्यांचा महोत्सव परंपरा जपण्याचा प्रयत्न यशस्वीपणे सुरू ठेवला आहे. यंदाच्या महोत्सवातही विविध दुर्मिळ रानभाज्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते.

महोत्सवाची सुरुवात पारंपरिक तारपा वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणुकीने झाली. विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून वातावरण भारावून टाकले. या रानभाज्या कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक गटविकास अधिकारी हेमंत बच्छाव यांनी रानभाज्यांचे आयुर्वेदिक गुणधर्म व आरोग्यदायी फायदे यांची माहिती दिली. वामन खोसकर, भाजपा हरसुल मंडलाध्यक्ष जयराम भुसारे, वनरक्षक प्रकाश चौधरी, सरपंच व माजी पदाधिकारी यांनी रानभाज्यांचे संवर्धनाचा संदेश देत जंगल संरक्षण, पेसा कायद्याची अंमलबजावणी, महिला सक्षमीकरण यावर ग्रामस्थांना मोलाचे मार्गदर्शन केले. महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांचा उत्स्फूर्त सहभाग तसेच महिलांनी भरवलेले रानभाज्यांचे भव्य प्रदर्शन. यात बांबूची वासती, मोखा, पेंढर, बेलाचे लोणचे, आंबाडा, माटाची भाजी, खुरचणी, सरबल, आंबाडी, शेवग्याचा पाला, तरोटा, कुरडु, डावखुरे, टेटु, डाडलेचा पाला, कडु कांदाच्या वळी अशा विविध दुर्मिळ रानभाज्या मांडण्यात आल्या होत्या. याशिवाय नागली, तांदूळ, सितोळीच्या भाकऱ्या खेकड्याची भाजी यांसारखे स्थानिक खाद्यपदार्थही पाहुण्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. लहान थोर ग्रामस्थांसह मान्यवरांनी या पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेतला. महोत्सव यशस्वीतेसाठी संयोजकांचे योगदान लाभले. इकोनेट संस्थेचे ग्रामसभा सोबती, सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. लेखक तुकाराम चौधरी यांनी प्रास्ताविकातून पेसा कायदा, जंगलाचे जतन व संवर्धन तसेच आदिवासींचे निसर्गाशी जुळलेले नाते व रानभाज्यांचे महत्व पटवून दिले तर ग्रामपंचायत अधिकारी सतिश बच्छाव यांनी आभार मानले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

> रानभाज्या महोत्सवामुळे आदिवासी पारंपरिक आहारसंस्कृतीचे महत्त्व पटले. या उपक्रमातून निसर्गाशी जुळवून घेणारी जीवनशैली आणि आरोग्यपूर्ण आहार पिढ्यान्‌पिढ्या टिकवण्याचा संदेश मिळाला आहे. बोरमाळ पेसा ग्रामसभेचा 'रानभाज्या महोत्सव' नाशिक जिल्ह्यासह संपूर्ण आदिवासी भागासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे.
> **– हेमंत बच्छाव, सहाय्यक गटविकास अधिकारी, त्र्यंबकेश्वर**

# विघ्नहर्ता नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

**सिन्नर ।** विघ्नहर्ता नागरी सहकारी पतसंस्थेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ही हॉटेल पंचवटी, मनवार हॉल सिन्नर येथे संस्थापक चेअरमन डॉ.श्री. व्ही.एम.अत्रे ह्यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली.



संस्थेचे संस्थापक चेअरमन श्री डॉ. विष्णू अत्रे व व्हा.चेअरमन श्री. भाउसाहेब पवार तसेच सर्व संचालकांनी दिप प्रज्वलन व श्रीगणेशाचे (विघ्नहर्त्याचे) पुजन करुन सभेला सुरुवात करण्यात आली. सदर सभा ही सभासदांच्या ऊस्फुर्त प्रतिसाद व सहभागामुळे खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेमध्ये सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा तसेच काही गुणवंत सभासदाचां देखिल सत्कार हा संस्थापक अध्यक्ष श्री. डॉ. विष्णू अत्रे व्हा.चेअरमन श्री. भाउसाहेब पवार व इतर संचालक ह्यांचे हस्ते करण्यात आला. सभासदानां कायद्याचे ज्ञान, संस्थेच्या पोटनियमाची व्यवस्थित माहिती व्हावी ह्याकरीता संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संघा तर्फे सहकार विकास अधिकारी श्री. वायकर साहेब यांचे मार्फत प्रशिक्षण दिले. सभेचे सूत्रसंचालनासह प्रास्तविक व विषय पत्रिकेचे वाचन मॅनेजर सौ. निता कुलकर्णी ह्यांनी केले. तर सहकारी असि. मॅनेजर श्री दिपक शेजवळ कॅशिअर श्री, विनायक अत्रे क्लार्क सौ. वर्षा कोठुरकर सहाय्यक श्री सचिन आहेरराव यांच्या सहकार्याने संस्थेची जी प्रगती झाली त्या प्रगतीच्या अहवालाचे वाचन केले. सन २००४ पासुन ते सन २०२५ पर्यत संस्था सतत अ वर्ग प्राप्त करीत आहे. त्याचे श्रेय त्यांनी सहकारी संस्थापक चेअरमन व्हा. चेअरमन, संचालक मंडळाला दिली.

# शिवाजी चौक मित्र मंडळातर्फे रक्तदान, नेत्र तपासणी, अथर्वशीर्ष पठण उपक्रम

**नाशिक ।** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळाच्या वतीने समाजोपयोगी उपक्रमांची रेलचेल झाली. मंडळाने आयोजित केलेले रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर तसेच गणपती अथर्वशीर्ष पठण हे कार्यक्रम अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाले.



छत्रपती शिवाजी महाराज चौक चॅरिटेबल ट्रस्ट प्रणित छत्रपती शिवाजी महाराज चौक मित्र मंडळ यांच्या वतीने प्रत्येक दिवशी वेगवेगळे सामाजिक उपक्रम घेण्यात आले यामध्ये रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी व गणपती अथर्वशीर्ष पठण आदी सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले. रक्तदान शिबिरात युवक व अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने सहभाग घेऊन रक्तदान केले. त्याचबरोबर आयोजित नेत्र तपासणी शिबिरात शेकडो नागरिकांनी आपली तपासणी करून घेतली. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्यावतीने धार्मिक वातावरणात झालेल्या गणपती अथर्वशीर्ष पठणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी या पठणात सहभागी होत गणरायाचे नामस्मरण केले. या सर्व उपक्रमांना स्थानिक नागरिक, तरुणवर्ग, महिला व मंडळाचे कार्यकर्ते यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# गणेशोत्सवात मातृ-पितृस्मृतींना 'मायबाप'चे अनोखे वंदन!

**नाशिकरोड । 'मायबापाची विसरू नका कीर्ती, तेच आपले आभाळ आपली धरती, सांभाळती दौलत लेकरांची... जाळून जीवाच्या ज्योती... !'** असं म्हणत मातापित्यांच्या आठवणींचा जागर करत 'मायबाप' या आईवडिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणाऱ्या संस्कारक्षम कार्यक्रमाचे आयोजन जेलरोड येथील साईराज बहुउद्देशीय संस्थेने गणेशोत्सवात करून समाजापुढे एक नवीन आदर्श घालून दिला.

या कार्यक्रमात एकापेक्षा एक सरस कविता सादर होत असताना उपस्थितांनी आपल्या भावनांना मोकळी वाट करून दिली. गणेशोत्सव काळात मातृपितृस्मृतींना हे अनोखे वंदन होते. राज्यभर गाजत असलेल्या अरुणराज प्रस्तुत 'मायबाप' या कार्यक्रमाच्या १९२व्या प्रयोगातून मातापित्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.

कवी राजेंद्र उगले आणि अरुण इंगळे यांनी रसिकांसमोर मायबापाची एक-एक आठवण हळुवारपणे मोकळी करत रसिकांच्या डोळ्यात पाणी उभे केले. 'बाप सोडून जाताना/सुन्या झाल्या दाही दिशा झाला पोरका भूगोल/आणि फाटला नकाशा!' अशा कवितेतून कवी राजेंद्र उगले यांनी स्वतःच्या कष्टातून उभा केलेला संसार आणि भरलेलं गोकुळ सोडून जाणाऱ्या बापाबद्दलच्या भावना व्यक्त केल्या तर कवी अरुण इंगळे यांनी युवाकवी प्रशांत




केंदळे यांच्यासमोर त्यांच्या सादर केलेल्या- 'बाप मनात जपतो/लेक त्याची सोनपरी तरी जिवाचा जिवडा/देतो परक्याच्या घरी' या कवितेने साऱ्यांचेच डोळे पाणावले. निवेदनात कवी रवींद्र मालुंजकर यांनी लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या 'माय अंगुळ करिती, पाणी व्हात-व्हात जाई, थेट पंढरपुरात, त्याची चंद्रभागा होई...' या कवितेसह आई-वडिलांचा जागर करणाऱ्या अनेक कवितांची पेरणी केली. मैफिलीतील कवी कमलाकर देसले यांच्या 'आई तू शिकायला पाहिजे...,' प्रा.राजेश्वर शेळके यांची 'बूट आणि टाय,' ज्येष्ठ साहित्यिक विजयकुमार मिठे यांची 'काय देऊ पोरी तुला,' काशीनाथ वेलदोडे यांची 'झाडाच्या पानापानात,' गझलकार गौरवकुमार आठवले यांची 'दारिद्र्याच्या संसाराचे नंदनवनही करते आई...' अशा विविध कवितांना श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. अभिजीत वैद्य (तबला) आणि प्रा.नरेंद्र जाधव (सिंथेसायझर) यांनी साथसंगत केली. सुभाष काजळे, सेवानिवृत्त तुरुंगाधिकारी हरिदास कुंटे, पोलीस अधिकारी प्रकाश निकम, विजय विशे, कामगारनेते प्रशांत कापसे, रामचंद्र शिंदे, अमृत राठोड, गणेश चिखले, ज्येष्ठ पत्रकार प्रा.भागवतराव गुरव, कवी राजू आतकरी यांच्यासह रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थापक रोहित निर्मळ, समाजसेविका विजयता डावरे, युवानेते राहुल डावरे, भूषण बर्वे, हेमंत प्रधान, शुभम काजळे, अनुराग बर्वे, प्रथमेश माळी, स्वप्नील मोरे, अनिश चिंटू, कमलेश तेल्हुरे, प्रशांत कदम, प्रसाद साळवे, सूरज महाले आणि महिला मंडळाने आयोजन केले.

## महत्त्वाचे

### सार्वजनिक गणेश मंडळाचे रथ सजले; गणरायाला आज निरोप

**नाशिक ।** दहा दिवसांच्या आराधनेनंतर गणेशोत्सवाची आज शनिवारी (दि.६) सांगता होणार असून,लाडक्या गणरायाला निरोप देण्यासाठी सार्वजनिक मंडळासह पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सार्वजनिक मंडळांबरोबरच घरगुती गणपतींचे देखील विसर्जन केले जाणार आहे. यामुळे होणारी गर्दी लक्षात घेता, महापालिका आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. अनेक मंडळांची विद्युत रोषणाई असून, त्यांनी रथ सजविण्यास प्रारंभ केला आहे. मिरवणूक मार्गावरील वीजतारा भूमिगत करण्यात आल्या आहेत. महापालिकेच्या वतीने मिरवणूक मार्गावर खड्ड्यांच्या डागडुजी करण्यात असून मिरवणूक मार्गावरील अतिक्रमण तात्पुरत्या स्वरूपात बाजूला करण्यात आले आहे. मनपातर्फे जागोजागी कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली आहे. अग्निशामक दलाच्या वतीने विसर्जनस्थळी जीवरक्षक दल तैनात ठेवण्यात आले आहे. मागील वर्षी मिरवणुकीला उशीर झाला होता, त्यामुळे यंदा मिरवणूक वेळेत पूर्ण होण्यासाठी पोलिस आणि महापालिकेचे प्रयत्न राहणार आहे.

### गणेश मंडळांमध्ये वाद कायम


**नाशिक ।** विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या मंडळाना दिल्या जाणाऱ्या क्रमवारी वरून सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये गुरुवार (दि.४) देखील एकमत होऊ शकले नाही, चिठ्ठ्या काढूनच क्रमवारी ठरवा,अशी आग्रही भूमिका सात ते आठ मंडळांनी कायम ठेवली असल्याने विसर्जन मिरवणुकीत काय होते, याकडे आता लक्ष लागून आहे. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या उपस्थितीत गणेश मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली होती. यात क्रमवारी ठरविण्यावरून मोठे वादंग झाल्याचे दिसून आले होते. त्यामुळे गुरुवारी (दि.४) भद्रकाली पोलीस ठाण्यात पुन्हा बैठक घेण्यात आली. मोठ्या मंडळांच्या मिरवणूका खुप वेळ घेत असल्याने, छोट्या मंडळांना पुढचा क्रमांक मिळवा अशी भूमिका काही मंडळांनी कायम ठेवली आहे. तर शहरातील पाच मानाची मंडळे पारंपरिक क्रमानुसारच मिरवणूक चालावी,यासाठी आग्रही आहे. बैठकीस नाशिक गणशोत्सव महामंडळाचे अध्यक्ष समीर शेटे, अखिल सार्वजनिक गणशोत्सव महासंघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रामसिंग बावरी आणि गणेश मंडळाचे अध्यक्ष, सदस्य उपस्थित होते.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच

**नाशिक ।** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विविध प्रलंबित मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी १९ ऑगस्टपासून सुरू केलेल्या बेमुदत कामबंद आंदोलनाच्या पंधराव्या दिवशी जोरदार निदर्शने करण्यात आली. दहा वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन व दरवर्षी तीस टक्के याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य, ग्रामविकास, नगरविकास व वैद्यकीय शिक्षण विभागात समावेश करण्याची मूळ मागणी करण्यात आली आहे. शासनाने १४ मार्च २०२४ मध्ये दहा वर्ष सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र,अठरा महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचा आरोप आयटकचे राज्यसचिव कॉ. राजू देसले यांनी केला. या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणीही केली आहे. जिल्ह्यात जवळपास दीड हजार कर्मचारी कंत्राटी पध्दतीने अनेक वर्षांपासून काम करीत असून रूग्णांना आरोग्य सेवा पुरविण्याचे काम करीत आहेत. सरकारने मात्र मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने या कर्मचाऱ्यांना बेमुदत कामबंद आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. यात वैद्यकिय अधिकारी, नर्सेस, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक, समन्वयक, सहाय्यक आदी सारेच सहभागी झाल्याने आरोग्य सेवा ठप्प झाली आहे. आंदोलनाच्या पंधराव्या दिवशी जिल्हा शासकिय रूग्णालयासमोर निदर्शने करण्यात आली.

# गणेश विसर्जन मिरवणुकीनिमित्त नाशिक शहरातील वाहतुकीत मोठे बदल

**नाशिक ।** गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात वाहतूक व्यवस्थेत शनिवारी (दि. ६ सप्टेंबर २०२५) मोठे बदल करण्यात आले आहेत. सकाळी १० वाजल्यापासून मुख्य विसर्जन मिरवणूक मार्गावरील रस्ते सर्वसामान्य वाहनांसाठी बंद राहणार असून फक्त मिरवणुकीतील वाहनांनाच प्रवेश दिला जाणार आहे.



गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर वाकडी बारव (चौक मंडई), जहांगिर मशिद, दादासाहेब फाळके रस्ता, दूधबाजार चौक, गाडगे महाराज पुतळा, मेनरोड, धुमाळ पॉइंट, सांगली बँक सिग्नल, महात्मा गांधी रस्ता, मेहेर, अशोक स्तंभ, नवीन तांबट आळी, रविवार कारंजा, होळकर पूल, मालेगाव स्टँड, पंचवटी कारंजा, मालवीय चौक, परशुराम पुरिया रस्ता, कपालेश्वर मंदिर, भाजी बाजार, म्हसोबा पटांगण हे रस्ते सकाळी १० पासून रात्री उशिरापर्यंत बंद राहतील.सीबीएस, निमाणी बस स्थानक, पंचवटी आगार येथून सुटणाऱ्या बसचे मार्ग बदलण्यात आले आहेत. तसेच अवजड वाहनांना या मार्गांवर प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. शहर परीवहन आणि महामंडळ बसना देखील ठराविक वेळेसाठी पर्यायी मार्गावर वळवण्यात आले आहे.

**पर्यायी मार्ग**– सारडा सर्कल–गडकरी चौक–मोडक सिग्नल–सीबीएस–मेहेर सिग्नल–अशोक स्तंभ–रामवाडीमार्गे–मालेगाव स्टँड–मखमलाबाद नाका–पेठ नाका–दिंडोरी नाका हे मार्ग पर्यायी ठेवले आहेत. तसेच काट्या मारुती चौक–संतोष टी पॉइंट–कन्नमवार पूल–द्वारका सर्कल–अशोक स्तंभ–रामवाडी पूल–मखमलाबाद नाका–पेठ नाका सिग्नल–दिंडोरी नाका हे मार्ग वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या बंदीमधून आपत्कालीन सेवा जसे की रुग्णवाहिका, शववाहिका, अग्निशमन दल तसेच स्थानिक रहिवाशांना अपवाद देण्यात आला आहे. वाहतूक पोलिसांनी सर्व वाहनचालकांना विनंती केली आहे की, वाहतुकीवरील निर्बंधांचे पालन करून पर्यायी मार्गांचा वापर करावा व विसर्जन मिरवणुकीस सहकार्य करावे.गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर नाशिककरांनी संयम बाळगून पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शिक्षकांमुळे सामर्थ्यवान पिढी तयार होते : कातोरे

## राष्ट्रप्रथम सोशल फाउंडेशनच्या वतीने शिक्षकांचा गौरव

**बेलगाव कुऱ्हे ।** शिक्षकांच्या हातात देशाचे भविष्य असते त्यांच्यामुळेच भविष्यातले डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ, इंजिनियर, लेखक, शिक्षक आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करून देशाचे नाव उंचवणारे सामर्थ्यवान पिढी तयार होते. असे प्रतिपादन राष्ट्रप्रथम सोशल फाउंडेशनचे संस्थापकीय अध्यक्ष तथा माजी सैनिक विजय कातोरे यांनी केले. राष्ट्रप्रथम सोशल फाउंडेशनच्या वतीने इगतपुरी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक क्षेत्रात अविरत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन संस्थापक अध्यक्ष विजय कातोरे यांनी केले होते. याप्रसंगी ते बोलत होते.आपले विचार, मत आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यामागे शिक्षकांचा मोठा वाटा असतो. चांगले संस्कार, शिस्तीत




राहणे, आणि योग्य शिक्षण देऊन जगासमोर उभं राहण्याची ताकद शिक्षकांमुळे येते असे इगतपुरीचे गटशिक्षणअधिकारी निलेश पाटील म्हणाले. यावेळी भुमिपुत्र फाऊंडेशनचे विनोद नाठे, डॉ. प्रशांत मुर्तडक, डॉ. हेमंत आवारे, उपक्रमशील शिक्षक निवृत्ती नाठे, उमेश बैरागी, निवृत्ती तळपाडे, संतोष श्रीवंत, माजी सैनिक किसन हंबीर, नारायण जाधव, गोकुळ धोंगडे आदी उपस्थित होते.

**या शिक्षकांचा झाला गौरव**

मनिषा उणवणे, शरद यादव, मेघा क्षीरसागर, ज्ञानेश्वर गभाले, सुजाता बोरसे, महेश बनकर, सुशीला चोथवे, उमेश गरुड, विनोद पाटील, राजाराम चहाळे, मोनाली देशमुख वर्षा चौधरी, राजेंद्र मोरकर, ज्ञानेश्वर बांगर, राजेश खैरनार, अवधूत खाडगीर, जावेद खान पठाण, कविता अस्वले यांचा राष्ट्रप्रथम सोशल फाउंडेशनच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

# उद्या रविवारी चंद्रग्रहण त्र्यंबकला साधकांची गर्दी

**नाशिक ।** भाद्रपद पौर्णिमेला रविवार (दि. ७) रोजी पूर्ण चंद्रग्रहण (खग्रास चंद्रग्रहण) होणार असून, हे ग्रहण भारतातून दिसणार आहे. सुमारे साडेतीन तासांच्या या ग्रहण पर्वकाळात जप, तप आणि धार्मिक विधी करण्यासाठी त्र्यंबकेश्वरमध्ये साधकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या वर्षी यापूर्वी भारतातून ग्रहण दिसले नसल्याने साधकांसाठी ही एक विशेष संधी मानली जात आहे. ग्रहण रात्रीच्या वेळी आणि झोपेच्या वेळेत असल्यामुळे साधकांची एक प्रकारे कसोटीच लागणार आहे. विशेषतः सध्या सुरू असलेला पाऊस थांबण्याची चिन्हे नसल्याने ग्रहणातही पाऊस असेल का? याविषयी अंदाज बांधले जात आहेत. त्यामुळे धार्मिक विधी करताना पावसामुळे अडथळे येण्याची शक्यता आहे.

**ग्रहणाची वेळ आणि सूतक ग्रहण**– सूतक दुपारी १२:३७ वाजता सुरू होईल. ग्रहणाचा स्पर्श रात्री ९ वाजून ५७ मिनिटांनी, ग्रहण मध्य रात्री ११ वाजून ४२ मिनिटांनी, तर ग्रहण मोक्ष मध्यरात्री १ वाजून २७ मिनिटांनी होणार आहे. थोडक्यात, मध्यरात्री दीड वाजता ग्रहण सुटेल. हे चंद्रग्रहण भारतातून दिसणार असल्याने सूतक सकाळी १२:३७ पासून सुरू होऊन ग्रहण मोक्षपर्यंत पाळावा लागेल. आजारी, वृद्ध, बालके आणि गर्भवती स्त्रियांनी या काळात विशेष काळजी घेण्याचे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे. त्र्यंबकेश्वरमध्ये गर्दीचे संकेत याच दिवशी पितृपक्षाची सुरुवात होत असून शनिदेव वक्री होणार आहेत, असे ज्योतिषशास्त्र सांगते. सध्या चातुर्मास सुरू असल्याने त्र्यंबकेश्वरच्या कुशावर्त तीर्थ आणि ज्योतिर्लिंग मंदिरात भाविकांची गर्दी राहील. काही भाविक मंत्रजप करतील, तर काही कुशावर्त तीर्थाच्या काठावर बसून देवाची आराधना करतील. असे केल्याने ग्रहांचे अनिष्ट परिणाम कमी होतात, अशी धारणा आहे. ग्रहण पूर्वकाळात दुर्वाजवळ ठेवल्यास ग्रहणाची बाधा होत नाही, असेही मानले जाते.

# प्रभाग रचनेवर ९१ हरकती दाखल

**नाशिक ।** महापालिका निवडणूकीसाठी आयोगाने जाहीर केलेल्या प्रारूप प्रभाग रचनेसाठी हरकती व सुचना दाखल करण्याचा अंतीम दिवशी शहरातील विविध प्रभागातून ९१ हरकती, सूचना दाखल झाल्या आहेत. राज्य निवडणूक आयोगाने २२ ऑगष्ट रोजी महापालिका निवडणूकीसाठी प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली आहे. सन २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणूकीची प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली असून, चार सदस्यीय २९ प्रभाग तर तीन सदस्यांचे दोन प्रभाग आहेत. गेल्या दहा दिवसांपासून या प्रभाग रचनेवर ठिकठिकाणाहून राजकीय पक्ष व व्यक्तींकडून हरकती दाखल केल्या जात आहेत. त्यात प्रामुख्याने प्रभागातील भागाचे विभाजन, एकत्रीकरण करण्याच्या हरकती व सुचनांचा समावेश आहे. काही प्रभागांमध्ये दोनपेक्षा अधिक हरकती दाखल करण्यात आल्या असून, त्यात अनेक इच्छूकांचा समावेश आहे. आपल्याला सोयीचा प्रभागाच्या भागाचा त्यात समावेश केला जावा यासाठी या हरकती घेण्यात आल्या आहेत.

# गणेश विसर्जनासाठी नाशिक शहरात कडेकोट पोलिस बंदोबस्त



**नाशिक ।** शहरात २०२५ मधील गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सुरक्षा, वाहतूक नियंत्रण आणि अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी हजारो पोलिस अधिकारी-कर्मचारी, महिला पोलिस, होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली असून सीसीटीव्ही कॅमेरे व ड्रोन यंत्रणेच्या मदतीने मिरवणुकीवर लक्ष ठेवले जाणार आहे.

गणेश विसर्जन, ईद-ए-मिलाद आणि इतर मोठ्या मिरवणुकांचा सुरक्षा विचार करून काही अधिकारी व कर्मचारी तब्बल ४८ तास सलग ड्युटीवर राहणार आहेत. या बंदोबस्तासाठी चार पोलिस उपायुक्त, सहा सहाय्यक पोलिस उपायुक्त, ४७ निरीक्षक, १३० उपनिरीक्षक, २,२०० पोलिस कर्मचारी, ४०० महिला पोलिस, ११०० होमगार्ड, २५० महिला होमगार्ड, राज्य व केंद्रीय राखीव दल तसेच बम शोधक पथकांची तैनाती करण्यात आली आहे. विसर्जन मार्गांवर मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही बसवले असून गर्दी नियंत्रणासाठी ड्रोनचा वापर होईल. संवेदनशील भागांमध्ये अधिक पोलिस तैनात केले गेले आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना आखण्यात आल्या असून, छेडछाड करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. मिरवणूक मार्ग व विसर्जन स्थळांवर वाहतूक नियंत्रणासाठी विशेष फौजफाटा सज्ज असून काही ठिकाणी वाहतुकीवर निर्बंध लागू केले आहेत. गणेशोत्सव मंडळांना वेळेत विसर्जन करण्याचे आणि कायद्याचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. हा बंदोबस्त भाविकांच्या सुरक्षेसाठी असून, शिस्तबद्ध व सुरक्षित पद्धतीने उत्सव पार पडावा यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त संदीप कर्णिकयांनी केले आहे.

# देवळाली कॅम्प येथे पर्यावरणपूरक वृक्षरूपी गणेशोत्सव..

**देवळाली कॅम्प ।** येथील शिवयूवा प्रतिष्ठान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी पर्यावरणपूरक वृक्षरुपी गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना करून सलग अकरा दिवस सामाजिक उपक्रमावर भर देत गणेशोत्सव साजरा केला. श्रीचे असेच एक मोहक आणि पर्यावरणाचा संदेश देणारे रुप देवळाली कॅम्प येथील शारदा स्टॅन्ड याठिकाणी साकारण्यात आले आहे. मी माणसात आहे, मी वृक्षात आहे, निसर्गात आहे असा संदेश देणारे वृक्षरुपी गणेश सर्वांच्याच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. या वक्षरुपी गणेशाचे महत्त्व समाजात पटवून देण्यासाठी व वसुंधरेचे रक्षण करण्यासाठी पर्यावरनाचे रक्षण ही काळाची गरज असून निसगार्चे रक्षण झाले तरच जिवसृष्टीचे संरक्षण होईल, झाडे




लावा, चैतन्य फुलवा. प्लॅस्टिक टाळा, पर्यावरण सांभाळा, सर्वानी मिळून प्रदुषण विरहित गणेशोत्सव साजरा करावा असा संदेशच जणू गणेश भक्तांना देण्यांत आला. सदर येथील वृक्षरूपी गणपती बाप्पा बघण्यासाठी शहरातील शाळेतील विद्यार्थांनी देखील हजेरी लावत दर्शन घेतले. शिवयूवा प्रतिष्ठान सातत्याने दरवर्षी गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धन जनजागृतीवर विविध उपक्रमांवर भर देत असतात यातच गेली पाच वर्षांपासून पर्यावरणपूरक शाडु माती श्रीगणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठा करून पर्यावरणाचा संदेश देत असतात. या वर्षी देखील आगळा वेगळा उपक्रम हाती घेत वृक्षरूपी पर्यावरणपूरक श्रीगणेश मुर्ती झाडावर तयार केली असून मि दगडात नाही, मि देवळात नाही.मि झाडात आहेत.असा संदेश दिला शिवयुवा प्रतिष्ठान वतीने घेण्यात आलेल्या आगळा वेगळ्या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्याप्रणावर सहभाग घेतला. येथील श्रीगणेश मुर्ती प्राणप्रतिष्ठा वेळी जि.प प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यानी प्रारंभी वृक्षसंवर्धन व विचार नियम यावर गीत म्हटले.

# ओझरच्या जनशांती धाम येथे घडतेय अष्टविनायक दर्शन

**ओझर ।** निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज यांच्या स्मरणार्थ उत्तराधिकारी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी ओझर येथे निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे शेकडो देवी-देवतांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आलेली आहे.या दिव्य धामात श्री गणेशाच्या एकूण आकरा मूर्तींची स्थापना करण्यात आलेली आहे.

पंचमुखी गणेश,श्रीशांती महागणेश, श्री बालगणेश व अष्टविनायकाची मंदिरे आहेत.सध्या सुरू असलेल्या गणेशोत्सव निमित्त येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनाचा लाभ घेत आहेत. आश्रमाच्या वतीने



येणाऱ्या भाविकांना प्रसाद वाटप करण्यात येत आहे. अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या अथक प्रयत्नातून ओझर येथील देवभूमी जनशांती धाम येथे संतमेळासह शेकडो देवी-देवतांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. त्यात भगवान बाणेश्वर महादेवासह नवग्रह, अष्टमूर्ती शंकर, अष्टलक्ष्मी, दिशा देवता, राम दरबार, लक्ष्मी-नारायण, म्हाळसा माता,मातोश्री फुला माता, शिवभक्त अहिल्यादेवी, राधा-कृष्ण, विठ्ठल-रुक्मिणी, जगदगुरू जनार्दन स्वामी महाराज, पंचमुखी गणेश,शांती महागणेश,अष्टविनायक,बालगणेश अशा एकूण अकरा गणपतींचे स्थान आहे. भाविकांना गणेशोत्सवानिमित्त अष्टविनायक दर्शनाबरोबरच विविध देवी-देवतांच्या दर्शनाचा लाभ होत आहे. आश्रमाच्या वतीने येणाऱ्या भाविकांना रोज महाआरतीचा सन्मान देण्यात येत आहे.गणेशोत्सव सोहळा यशस्वीतेसाठी जय बाबाजी भक्त परिवार कार्य करत आहे.

## नाशिक गणेश दर्शन...



सुवर्णा मालसाने



हेमा शिनकर



राणी कुलथे



प्रियंका जरेन, गुंफा जरेन



ज्योती गायकवाड



वृषाली जोशी



तेजश्री बडगुजर

## ➤ महत्त्वाचे

### एएन कराओके क्लबतर्फे रविवारी आशा भोसलेंच्या गाण्यांची मैफल

**नाशिक ।** येथील एएन कराओके क्लबतर्फे रविवारी ( दि.७ ) लोकप्रिय गायिका आशा भोसले यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्याच गाजलेल्या सुमधुर गाण्यांची मैफल आयोजित करण्यात आली आहे. यावेळी नाशिकमधील अनेक गायक, गायिका सहभागी होऊन



आशाताईंना मानवंदना देतील असे संयोजक नितीनकुमार चव्हाण यांनी सांगितले. सायंकाळी ६ वाजता परशुराम साईखेडकर नाट्यगृहात होणाऱ्या 'दम मारो दम' या विनामूल्य मैफलीत उमा अग्रवाल, स्वराली चव्हाण, सोनल पडाया, अनिता खर्डे, संध्या चोपडे, शुभांगी महिरे या गायिका आशाताईंनी गाऊन अजरामर केलेली लोकप्रिय गाणी सादर करतील. त्यांना युगुल गीतांमध्ये अविनाश येवलेकर, के.डी.पाटील, मुकेश पंडित, डी. डी. मोरे, चंद्रशेखर कोतकर, विजय पोळ, दिलीप चोपडे, सुनील कोचर, अरुण आव्हाड, अशोक महिरे हे गुणी कलाकार स्वरसाथ करतील. क्लबच्या संचालिका अंजली नितीनकुमार या सूत्रसंचालन करणार आहेत. नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहून गाण्यांचा आनंद घ्यावा व कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### संकेत संकलेचा यांचे निधन

**मनमाड ।** येथील संकेत महावीर संकलेचा (वय ३५) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले.



त्यांच्या अंत्यविधीसाठी मनमाड, पुणे, नाशिक परिसरातील व्यापारी, राजकीय व समाजातील सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.त्यांचे पश्चात आई-वडील, पत्नी, बहीण असा परिवार आहे. येथील प्रख्यात महावीर संकलेचा यांचे ते चिरंजीव होत.



**शर्विल व आराध्या अभिषेक आडके हिरावाडी रोड महालक्ष्मी नगर कार्यसिद्धी गणेश मंदिर जवळ यांच्या संकल्पनेतून कापसापासून तयार केलेला हिमालयात ढगाचा आरस वरून महादेव आणि श्री गणेश पितापुत्र एक.**

# 'सर्वच ठिकाणी मीच पाहिजे' ही भूमिका लोकांना आवडेल?'

## सिन्नर वाचनालय निवडणुकीत निर्माण झाली चुरस

**सिन्नर ।** कुठलीही निवडणूक असो, तेथे मीच पाहिजे व मी सोडून कुणाला संधी नकोच अशी भूमिका घेऊन राजकारण करणाऱ्यांना दणका देण्यासाठी सार्वजनिक वाचनालयाच्या निवडणुकीत विरोधकांनी कंबर कसली आहे. सत्ताधाऱ्यांना आता जनतेकडूनही जाब विचारला जात आहे. 'कधीतरी इतरांना संधी द्या' असे म्हणण्याची वेळ सभासदांवर आली आहे.

सिन्नरचे सार्वजनिक वाचनालयाचे रोपटे वसंतकाका देशपांडे यांनी इतके भक्कम रोवले की, येणाऱ्यांना फक्त आयते काम करायचे होते. काकांनी कधीच या वाचनालयात राजकारण आणले नाही. मात्र त्यांच्या निधनानंतर हेच वाचनालय राजकारणाचा अड्डा झाले. विशेष म्हणजे ज्यांनी कधी हातात पुस्तकही घेतले नाही, अशीच मंडळी मोठ्या संख्येने तेथे जाऊन पोहोचली. त्यामुळे एका बाजूला वाचनालय प्रगती करीत असताना दुसऱ्या बाजूला त्याच वाचनालयात राजकारणाची पाळेमुळे खोल जाऊन बसत होती. पुंजाभाऊ सांगळे यांच्यासारखी माणसं त्या वाचनालयात असणे गरजेचे होते. पण तेथील वातावरण पाहून त्यांनीही थांबणे पसंत केले. खासदार राजाभाऊ वाजे व मंत्री माणिकराव कोकाटे यांनी निवडणूक बिनविरोध भावी म्हणून हस्ते परहस्ते निरोप दिले होते. परंतु 'मला हा नको, मला तो नको' ही सत्तारूढ गटातील काहींची भूमिका त्यांनाही आवडली नाही. समेट घडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. परंतु फक्त एका नामदेव कोतवाल नावाच्या साध्या कार्यकर्त्याला पॅनलमध्ये नकोच ही हट्टाची भूमिका विद्यमान पॅनलला नडली. शिवाजी देशमुख यांच्यासारखा प्रभावी कायदेतज्ज्ञ निवडणुकीच्या राजकारणात उतरला व पाहता पाहता सभासदांनी त्यांना डोक्यावरही घेतले. एवढेच नव्हे तर पेशाने शिक्षक असलेला व साहित्य क्षेत्रात रुची असलेला प्राध्यापक पेशात नाव कमविलेला प्राध्यापक राजाराम मुंगसे यांच्यासारख्याला देखील निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर ढकलण्याचा केलेला प्रयत्न सभासदांना आवडला नाही. सत्तारूढ पॅनल मधील राजेंद्र देशपांडे, हेमंत वाजे यांच्यासारखी काही मोजक्या माणसांना आजही सभासदांनी



डोक्यावर घेतले आहे. कारण राजकारणापेक्षा त्यांना वाचनालयाची समृद्धी हवी होती. पण त्यांचेही कोणी चालू देईना. शेवटी नामदेव कोतवाल यांनी हेमंत वाजेच्या विरोधात अर्ज दाखल करून धमाल उडवून दिली होती. परंतु तो एक राजकीय डाव होता व त्यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन हेमंत वाजे यांना बिनविरोध विजयी करून सत्तारूढ पॅनल मधील त्यांच्याच विरोधकांना धोबीपछाड दिला. त्याचाच परिणाम म्हणून बिनविरोध होणारी निवडणूक यंदा काहींच्या अट्टाहासामुळे रंगणार आहे. देशपांडे व वाजे यांच्या नेतृत्वाखालील पॅनल परिपूर्ण आहे. तर दुसरीकडे शिवादादा देशमुख व नामदेव कोतवाल यांच्या नेतृत्वाखालील पॅनल पूर्ण नाही. वाजे-देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली प्रगती पॅनलला 'विमान' ही निशाणी मिळाली आहे. तर देशमुख-कोतवाल यांच्या परिवर्तन पॅनलला 'जीपगाडी' ही निशाणी मिळाली आहे. उद्या निवडणूक होणार असून जनता यंदा धक्कादायक निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे बोलले जात आहे.

**मूठभर सभासद इतिहास घडवतील?**

सिन्नरच्या सार्वजनिक वाचनालयाच्या इतिहासात इतक्यात चुरशीने आजपर्यंत कधीही निवडणूक लढविण्यात आली नव्हती. यंदा मात्र ही निवडणूक अत्यंत चुरशीची होत असून प्रत्येक मतदारापर्यंत व्यक्तिगत संपर्क साधण्याची मोहीम सुरू झाली आहे. अवघे साडेपाचशे मतदार यापूर्वी एक विचाराने संचालक मंडळ बिनविरोध निवडून देत होते. परंतु गेल्या काही दिवसांपासून सरस्वतीच्या या मंदिरात राजकारणाचे डाव खेळले जाऊ लागले. नवीन संचालक मंडळात कोणाला 'डच्चू' द्यायचा याची पायभरणी सुरू व्हायला सुरूवात झाली. तेथेच मोठ्या राजकारणाचे डावपेच सुरू झाले. ज्या हेमंत वाजे यांना पॅनल मधून डावण्याचा प्रयोग सुरू झाला, त्यांनीच त्यांच्याच पॅनलमधील अंतर्गत विरोधकांना बिनविरोध विजयी होऊन दणका दिला. त्यामुळे आता एकेका मतासाठी वाजेंचीच मनधरणी करायची वेळ काहींवर आली. नामदेव कोतवाल हे काही खुनशी राजकारणी नाही. राजकारणात रस असल्यामुळे एका पक्षाशी त्यांची बांधिलकी जरूर आहे. परंतु सार्वजनिक वाचनालयात जाऊन सरस्वतीची सेवा करावी हे त्यांचे स्वप्न होते. तालुक्यातील दिग्गज राजकारणी देखील त्यांना पॅनलमध्ये घेऊन निवडणूक बिनविरोध करा अशा सूचना दिल्या होत्या. परंतु 'कोतवाल नकोच' त्याचबरोबरच 'वाजेही नकोच' हा अट्टाहास विद्यमान संचालक मंडळाला नडला व राजकारण सुरू झाले. त्यामुळेच मुठभर सभासद इतिहास घडवतील का याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

## अजिंक्य 'तारा' स्मृतिग्रंथात विविध पैलू उलगडले : अॅड. नितीन ठाकरे



**नाशिक ।** प्रा. डॉ.नीता कासार यांनी विठ्ठलराव हांडे अध्यापक विद्यालयात मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र विषयात त्यांनी पीएच.डी.मिळवली होती. त्यांना शिक्षणाबरोबरच शेती विषयाची रुची होती. त्यांनी केवळ देशाचे जबाबदार नागरिक नव्हे तर उद्याचे सक्षम गुरुजन घडवले. त्यांच्यावरील स्मृतीग्रंथात व्यक्त झालेल्या ५३ भावनांमधून विविध पैलू उलगडले आहेत असे प्रतिपादन अॅड.नितीन ठाकरे यांनी केले. ते अजिंक्य ' तारा ' या स्मृतिग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते.

येथील प्रा. डॉ. नीता निवृत्ती कासार यांच्या अजिंक्य ' तारा ' या स्मृतिग्रंथाचा गुरुवारी प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत मविप्र समाज संस्थेत तसेच अन्य शैक्षणिक संस्थांमध्ये ज्ञानदानाचे कार्य केले. प्रारंभी प्रा. डॉ. स्नेहल कासार यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. द्वितीय स्मृतीदिनानिमित्त काल (दि.४) सायंकाळी वैराज कलादालनात कमलबाई गायकर यांच्या हस्ते स्मृतीग्रंथाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मविप्र सरचिटणीस अॅड.नितीन ठाकरे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून मविप्र समाज संचालक अॅड.लक्ष्मण लांडगे, को ऑप बँक एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस अॅड.विलास आंधळे तसेच व्यासपीठावर अॅड.निवृत्ती कासार उपस्थित होते. अॅड. लांडगे म्हणाले, नीताताईंनी स्वतः अतिशय जिद्दीने, चिकाटीने उच्चशिक्षण घेतले होते.कर्तबगार व कडक शिस्तीच्या शिक्षिका म्हणून त्या परिचित होत्या. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी त्या कायम आग्रही राहिल्या. शिक्षणात नीतिमत्तेला प्राधान्य देऊन त्यांनी कर्मवीरांची, ज्ञानवीरांची उज्ज्वल परंपरा पुढे नेली. सोनचाफ्याप्रमाणे त्यांचा स्मृतीसुगंध दरवळत राहील असे त्यांनी नमूद केले. अॅड.आंधळे व प्रा.डॉ.राजेंद्र झोळेकर यांनीही आठवणींना उजाळा देत अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पंकजा अहिरे यांनी केले. वास्तुविशारद योगेश कासारपाटील यांनी आभार मानले. यावेळी निमंत्रित मान्यवर, कुटुंबीय, नातेवाईक उपस्थित होते.

## स्काऊट गाईडमुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो : गायकवाड

**नाशिक ।** जि. प. शिक्षण विभाग प्राथमिक, माध्यमिक तथा नाकि भारत स्काऊटस आणि गाईड जिल्हा कार्यालय नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर गणपतदादा मोरे महाविद्यालय निफाड येथे तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक, खाजगी माध्यमिक, शासकीय व अनुदानित आश्रम शाळा येथील इयत्ता सहावी ते नववीच्या स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचा एक दिवसीय संघनायक शिबिराचे आयोजन करण्यात आले.



सदर संघनायक शिबिरामध्ये उपस्थित १८६ स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड अभ्यासक्रमांतर्गत ध्वजारोहण, स्काऊट गाईडचा इतिहास, प्रार्थना, नियम, वचन, झेंडागीत, गाठींचे प्रकार व प्रथमोपचार, जिल्हा मेळावा, राज्य पुरस्कार राष्ट्रपती पुरस्कार, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध कार्यक्रम इत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले, शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी निफाड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, कर्मवीर गणपत दादा मोरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. सदर शिबिरात मार्गदर्शक म्हणून बद्रीनाथ रायते, जिल्हा संघटक स्काऊट श्रीनिवास मुरकुटे, जिल्हा संघटक गाईड कविता वाघ, शिबिर सहाय्यक मनोज तुसे आदी उपस्थित होते. उपस्थित स्काऊट गाईड विद्यार्थ्यांना तालुक्याच्या विस्तार अधिकारी व बुलबुल विभागाच्या ट्रेनर ललिता पवार यांच्या शुभहस्ते सहभागाचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

## धरण परिसरात विसर्जनाला बंदी; पालखेड पाटबंधारे विभागाचे पत्रक; पिण्याच्या पाण्याला प्रदूषणाचा धोका

**◆ धरण परिसरातील विसर्जन तात्काळ थांबवावे. ◆ स्थानिक स्वराज्य संस्थांनी केलेल्या पर्यावरणपूरक कृत्रिम तलाव वा टाक्यांचा वापर करावा. ◆ विसर्जनावेळी ध्वनीप्रदूषण, वायुप्रदूषण व अपघात टाळण्यासाठी नागरिकांनी जबाबदारीने सहकार्य करावे.**

**नाशिक ।** गणपती मूर्तीतील रासायनिक अवशेष, रंग व निर्माल्य यामुळे जलप्रदूषण वाढते. धरणातील पाण्याचा वापर लाभक्षेत्रातील गावांमध्ये पिण्यासाठी केला जातो. त्यामुळे हजारो नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांनी धरण व जलाशय परिसरात गणेशमूर्ती विसर्जन करण्याचे टाळावे, असे आवाहन पालखेड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता वैभव भागवत यांनी केले आहे.

याबाबत भागवत यांनी काढलेल्या पत्रकात धरण परिसर अतिसंवेदनशील असल्याने येथे विसर्जन केल्यास नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. त्यामुळे धरण परिसरात गणपती विसर्जन केल्यास नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो. विभागाच्या माहितीनुसार, दरवर्षी मोठ्या संख्येने नागरिक गावोगावातून धरण परिसरात येऊन गणेशमूर्ती विसर्जित करतात. परंतु यामुळे धरणातील पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होते. मूर्तीतील रासायनिक अवशेष, रंग व निर्माल्य यामुळे जलप्रदूषण वाढते. या पाण्याचा वापर लाभक्षेत्रातील गावांमध्ये पिण्यासाठी केला जातो. त्यामुळे हजारो नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. याशिवाय धरण परिसरातील पाणी खोल असल्याने त्याचा अंदाज न आल्यामुळे दरवर्षी जिवीतहानीच्या घटना घडल्या आहेत. लगतच्या ग्रामपंचायतींनी ध्वनीप्रदूषण व वायुप्रदूषणाबाबत वारंवार तक्रारी नोंदवल्या आहेत.धरणांचे पाणी हे पिण्याचे प्रमुख साधन असून त्यावर कुठलाही विपरीत परिणाम होऊ नये, धरणांची सुरक्षितता व पुरनियंत्रण यावर परिणाम होऊ नये, यासाठीच हा निर्णय घेतल्याचे अभियंता भागवत यांनी स्पष्ट केले आहे.

**निवडणुकीच्या काळात 'आमचा दादा लई रुबाबदार' गाण्याने धमाल उडवून दिली होती. त्यातच नाशिक जिल्ह्याचे अजितदादांवर तर 'लई' प्रेम. त्याच दादांचं आयपीएस महिला अधिकाऱ्यावर जगावेगळे प्रेम पाहून 'हे आपलेच दादा आहे का?' असा प्रश्न मनाला पडल्याशिवाय राहत नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी थेट एका महिला आयपीएस अधिकाऱ्याला फोन करून 'कारवाई थांबवा' असे आदेश दिल्याचा व्हीडिओ व्हायरल झाला अन् आपले दादा असे करूच शकत नाही, असा दावा त्यांच्यावर निस्सीम प्रेम करणारे कार्यकर्ते करू लागले. प्रशासकीय कारवायांमध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप आता आपल्या दादांवर सुरू झाला आहे. सोलापूरजवळील कुर्डू गावात रस्त्याच्या कामासाठी मुरूम उत्खनन सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर करमाळा उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) अंजना कृष्णा व्ही. एस. घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी सुरुवातीला संबंधितांकडे मुरूम उत्खननाची रॉयल्टी पावती दाखवण्यास सांगितली. मात्र, त्यांना तशी पावती सादर करता आली नाही. त्यामुळे अंजना कृष्णा यांनी हे मुरूम उत्खनन बेकायदेशीर असल्याचं सांगत थांबवण्यास सांगितलं. अशावेळी दादांचे 'परम भक्त' त्या गावात व्यवसायामध्ये मग्न झाले होते. आपला दादा मंत्रिमंडळात 'क्रमांक दोन'चा असताना आपले 'दोन नंबर'चे धंदे रोखणारी ही महिला अधिकारी कोण? असे त्यांना वाटणे साहजिकच आहे. गावचे सरपंच आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष बाबा जगताप यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांना फोन केला अन् आपली ताकद दाखवून दिली. यानंतर बाबा जगताप यांनी त्यांचा फोन अंजना कृष्णा यांच्याकडे देत अजित पवारांशी बोलण्यास सांगितलं. मात्र डीवायएसपी अंजना केवळ आवाजावरून अजित पवार यांना ओळखू शकल्या नाहीत. व्हॉईस कॉलवरून दादांनी त्यांना 'मी डिप्टी सीएम अजित पवार बोलतोय' असं सांगीतलं. यावर अंजना कृष्णा यांनी 'माझ्या मोबाईलवर फोन करा', असं उत्तर दिलं. यानंतर अजित पवारांची अवस्था 'आता माझी सटकली' अशी झाली. ते संतापले व अंजना कृष्णा यांना व्हीडिओ कॉल करून 'इतकी डेरिंग आहे तुमची? माझा चेहरा तरी ओळखाल ना?' असं म्हणत खडसावलं. पण सर्वात महत्त्वाचं म्हणजे 'कारवाई थांबवा, तहसीलदारांना सांगा माझा फोन आला आहे', असे आदेश अजित दादांनी दिले. पण दादांचा हा संवाद आता घराघरात पोहोचला आहे. बेकायदेशीर कामे करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दादांनी ज्या पद्धतीने आदेश दिला, तो काही जनतेला आवडलेला नाही. कारण 'खऱ्याला खरं अन् खोट्याला खोटं' म्हणणारा दादांचा स्वभाव महाराष्ट्राला माहीत आहे. असं असताना 'हे आपलेच दादा होते का ?' असेही आता कार्यकर्ते एकमेकाला विचारू लागले आहेत.**

# आमचा 'दादा' लई रूबाबदार!





सीएम म्हणजे कॉमन मॅन, डीसीएम म्हणजे डेडिकेटेड कॉमन मॅन असे जाहिरातीमध्ये सांगणारे सरकार 'डीसीएम म्हणजे डिफॉल्टर केस मॅनेजमेंट' असं काही वास्तवात आहे का? असा प्रश्न आता जनतेला पडला आहे. कारण अधिकाऱ्यांना तंबी देणाऱ्या आमदारांची संख्या या राज्यात कमी नाही. अधिकाऱ्यांना झापणे, पदाचा रुबाब दाखवणे, कधीकधी शिवीगाळ करणे याबाबत समाज माध्यमांमध्ये संजय शिरसाट, संजय गायकवाड, अनिल बोंडे, गीता जैन, संतोष बांगर, अमित साटम, मेघना बोर्डीकर यांची नावे झळकायची. पण अशा वाचाळवीरांमध्ये दादांचा समावेश कधीही झाला नाही. एवढेच नव्हे तर अशांना तंबी देण्याचे कामही दादा नेहमी करायचे. पण दोन दिवसांपासून दादांचा तो प्रसिद्ध व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यामुळे आता इथून पुढे मंत्री किंवा आमदारांकडून वेगळी अपेक्षा ती काय करायची? कुर्डू ग्रामपंचायतमार्फत शासकीय कामे सुरू होती. अशा कामांसाठी गौणखनिज उत्खननाची रॉयल्टी बिलातून आकारली जाते. मात्र प्रशासनाला चुकीची माहिती देऊन बेकायदेशीर उत्खनन सुरू होतं असं म्हणतात. डीवायएसपी मॅडम आल्या आणि कारवाई सुरू झाली. आपण दादांचे एवढे जवळचे असताना या मॅडम कारवाई करण्यासाठी हिम्मतच कशी दाखवू शकतात, असे त्या स्थानिक राजकीय नेत्याला वाटू शकले असेल. त्यामुळे त्याने अजितदादांना फोन केला. पण प्रचंड अशा प्रकारचा गाजावाजा झाल्याने अखेर दादांच्या त्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करावाच लागला. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रकरणातील काही व्हीडिओ समोर आले आहेत. त्यात गावकरी आक्रमक होत अधिकाऱ्यांशी धक्काबुक्की करताना दिसत आहेत. नाशिक जिल्ह्यात मनमाड जवळ एका अधिकाऱ्याला जिवंत जाळण्यात आल्याची घटना यापूर्वी होऊन गेली आहे. अनेक ठिकाणी अधिकाऱ्यांवर वाहन घालून त्यांना मारण्याचा प्रयत्न देखील झालेला आहे. अशा अवस्थेत संबंधित महिला अधिकाऱ्याला दादांनी झापले हे काही योग्य झालेले दिसले नाही. या प्रकरणातील महिला डीएसपीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना फोनवरून गुंडांना सोडण्यास स्पष्टपणे नकार दिला. खरंतर अशा धाडसी पोलीस अधिकाऱ्याचे आपण कौतुक करायला हवे. महिला पोलीस अधिकाऱ्याने फक्त फोन कॉलवर कुणाला का सोडावे? हा साधा प्रश्न आहे. बरं ज्याच्या संदर्भात कॉल केलेला आहे तो कोणी सद्गुणी संत महापुरुष आहे का तर तसेही नाही. वाळू व मुरूम व्यवसायात किंवा गौण खनिज व्यवसायात आता काम करणारे आता मोठ्या संख्येने 'भाई' गोळा झाले आहे. खरं म्हणजे हे सगळं चुकीचं आहे. अजितदादा अधिकाऱ्यांना बेकायदेशीर गोष्टींकडे कानाडोळा करायला लावतायेत, हे उघड झालं. कार्यकर्त्याने फोन लावून दिल्यामुळे अजितदादांना न ओळखणे ही काय त्या अधिकाऱ्याची चूक आहे का? अशाच कारणामुळे वरिष्ठ नेत्यांना आपापल्या भागात आपल्या मर्जीतील अधिकारी नेमायचे असतात. एकूणच बघायचं झालं तर अवैध उत्खनन करणाऱ्यांना सरकारच पाठीशी घालतोय हे दिसून आले.



थर्ड अम्पायर

जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

### कोण आहेत 'लेडी सिंघम' अंजली कृष्णा?

अजितदादांनी आयपीएस अधिकारी अंजली कृष्णा यांना केलेला फोन कॉल आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. याचं कारण त्यांनी अंजली कृष्णा यांच्याशी धमकीच्या स्वरात संवाद साधला. तुमची हिंमत कशी झाली? अशा शब्दांत झापलं. यानंतर अंजली कृष्णा नेमक्या कोण आहेत? अशी चर्चा राज्यात रंगली आहे. अजित पवारांनी यावेळी दोनवेळा मी उपमुख्यमंत्री बोलत आहे असं सांगितलं. 'मै डीसीएम बोल रहा हू. 'ये कारवाई बंद करो...मेरा आदेश हैं..', असं त्यांनी सांगितलं. त्यावर अंजली कृष्णा म्हणाल्या, "मेरे फौन पर कॉल करे". त्यावर दादा रागावून म्हणाले की, "तुम पे अॅक्शन लूंगा.. इतनी डेरिंग है तुम्हारी. मेरा चेहरा तो पेहचानोगा ना?". आता हा संवाद घराघरात पोहोचला असून अंजनांबाबत राज्यातील विरोधी नेते व जनता जागृत झाली आहे. अंजना यांच पूर्ण नाव अंजना कृष्णा व्हीएस आहे. त्या भारतीय पोलिस सेवेतील आयपीएस अधिकारी आहेत, ज्या सध्या महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात करमाळा येथे पोलिस उपअधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. आपल्या प्रामाणिक आणि कठोर कार्यशैलीसाठी त्या ओळखल्या जातात. अंजली कृष्णा यांचा जन्म केरळमधील तिरुअनंतपुरम येथे झाला. त्यांचे वडील बिजू यांचा कपड्यांचा छोटा व्यवसाय आहे, तर आई सीना कोर्टात टायपिस्ट म्हणून काम करतात. त्यांचे प्राथमिक शिक्षण पूजापुरा येथील सेंट मेरीज सेंट्रल स्कूलमधून आणि उच्च शिक्षण तिरुअनंतपुरम येथील एचएचएमएसपीबी एनएसएस कॉलेज फॉर वुमनमधून झाले. अंजली कृष्णा यांची गणना कुशाग्र आणि प्रामाणिक आयपीएस अधिकाऱ्यांमध्ये केली जाते.

# मराठा समाजाला आंदोलनाची वेळ यायलाच नको!

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच झालेले आंदोलन केवळ काही मागण्यांचा उच्चार नाही, तर समाजाच्या अस्तित्वाची व सन्मानाची ती हाक होती. या आंदोलनाला शांतता, संयम आणि सामाजिक सलोख्याचा आधार होता. महिलांचा सन्मान राखणे, शासकीय संपत्तीचे रक्षण करणे, कायदा हातात न घेणे या त्यांच्या सूचनांमुळे हे आंदोलन लोकशाहीचा आदर्श ठरले. गरीब कुटुंबांसाठी शिक्षण आणि नोकरीच्या संधी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शासनाने केवळ तात्पुरते आश्वासन न देता कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून पुढे पुन्हा आंदोलन करण्याची वेळ समाजावर येणार नाही. महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासात मराठा समाजाने स्वराज्य स्थापनेपासून ते आजच्या घडीपर्यंत शौर्य, बलिदान, त्याग व कर्तृत्वाचा सुवर्ण अध्याय लिहिला आहे. राज्याच्या सामाजिक-आर्थिक घडणीत आपला रक्ताचा प्रत्येक थेंब वाहणाऱ्या या समाजाची आज अवस्था अत्यंत वेदनादायी व हृदयद्रावक आहे.

आज मराठा समाजाचा निष्ठावंत पुत्र, जनतेच्या हक्कांसाठी झगडणारा नेता मनोज जरांगे पाटील हे आरक्षणाच्या न्याय्य मागणीसाठी आमरण उपोषणास बसले होते. त्यांच्या उपोषणामुळे संपूर्ण महाराष्ट्राच्या जनमानसात तीव्र अस्वस्थता निर्माण झाली होती. समाजातील प्रत्येक कुटुंब, प्रत्येक तरुण, प्रत्येक शेतकरी हा त्यांच्या लढ्याशी आत्मीयतेने जोडला गेला होता. मराठा हा तो प्रवाह आहे जो एकदा वहायला लागला की, त्याखाली भले भले नेस्तनाबूत होतात. ही ताकद ही ऊर्जा साडेतीनशे वर्षांनंतरही या रक्तात अशीच आहे. एवढं लढण्याचं बळ छत्रपती शिवराय देऊन गेले आहेत. अन्यायाविरुद्ध लढण्याचं धाडस हे मराठ्यांना छत्रपतींच्या संस्कारातून जन्मतःच मिळालं आहे. मग भले समोर कोणीही कितीही बलाढ्य असो त्याला नडण्याची धमक हा समाज करतो. इतिहासाच्या पानात राष्ट्रावर आलेल्या बलाढ्य शासकाना या समाजाने दिल्लीत जाऊन पाणी पाजले आहे असा लढवय्या इतिहास या समाजाला आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात अलीकडे जे निसर्गचक्र बिघडले आहे, जे जागतिक हवामान बदलाचा भाग आहे, त्यामुळे सामान्य मराठा शेतकरी शेतीतून केवळ पोटा पाण्यापूरते जमवू शकतो अशी दयनीय स्थिती त्याची झाली आहे. शिवाय भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रातील मध्य भागाला दख्खनचे पठार म्हणतात. पठारी स्वरूपाचा प्रदेश आहे त्यात पाण्याची अत्यंत टंचाई आहे. त्यामुळे सुविधांचीही वानना आहे. याकारणाने या ग्रामीण भागातील मराठा समाजाला न्याय अपेक्षित होता. सामान्य मराठा बांधवांना त्यांचा न्याय त्यांच्या पद्धतीने मिळत असेल तर इतरांनीही तो मोठ्या मनाने मान्य करावा. केवळ आपला त्यात काहीही संबंध नसताना त्याबद्दल काहीही बरळू नये. शिवाय तुम्ही चार सुखाचे घास खात असाल तर ते तसेच सुखाने खावे. इतरांच्या यशाचा द्वेष बाळगू नये. कारण लढा लढणाऱ्यांच्या मेहनतीचे ते यश असते. त्यांना त्यांचा विजय साजरा करू द्यावा आणि इतरांच्या यशातच आनंद मानणे हेच निरोगी मानसिकतेचे लक्षण आहे ही समज असणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्यांचा उद्धार झाला त्यांना त्यांचा घास खाऊ द्यावा, उगाचच त्यात येऊ इच्छित नसणाऱ्यानी किंवा संबंध नसणाऱ्यानी काहीही वेडीवाकडी वक्तव्य करू नयेत. बाकी मराठा शेतकरी हा ज्याप्रमाणे गावगाड्याचा भाग आहे तो गावगाड्यात एकोप्याने राहतो, यापुढेही तो असाच राहील आणि ज्यापद्धतीने यावेळी अनेक जण माणुसकीच्या नात्याने मराठा बांधवांना मदत करण्यासाठी पुढे सरसावले त्यांचे सहकार्य समुद्राच्या रूपाने वेळप्रसंगी मराठा समाज परत करेलही. चुकीला चूक आणि बरोबरला बरोबर म्हणत नेहमी हा समाज सर्व जाती घटकांशी मिळून मिसळून राहत होता यापुढेही राहील.

शेवटी आंदोलन करणाऱ्या नेतृत्वाच्या तब्येतीचा विचार करणे आवश्यक आहे. त्यात मनोज जरांगे पाटील चळवळीतून तावून सुलाखून आलेले आहेत. त्यामुळे आरक्षणाची एकेक शिडी पार करत आजपर्यंत यश मिळाले. जवळपास ५८ मोर्च्यांनी मशागत केली. त्यावर रोपाची लागवड करून फळ चाखायला देण्याचं काम जरांगे पाटीलांनी केले आहे. त्यामुळे छत्रपतींच्या स्वराज्यातील गनिमी काव्याचे मूर्तिमंत उदाहरण या आंदोलनात दिसले.

गावखेड्यातला मराठा आंदोलनाच्या निमित्ताने मुंबईत पोहोचला होता. तो शेतीवाडीत राबणारा, धान्य पिकवणारा आहे. गुरं ढोरांच शेण काढणारा आहे. यातले अनेक अल्पभूधारक आहेत. मजूर आहेत, ड्रायव्हर आहेत, गावाकडे छोट छोटे उद्योग करणारे हे बहूजन मराठीजन आहेत. जगण्याच्या, शेतीच्या, पोरांच्या शिक्षणाच्या, नोकरीच्या संबंधी त्याच्या विविध अडचणी आहेत.

आरक्षणाच्या निमित्ताने त्या अडचणींवर उपायांची त्यांची मागणी होती. मागणी करण्याचा, आपली व्यथा सांगण्याचा नैतिक अधिकार सर्वांना आहे. मुंबईला जगवण्यात, वाढवण्यात यांच खेडवळ मराठीजणांचा वाटा आहे. त्यांनी पिकवलेलं धान्य, भाजी पाला, दुध मुंबईतल्या लोकांना रोज लागतं. पण हे मराठीजन मराठा आंदोलक मुंबई पासून कायम दूर राहिले.

मुंबई मोठं शहर, देशाची आर्थिक राजधानी. देशभरातून आलेले माणसांचे लोंढे, ऊंच इमारती, झगमगाट, गाड्याच्या रांगा, गोंगाट. मुंबईतला दमटपणा हे सगळं गावखेड्यातल्या लोकांना नकोसं. पण यावेळी आपल्या मागण्या, अडचणी घेवून त्यांनी इर्षेने मुंबई गाठली. जरांगे पाटलांच्या हाकेला ओ दिली. पहिला दिवस अडचणीत गेला. प्यायला पाणी नाही, जेवायला अन्न नाही, राहण्याची व्यवस्था नाही. कृत्रिम अडचण निर्माण केली गेली होती.

काहींनी लालबागच्या राजाचा दरवाजा बंद केला, तर दुसरीकडे मुसलमानांनी आपल्या



मशिदी या मराठाजनांसाठी खुल्या केल्या, पाण्याची, जेवणाची सोय झाली. जरा कड काढली. पण मागे न हटता मुंबईतच मुक्काम पक्का झाला. दुसऱ्या दिवसापासून गावाकडून शिदोऱ्या पोहोच झाल्या. आणि सुरु झालं या गावखेड्यातल्या मराठी जनांचं हटके आंदोलन.

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

यातल्या कित्येकाने आपली मुंबई, आपल्या मराठीजनांनी छाती वर गोळ्या झेलून मिळवलेली, आपल्याच लोकांनी ऊभी केलेली मुंबई पाहिलेली नव्हती. यांना मुंबईचं कौतूक होतं. पण मनात संकोच होता मुंबईत जाण्याचा, वावरण्याचा. या आंदोलनाच्या निमित्ताने तो संकोच दूर झाला.

जगातल्या सर्वात मोठ्या, जून्या महानगरपालिकेच्या समोर उघडे होवून, शड्डू ठोवून अंघोळी करणारे हे गावगाड्यातले मराठीजन पाहिले अन् ही मुंबई आपलीच, आपल्या पासून कोणी मुंबई काढून घेवू शकत नाही, असं मनोमन उमटायला लागलं.

आंदोलकांनी डान्स करणं, विविध खेळ खेळणं अगदी मैदानावर कुस्ती, कबड्डी देखील लढणं. हे सगळं अभुतपूर्व होतं. अनेकांनी आयुष्यात कधी समुद्र पाहिला नव्हता; ते मरिन ड्राईव्ह वर समुद्राला स्पर्श करत होते. ताज हॉटेल, गेट वे ऑफ इंडिया ज्यांनी फक्त सिनेमात पाहिलं ते जवळून पाहत होते. जगण्यातला अनोखा, अनपेक्षित आनंद मराठी अर्थात मराठा आंदोलक मिळवत होते.

गेल्या नऊ दहा वर्षात चाललेला हा शांततेतला संघर्ष मुंबईच्या नावाखाली बदनाम होवू नये म्हणून मानवी जगण्यातला आनंद कायम राहावा. बाकी गुजराथी, मारवडी, जैन, पारशी अन् उत्तर भारतातल्या अनेक परप्रातियांनी या मराठीजनांच्या मुंबईवर आपलं अघोषीत वर्चस्व स्थापित केलं आहे. त्या सर्वांना या आंदोलनाच्या निमित्ताने एकच संदेश आहे की ही मुंबई आम्हा मराठाजनांची आहे व कायम राहिल.

मुंबईत पोहोचलेले मराठे आंदोलन संपले म्हणून शांततेने घरी गेले. पण आपल्या हाती काय लागले, याचा आता विचार करण्याची वेळ आली आहे. शासन निर्णय मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटिअरमधील नोंदींच्या आधारावर कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करतो.

वरवर पाहता, हा जीआर समाजाच्या मागणीला प्रतिसाद देणारा वाटतो, परंतु त्यात अनेक कायदेशीर आणि व्यावहारिक अडचणी असाव्यात असे वाटते.

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५०% पेक्षा जास्त नसावी, असा स्पष्ट निर्णय दिला आहे. यापूर्वी मराठा समाजाला दिलेले आरक्षण याच कारणामुळे रद्द झाले होते. हा जीआर जरी कुणबी जातीच्या प्रमाणपत्राचा मार्ग दाखवत असला तरी, मोठ्या संख्येने मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश झाल्यास, ते ५०% ची मर्यादा ओलांडेल आणि पुन्हा न्यायालयात याला आव्हान दिले जाईल. ज्यामुळे प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची होते.

प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या किंवा पूर्वजांच्या कुणबी नोंदी असलेले दस्तावेज सादर करावे लागतील. जर असे दस्तावेज नसतील, तर 'नातेसंबंधातील' व्यक्तीचा दाखला विचारात घेतला जाईल. परंतु, आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील यांची मुख्य मागणी 'सरसकट' मराठा समाजाला कुणबी दर्जा देण्याची आहे.

सरकारला माहित आहे की 'सरसकट' जीआर न्यायालयात टिकणार नाही. म्हणून, हा जीआर एकप्रकारे केवळ प्रक्रिया निश्चित करतो, ज्यामुळे सरकारला कायदेशीर पेचप्रसंगातून तात्पुरता दिलासा मिळतो, परंतु समाजाची मागणी पूर्ण होत नाही. आता इतर मागासवर्गीय संघटनांकडून तीव्र विरोध होण्याची शक्यता आहे.

त्यांचा असा आरोप आहे की मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्रे देऊन सरकार 'मागच्या दाराने' त्यांना ओबीसी आरक्षणात प्रवेश देत आहे. यामुळे ओबीसी समाजाच्या हक्कांवर गदा येईल. यामुळे राज्यात दोन समाजांमध्ये सामाजिक तणाव वाढू शकतो आणि पुन्हा न्यायालयात आव्हान दिले जाईल.

'नातेसंबंधातील' व्यक्तींच्या पुराव्यांवर आधारित दाखले देण्याची तरतूद आहे. या तरतुदीमुळे कुणबी दाखला असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या रक्ताच्या आणि नात्यातील व्यक्तींना दाखले मिळणे सोपे होईल. हे प्रावधान मोठ्या प्रमाणात वादाचा विषय बनले आहे आणि यामुळे मोठ्या प्रमाणावर 'बनावट' दाखले तयार होण्याचा धोका आहे. सरकार एका बाजूला मराठा समाजाची मागणी मान्य करत असल्याचे भासवते, पण दुसऱ्या बाजूला ते ज्या कायदेशीर मर्यादांमध्ये काम करत आहे, त्या मर्यादा समाजाला पूर्णपणे स्पष्ट करत नाही.

हा एकप्रकारे राजकीय तोडगा आहे, कायदेशीर नव्हे. सरकार दाखले मिळवण्याची प्रक्रिया सुलभ करत असल्याचे सांगत असले तरी, प्रत्यक्षात पुराव्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर टाकली आहे. यामुळे अर्जदारांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. कुणबी नोंदी शोधण्यासाठी समितीला ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत मुदतवाढ दिल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ, सद्यस्थितीत तातडीने दाखले मिळणे शक्य नाही. हे केवळ आंदोलन शांत करण्यासाठी वेळकाढूपणा करत असल्याचा संशय निर्माण होतो.

थोडक्यात, हा शासन निर्णय मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याच्या दिशेने एक पाऊल असले तरी, तो 'अर्धवट' आहे. तो एक तात्पुरता राजकीय उपाय आहे, जो दीर्घकाळ टिकणार नाही आणि भविष्यात अनेक कायदेशीर वाद निर्माण करेल. सरकार जनतेची दिशाभूल करत नसले तरी, कायदेशीर मर्यादांमुळे पूर्ण मागणी मान्य करणे शक्य नाही, हे स्पष्टपणे सांगण्याऐवजी, प्रक्रियात्मक उपाययोजनांवर जास्त भर देत आहे.

तरी पण असे म्हटले जाते की, शंभर टक्के गुण मिळवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्याला कधी कधी ९०% वरही समाधान मानावे लागते. पण नेसन तर नऊवारी नेसल नाहीतर... या म्हणी प्रमाणे उगाच आडून बसून प्रश्न सुटत नसतात. पाटलांनी घेतलेला आजचा निर्णय योग्यच आहे. नुकसान न होता कमावले यातच दुहेरी फायदा आहे!



## बाप्पा नका ना जाऊ....!!

निघालात बाप्पा तुम्ही ऊर येतोय भरून
पावसानं आभाळ भरलंय कंठही आलाय दाटुन

ढोल ताशांचा नाद चहूकडे घुमतोय
सूर तालाच्या आवाजात निरोप तुम्हाला देतेय

मन मात्र माझं कासावीस झालंय बाप्पा
तुम्ही गेल्यावर मी सांगा कोणाशी मारू गप्पा

होता तुम्ही तेव्हा मनाचं घर किती आनंदलेलं
चैतन्याचं तोरण जणू हृदयाच्या दाराला लावलेलं

निघालात तुम्ही बाप्पा बघा आरास कशी रुसली
तुम्ही येणार म्हणून किती हौशीने होती सजली

होता तेव्हा तुम्ही आनंदाला नव्हता पारावार
जाताय बाप्पा आम्हाला आता कुणाचा असणार आधार

वाटतंय बाप्पा मला आता सोबत तुमच्या यावं
पालक माझे तुम्ही मी बालक बनून चालावं

चालता-चालता तुमच्यात स्वतःला विसरून जावं
बाप्पा-बाप्पा बोलत तुमच्या नामात एकरूप व्हावं

आल्या दिवसापासून कसा मोदक नैवेद्याचा सजलेला थाट
किती अवघड जाईल वर्षभर पहावी लागेल तुमची वाट

रोज गोड धोड प्रसाद रोज रंगायची आरती छान
जाताय आज तुम्ही या विचारानेच हरवलाय भान

दर्शनासाठी किती लागायची भक्तांची रांग
आता हे काहीच नसेल कसं मन रमेल बाप्पा तूच सांग

म्हणूनच म्हणते बाप्पा नका ना जाऊ या ना परत
आसनावर विराजमान व्हा आशीवार्दाचा हात वर करत

बाप्पा या ना परत
तुम्ही या ना परत

■ **ज्योती रावराणे**
**कांजूरमार्ग, मुंबई.**

■ ■ ■

## तुम्ही तुमच्या मुलाला तुमच्या आवडीचे नाव देवू शकत नाही





**डेन्मार्कमध्ये पालकांना त्यांच्या मुलांची नावे त्यांच्या आवडीनुसार ठेवण्याचे स्वातंत्र्य नाही. याचे कारण म्हणजे २००६ पासून लागू असलेला वैयक्तिक नावे कायदा.**



**याअंतर्गत,** पालकांना सरकारने तयार केलेल्या ७००० नावांच्या यादीतून त्यांच्या मुलाचे नाव निवडावे लागते. त्यात सुमारे ४००० मुलींची आणि ३००० मुलांची नावे आहेत.

**सरकारचे म्हणणे आहे की हे नाव मुलांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करते. विचित्र किंवा मजेदार नावे मुलांसाठी समस्या बनू शकतात. म्हणून, अशा नावांवर बंदी घालण्यासाठी कायदा करण्यात आला आहे.**



**जर एखाद्या पालकाला यादीबाहेर नाव ठेवायचे असेल तर त्यांना सरकारच्या नाव तपासणी विभागाची परवानगी घ्यावी लागेल. त्यांना ते नाव का ठेवायचे आहे हे स्पष्ट करावे लागेल.**

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात...

(कालच्या अंकावरून पुढे)

-------------------

अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये, संस्थांचे मालक शिक्षकांशी वाईट वागतात आणि त्यांना त्यांच्या वैयक्तिक कामात व्यस्त ठेवतात. अनेक संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार महिने आणि वर्षे प्रलंबित ठेवले जातात, काही ठिकाणी पदोन्नती थांबवल्या जातात आणि मानसिक छळही केला जातो, म्हणूनच शिक्षकांमध्ये आत्महत्यांच्या घटनाही वाढत आहेत.

शिक्षणाच्या जगात आता विद्यार्थ्यांचे एक नवीन रूप दिसून येत आहे; लहान मुले देखील त्यांच्या शाळेच्या बॅगमध्ये नको असलेल्या वस्तू घेऊन फिरताना आढळतात, ज्यामध्ये अंमली पदार्थ, घातक शस्त्रे देखील असतात. पूर्वी, शिक्षक चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करत असले तरी पालक त्याला काही विशेष आक्षेप घेत नव्हते. आता, चुकांसाठी विद्यार्थ्यांना मारहाण करणे तर दूरच, त्यांना फटकारणे देखील शिक्षकांना गुन्हा वाटू लागते.

डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

काही महिन्यांपूर्वी, पंजाब आणि हरियाणामध्ये, शालेय विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुख्याध्यापकांची चाकूने वार करून हत्या केली. आता शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षकांना धमकावल्याच्या घटनाही सातत्याने समोर येत आहेत. आपल्या देशात बालगुन्हेगारांचा ग्राफ झपाट्याने वाढत आहे. पालक व्यस्तता दाखवत आहेत,

शिक्षक व्यावसायिक होत आहेत, मग देशातील पिढी गुन्हेगारीच्या दलदलीत अडकणे अपरिहार्य आहे. महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, २०२२ सालच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, अल्पवयीन गुन्हेगारांच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे, त्यानंतर मध्य प्रदेश, राजस्थान, तामिळनाडूचा क्रमांक लागतो.

लोक म्हणतात की सरकारी शाळांची अवस्था वाईट आहे, मग तिथल्या शिक्षकांना पगार तर भरपूर मिळतो, तर शैक्षणिक गुणवत्ता का सुधारत नाही. दुसरीकडे, देशातील बहुतेक खाजगी संस्थांमध्ये शिक्षकांचे पगार खूपच कमी आहेत, मग अशा परिस्थितीत देशाची शिक्षण व्यवस्था कशी मजबूत होईल? शैक्षणिक गुणवत्तेचा स्तर कसा वाढेल? खाजगी संस्थांमध्ये, कमी पगाराचा शिक्षक देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी मनापासून चिकाटीने आणि मेहनतीने कसा काम करू शकतो? जेव्हाकी त्या शिक्षकाचा वर्तमान स्वतः अंधारात आहे.

देशातील बहुतेक ठिकाणी ही परिस्थिती आहे, हे सर्व पाहता, आजचा शिक्षक खरोखरच देशाच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याचा शिल्पकार म्हणण्यास पात्र आणि सक्षम आहे का? केंद्रीय विद्यालय, आयआयटी, आयआयएम, एम्स सारख्या शैक्षणिक संस्था प्रत्येक गावाची, प्रत्येक शहराची गरज आहेत, प्रत्येक विद्यार्थ्याला कोणताही आर्थिक भेदभाव न करता समान दर्जाचे शिक्षण मिळालेच पाहिजे.

बिहारमधील खाजगी कोचिंग सेंटरचे प्रसिद्ध शिक्षक खान सर यांनी अलिकडेच दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, देशातील सरकारी शिक्षण व्यवस्था अतिशय वाईट परिस्थितीतून जात आहे, ज्याचा पुरावा म्हणजे खाजगी कोचिंग सेंटर विद्यार्थ्यांनी खचाखच भरलेले आहेत. शिक्षणासाठी खाजगी कोचिंग सेंटर्सवरील विद्यार्थ्यांचे अवलंबित्व प्रचंड वाढत आहे. सर्व विद्यार्थ्यांना नाममात्र पदवी मिळाली तरी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास त्याच्या उद्दिष्टापासून खूप दूर राहील.

आपण आपल्या आयुष्याचा सर्वात मोठा भाग शिक्षणात म्हणजे आपले शरीर, मन आणि पैसा खर्च करतो. जर ते शिक्षण आपल्याला चांगले राहणीमान प्रदान करण्यास सक्षम असल्याचे सिद्ध झाले तर ते चांगले आहे, अन्यथा जीवन एक संघर्षच बनून राहते, जे आपण बघतच आहोत. जोपर्यंत शिक्षकांना समाजसुधारक म्हणून त्यांची भूमिका समजत नाही, तोपर्यंत देशाच्या पिढीच्या उज्ज्वल भविष्याबद्दल प्रश्न उपस्थित होत राहतील.

■ ■ ■

## देवाचे देवपण राहू द्या!

वाचक लिहितात

सार्वजनिक गणेश उत्सव म्हणजे गणपती बाप्पांचा जयजयकार करून वातावरण भक्ती पूर्ण आनंदी करण्याचा उत्सव. गणपती हा सुखकर्ता, दुखहर्ता, विघ्नहर्ता, मंगलमय करणारा, १४ विद्येचा अधिपती, सर्वप्रथम पूज्यनीय, वंदनीय, बुद्धी दाता, ज्ञानदाता असून या दहा दिवसात जागृत राहून आपल्या भक्ताला नवचैतन्य देऊन हजार पटीने कार्यरत असतो. पूर्वी गणपती उत्सवाचे स्वरूप धार्मिक, प्रेरणादायी होते. भक्तांनी केलेली भावपूर्ण सजावट, भजनी मंडळांचे सुरेख पोशाख आणि मधुर भक्ती गीत, गाण्याचा कार्यक्रम, विविध प्रकारचे खेळ, चर्चासत्र, स्पर्धा असा भावपूर्ण सोहळा असायचा.

आजच्या काळात पूर्वीचे धार्मिक उत्सवाचे स्वरुप लोप पावत आहे. गणपतीचे चित्र छापलेली पत्रिका घरोघरी अंगणात तर कधी रस्त्यावर पडलेली दिसते. त्यावर लोकांचे पाय पडतात. कधी वाऱ्याने कचऱ्यात पत्रिका पडलेल्या आढळतात. हल्ली मनुष्य देवाचे देवपण विसरत चालला आहे. सार्वजनिक मंडळांमध्ये स्पर्धा आहे. स्वतःचा उदो उदो होण्यासाठी प्रदर्शन, भव्य झाक्या ठेवून, गणपतीचे चित्र असलेले विचित्र पोशाख घालून स्त्रियांबरोबर नाचत आहे.

ही देवाची विटंबना होत आहे. गणपतीचे दर्शन घेण्यासाठी पैसे घेऊन पावती देतात. त्या पावतीवर देखील गणपतीचे चित्र असतं. ती पावती देखील पायदळी तुडवल्या जाते. ह्या गोष्टी तरुण पिढीला केव्हा समजेल? सार्वजनिक गणपती लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सुरू केला तो उद्देश सांगायला हवा. ज्या गणपतीची तुम्ही पूजा करता, त्याचे चित्र पायदळी तुडवता यामुळे त्या देवतेचा अपमान होतो, विडंबन होतं हे मंडळांना लक्षात आणून द्यायला हवे.

आमच्या लहानपणी गणपतीचे विसर्जन आता होणार या कल्पनेनेच डोळ्यात अश्रू यायचे. आताच्या ह्या काळात लोकांचा सात्विक भाव कमी होत चाललेला आहे. काही ठिकाणी अनंत चतुर्दशीला गणपती विसर्जन न करता पितृपक्षात विसर्जन करतात.जणू त्यांच्या हातात सर्व देवांचं देवपण आल्यासारखं झाले आहे.

काही लोक अनंत चतुर्दशीला विसर्जन करण्याच्या वेळेला मिरवणूक काढतात. डीजे चा आवाज इतका कर्कश आणि त्यावर फिल्मी गाने लावतात. सर्वजण मद्यधुंद होवुन नाचतात. स्वतःचाच मनोरंजनाचा कार्यक्रम करतात आणि सगळ्यात पाठीमागे गणपतीची गाडी ठेवतात. ह्या सर्व गोष्टी दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहेत.

मी गणपती रायाला एवढीच प्रार्थना करते,' चांगली बुद्धी व सात्विक भाव या लोकांच्या मनात आणून आध्यात्मिक शक्ती जागृत होवु दे. ह्या गोष्टीला आळा घालण्याची शक्ती आम्हाला दे .देव हा भावाचा भुकेला आहे दिखावू पणाचा, नेतागिरीचा देव नाही. देवाचे देवपण राखा. देवाचा खेळ मांडू नका.सर्वांनी उत्सव सात्विक भावाने साजरा करुया.अशी गणपती चरणी प्रार्थना करूया.

■ **सौ. पल्लवी देशपांडे**
**पद्मनाभपूर, दुर्ग.**

■ ■ ■

## पारंपारिक वाद्य नामशेष

आधुनिक काळात सण आणि उत्सव साजरे करण्याची पद्धत बदलल्यामुळे अनेक बदल झाले आहेत. या बदलांचा अयोग्य परिणाम समाजमनावर होत आहे. गणेशोत्सवाच्या काळात वाद्यांच्या गजरात गणेशाचे आगमन होते. वाद्य वाजवून गणेशाचे स्वागत केले जाते. विसर्जन मिरवणुकीच्या वेळेस देखील गणेशाला निरोप देताना वाद्य वाजवली जातात.

परंतु सध्याच्या काळात झांज, लेझीम, नगारा, ढोल, ताशा यांची जागा डीजे आणि डॉल्बी यांनी घेतली आहे. डीजे-डॉल्बी यांच्या कर्णकर्कश्य आवाजामुळे समाजाला त्रास होतो. शाळा, हॉस्पिटल्स यांच्या परिसरातून मिरवणूक जाताना डीजे आणि डॉल्बी यांच्या आवाजाचा विद्यार्थ्यांना आणि हॉस्पिटल्समधील रुग्णांना त्रास होऊ शकतो. हृदयविकाराचा धोका असतो.पर्यावरण, जीवसृष्टीची हानी होते. कांठाळ्या बसवणाऱ्या आवाजामुळे कर्णदोष निर्माण होण्याची भीती असते.

पारंपारिक वाद्य वाजवताना त्या कलाकारांना त्यांची कला दाखवण्याची संधी मिळते. वाद्ये वाजवून उपजीविका करणाऱ्यांना त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नापासून वंचित रहावे लागते. डीजे आणि डॉल्बी यांच्या मदतीने रिमिक्स असलेली कर्णकर्कश्य वाद्ये वापरण्याऐवजी झांज,लेझीम, नगारा, ढोल, ताशा अशी वाद्य वाजवून गणेशाच्या मिरवणुकीमध्ये सात्विक गाणी आणि सात्विक संगीत लावल्यास सणाचा आनंद द्विगुणीत होऊ शकतो.

■ **भीमराव साळुंखे. सातारा.**



## वारंवार छातीत जळजळ किंवा ॲसिडिटी?

अवेळी झोप, जेवण किंवा धावपळीच्या दिनक्रमात जेवणाच्या चुकलेल्या वेळा आणि अनहेल्थी खाणं यामुळे ॲसिडिटी होणं सामान्य आहे. तर कधी कधी जास्त मसालेदार पदार्थ खात असाल, आंबट पदार्थ खात असाल तरी देखील बऱ्याचदा छातीत जळजळ होण्याची समस्या, पोटात दुखण्याची समस्या जाणवू लागते. या मागील कारण म्हणजे ॲसिडिटी. ॲसिडीटच आहे असं समजून आपण दुर्लक्ष करतो. पण दरवेळी ॲसिडिटी म्हणजे फक्त आपल्या खाण्या-पिण्यामुळे झालेली सामान्य बाब नसून बऱ्याच आजारांची लक्षणे असू शकतात.

आम्लपित्त ही एक अशी समस्या आहे ज्यामध्ये पचनसंस्थेचे नैसर्गिक संतुलन बिघडते. या स्थितीत अस्वस्थ लक्षणे दिसू लागतात. या आजारावर उपचार करणे कठीण नाही. जीवनशैलीत छोटे बदल करून या आजारावर सहज उपचार करता येतात. यासाठी योग्य कारणे ओळखणे महत्त्वाचे आहे. कारण वारंवार आम्लपित्त येणे ही केवळ पचनाची समस्या नाही तर अनेक गंभीर आजारांचे लक्षण असू शकते.

**गॅस्ट्रोएसोफेगल रिफ्लक्स रोग**

जर वारंवार छातीत जळजळ होत असेल, तोंडात आंबट पाणी येत असेल किंवा घशात आंबटपणा येत असेल तर ही ऋफऊ म्हणजेच गॅस्ट्रोएसोफेगल रिफ्लक्स रोगाची लक्षणे असू शकतात. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये पोटाच्या वरच्या भागात आम्लाचे प्रमाण वाढते. यामुळे रुग्णाला अपचन, उलट्या, पोटात अस्वस्थता, त्वचेची जळजळ, आंबट ढेकर येणे, पोट फुगणे आणि मळमळ अशा अनेक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागू शकते.

**अल्सरमुळे होणारी आम्लता**

वारंवार आम्लपित्त होणे हे देखील पोटाच्या अल्सरचे लक्षण असू शकते. अल्सर म्हणजे पोटाच्या आतील आवरणावरील जखमा. हे जखमा जास्त आम्लपित्त असलेल्या औषधांच्या दीर्घकाळ वापरामुळे किंवा पोटात एच. पायलोरी संसर्ग निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाच्या वाढीमुळे होतात.

**जठराची सूज** : जर पोटाच्या आतील आवरणाला अनेक वेळा सूज येत असेल तर या स्थितीला गॅस्ट्राइटिस म्हणतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे जास्त प्रमाणात शरीरात आम्ल निर्माण होणे आणि पोटाच्या आरोग्यावर सतत परिणाम होणे. या स्थितीत वारंवार पित्त होणे, भूक न लागणे, उलट्या होणे किंवा मळमळ होणे अशी लक्षणे दिसून येतात.

**पित्ताशयाचे खडे होणे** : कधीकधी पित्ताशयात खडे असले तरी वारंवार आम्लपित्त होण्याच्या समस्या निर्माण होतात. तेलकट आणि जड अन्न खाल्ल्यानंतर रुग्णाला जास्त जळजळ आणि अपचन जाणवते.

**स्वादुपिंडाचा दाह** : पोटाच्या मागे असलेल्या स्वादुपिंडात जळजळ झाल्यास सतत आम्लता, उलट्या आणि पोटदुखीची तक्रार असते. ही एक गंभीर स्थिती आहे, ज्यामध्ये ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

ॲसिडिटीची समस्या 3 ते 4 आठवड्यांपेक्षा जास्त काळ सुरू आहे. ॲसिडिटीसाठी औषध घेतल्यानंतरही आराम मिळत नाही. खाल्ल्यानंतर लगेच पोटात जडपणा किंवा वेदना जाणवणे व अन्य त्रास असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### जय हो महाभूपती..!

ज्यांची मनोभावे
करीता भक्ति
जीवनातील विघ्ने
दूर होती
आम्ही नमितो
असा जो तो
पार्वतीनंदन महाभूपती !

कार्यारंभी श्रध्दा सदभावनेने
जो पुजे महाभूपती
निर्विघ्न त्यांचे
कार्य पार पडे
अशी भक्तांना
येतसे अनूभूती ..!

शक्ति युक्तिचा तो दाता
म्हणुनी म्हणती विघ्नहर्ता
जगा व जगू द्या चा संदेश
देई तो आपल्या भक्ता ..!



## आंध्र प्रदेशने गिनीज रेकॉर्ड रचला: २४ तासांत १.६३ लाख लोकांनी स्टार्टअपसाठी साइन अप केले

**नागपूर, ५ सप्टेंबर :** आंध्र प्रदेश इनोव्हेशन सोसायटीने स्टार्टअप्स आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यात एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. संस्थेने २४ तासांत उद्योजकता/स्टार्टअप/व्यवसाय कार्यक्रमासाठी ऑनलाइन साइन अप करणाऱ्या सर्वाधिक लोकांचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. १९ ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० ते २० ऑगस्ट रोजी दुपारी १२:३० दरम्यान १,६३,२५४ नोंदणींसह हा विक्रम रचला गेला.

आविष्करण आंध्र मोहिमेअंतर्गत हा पराक्रम साध्य करण्यात आला, ज्याचा उद्देश विद्यार्थी, गृहिणी, नवोन्मेषक आणि तरुणांना नाविन्यपूर्ण आणि उद्योजकीय विचारसरणी स्वीकारण्यास प्रेरित करणे आहे. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट तळागाळात स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देणे आणि रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाला चालना देणे आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि आंध्र प्रदेश इनोव्हेशन सोसायटीचे सीईओ सूर्या तेजा यांना गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र गिनीजचे अधिकृत निर्णायक ऋषी नाथ आणि रणनीतिकार निश्चल बारोट यांनी एका औपचारिक समारंभात प्रदान केले. या विक्रमी प्रयत्नासाठी रणनीती आणि प्रमाणपत्र प्रक्रियेचे नेतृत्व बारोट यांनी केले.

राज्याचे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री कोंडापल्ली श्रीनिवास आणि उद्योग आणि आयटी मंत्री नारा लोकेश यांच्यासह अनेक उद्योग क्षेत्रातील दिग्गज यावेळी उपस्थित होते. उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि राज्याच्या भविष्याला एक नवीन दिशा देण्यासाठी आंध्र प्रदेश सरकारच्या प्रयत्नांचे या सर्वांनी कौतुक केले.

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी आंध्र प्रदेशच्या स्टार्टअप इकोसिस्टमसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आणि एक कुटुंब, एक उद्योजक या ध्येयाचा पुनरुच्चार केला.

भारतातील विविध राज्यांसाठी आतापर्यंत ६३ गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रयत्नांचे यशस्वी नेतृत्व करणारे निश्चल बारोट यांनी ही कामगिरी जागतिक स्तरावर आंध्र प्रदेशची ओळख मजबूत करण्याच्या दिशेने एक पाऊल असल्याचे वर्णन केले.

या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमुळे आंध्र प्रदेशला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळते आणि प्रत्येक घरातील तळागाळात उद्योजकता आणि नवोपक्रमाच्या नवीन विचारसरणीच्या चळवळीची सुरुवात होते.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत पुष्पासमोर नात्याचे आव्हान

**मुंबई, ५ सप्टेंबर :** प्रेरणादायक कथानक आणि भावनात्मक दृष्ट्या समृद्ध व्यक्तिरेखा यांच्यामुळे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने प्रेक्षकांचे मन काबिज केले आहे. पुष्पा (करुणा पांडे) आपले वकील बनण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी धडपड करत आहे, पण येथेही तिच्यासमोर नवी आव्हाने येत आहेत, ज्यामध्ये तिच्या दृढतेची आणि तिच्या जवळच्या नातेसंबंधांचीही परीक्षा होत आहे. अलीकडच्या भागांमध्ये आपण पाहिले की, प्रोफेसर शास्त्री (गौरव चोप्रा) आणि त्यांच्या मुलीला, रिया (काजल)ला पुन्हा एकत्र आणल्याबद्दल पुष्पाला रोहिणीचा (प्रीतिका) सामना करावा लागतो. त्यानंतर, कादंबरी (वृंदा त्रिवेदी) जुगल (अंशुल त्रिवेदी) ला विश्वासात घेऊन सांगते की ती गरोदर असून त्याचेच बाळ तिच्या पोटात आहे.

आगामी भागांमध्ये पुष्पा भयंकर गोंधळात सापडलेली दिसेल. सोनल (भक्ती राठोड) दीप्ती (गरिमा परिहार)ची काळजी घेण्यासाठी पुष्पाच्या घरी राहायला येते. त्यामुळे बापोद्रा (जयेश भारभाया) शी सतत खटके उडू लागतात, कारण दोघांना आपापल्या मुलीची काळजी आहे. यामध्ये पुष्पाची पंचाईत होते. दुसरीकडे, पुष्पा प्रोफेसर शास्त्रीला कोयल (ईशा)ला मागणी घालण्यासाठी आग्रह करते. पण तिला कोयलचे धक्कादायक सत्य अजून समजलेले नाही. इकडे, जुगल जोपर्यंत बाप्पाची मूर्ती घरी घेऊन येत नाही, तोपर्यंत कादंबरी अन्नप्राशन करण्यास नकार देते. जुगल मात्र ही मागणी पुरवण्यास साफ नकार देतो.

पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, सध्या अनेक संकटे अनेक बाजूंनी पुष्पाच्या मागे लागली आहेत. घरच्या आघाडीवर सोनल आणि बापोद्रा आपापल्या मुलीवरून एकमेकांशी झगडत आहेत. तर बाहेर, राजवीर-कोयल आणि प्रोफेसर शास्त्रीच्या प्रकरणात ती गुंतली आहे. यात भर म्हणून, कादंबरी जुगलकडे हट्ट धरून बसली आहे त्यामुळे पुष्पा त्रासली आहे, तिला जुगलची काळजी वाटते आहे. असे कितीतरी वेळा झाले आहे की, आपल्याला वाटते की या दबावाखाली आपण तग धरू शकणार नाही, पण पुष्पाची भूमिका करताना मी हे शिकले आहे की, वादळ कितीही तीव्र असले तरी तुम्ही माघार घ्यायची नसते. माझ्या वैयक्तिक आयुष्यात देखील असे क्षण आले आहेत, ज्यावेळी व्यक्तिगत आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांमधील समतोल साधणे कठीण होऊन बसते, पण पुष्पाच्या भूमिकेने मला स्थिर राहण्यास आणि हळूहळू एक-एक समस्या सोडवण्यास शिकवले आहे.

## मारुति सुझुकीने लॉन्च केली ऑल-न्यू विक्टोरिस, अशी एसयूव्ही ज्यामध्ये आहे गॉट इट ऑल




**मुंबई, ५ सप्टेंबर :** भारतीय एसयूव्ही सेगमेंटला नव्याने परिभाषित करत मारुति सुझुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) ने आज आपली नवीनतम एसयूव्ही विक्टोरिस लॉन्च केली. नवीन बेंचमार्क्स स्थापित करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेली विक्टोरिस हायपर-कनेक्टेड टेक्नॉलॉजी, ऑल-राऊंड सेफ्टी, भविष्यकालीन व स्लीक डिझाईन आणि रोमांचक परफॉर्मन्स यांचा अप्रतिम संगम आहे, जी खऱ्या अर्थाने एक अशी एसयूव्ही आहे ज्यात आहे गॉट इट ऑल. पेट्रोल विथ स्ट्रॉन्ग हायब्रीड, ऑल ग्रिप सलेक्ट (४४) आणि सेगमेंट-फर्स्ट अंडरबॉडी टाकी डिझाईनसह पर्यावरणपूरक एस - सीएनजी तंत्रज्ञानासह उपलब्ध, विक्टोरिस आजच्या डायनॅमिक तरुणांसाठी विविध पॉवरट्रेन पर्याय देते. ग्राहक ऑल-न्यू विक्टोरिसची बुकिंग ११,००० रुपये मध्ये करू शकतात.

विक्टोरिस चे सादरीकरण करताना मारुति सुझुकी इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री हिसाशी ताकेउची म्हणाले, नव्या पिढीचा भारतीय ग्राहक तरुण आहे, जगभर फिरलेला आहे, हायपर-कनेक्टेड आहे, सामाजिकदृष्ट्या जागरूक आहे, तांत्रिकदृष्ट्या प्रगत आहे आणि पर्यावरणाबाबत संवेदनशील आहे. अशा ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आमची नवी एसयूव्ही विक्टोरिस ही आवश्यकतेनं गॉट इट ऑल असणे गरजेचे होते. विक्टोरिस हा लॅटिन शब्द आहे ज्याचा अर्थ आहे विजेता. आम्हाला विश्वास आहे की विक्टोरिस आपल्या अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्लीक डिझाईन, स्मार्ट आणि कनेक्टेड फीचर्स, ५-स्टार स्तरावरील सुरक्षा आणि विविध पर्यावरणपूरक पॉवरट्रेनसह भारतातील ग्राहकांची मने जिंकेल. विक्टोरिस च्या माध्यमातून आम्ही आमचे एसयूव्ही पोर्टफोलिओ आणि आमचा एकूणच बाजारातील हिस्सा अधिक मजबूत करत आहोत.

लॉंचिंगबद्दल बोलताना मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी (मार्केटिंग आणि सेल्स) पार्थो बनर्जी म्हणाले, मारुती सुझुकीमध्ये आम्ही नेहमी आमच्या ग्राहकांचे ऐकतो. आजची तरुण व गतिशील पिढी आपली गाडी ही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक मानते, ऊर्जावान, स्थिरचित्त, आत्मविश्वासू आणि नेहमी पुढे जाणारी. अगदी नवी व्हिक्टोरिस डिझाइन आणि इंजिनिअर करताना आम्ही हीच संकल्पना आमच्या टीमसमोर ठेवली. एसयूव्ही हा आज सर्वाधिक आवडता सेगमेंट असला तरी एसयूव्ही खरेदीदार आता बदलला आहे. ही नवी तरुण पिढी महत्वाकांक्षी, हायपरकनेक्टेड असून अनुभवसंपन्न जीवनशैलीला प्राधान्य देते. अगदी नवी व्हिक्टोरिस ही त्या बदलाला आमचे उत्तर आहे, डिझाईन, तंत्रज्ञान आणि बहुपयोगितेचा एक प्रगत संगम. ती खऱ्या एसयूव्ही डीएनए सह इंजिनिअर केली असून आजच्या ऑटोमोबाईल्स कशा असाव्यात यासाठी नवा मापदंड स्थापित करते. व्हिक्टोरिससह आम्ही केवळ आणखी एक एसयूव्ही लॉंच करत नाही, तर ड्रायव्हिंगच्या एका नव्या आयामाचा उत्सव साजरा करत आहोत, ज्यामध्ये खरोखरच गॉट इट ऑल आहे.

## अस्थिर बाजारपेठेत एसआयपी थांबवल्यास दीर्घकालीन मालमत्ता निर्मितीवर प्रभाव पडू शकतो

**नागपूर, ५ सप्टेंबर :** आपल्या रोड ट्रिपमध्ये कधी सरळसोट हायवे असतात तर कधी-कधी कठीण अडथळे येतात. तसेच गुंतवणूकीतही चढउतार असतात. बाजारपेठा अस्थिर होतात तेव्हा अनेक गुंतवणूकदारांना आपले सिस्टॅमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन्स (एसआयपी) रोखण्याची किंवा थांबवण्याची इच्छा होते. ही प्रतिक्रिया तात्काळ असली तरी तज्ञ अनिश्चित कालावधीत एसआयपी थांबवल्यामुळे दीर्घकालीन मालमत्ता निर्मितीवर परिणाम पडू शकतो असा इशारा देतात.

बाजारातील चढउतारांदरम्यान गुंतवणूकदारांनी थांबण्याचे कारण काय?

बाजारातील अस्थिरता अनेकदा भीती निर्माण करते. गुंतवणूकदारांना घसरत्या बाजारात एसआयपी सुरू ठेवल्याने आणखी नुकसान होईल, अशी भीती वाटते. थांबण्याचा मोह अल्पावधीत भांडवलाचे संरक्षण करण्याच्या इच्छेतून उद्भवतो. तथापि, ही बचावात्मक रणनीती अनेकदा गुंतवणूकदारांना कमी किमतीत खरेदी आणि चक्रवाढीच्या शक्तीचा फायदा होण्यापासून रोखून त्यांच्याविरुद्ध काम करते.

बाजारातील अस्थैर्य तात्पुरते आहे परंतु एसआयपी थांबवल्यामुळे तुमच्या दीर्घकालीन मालमत्तेच्या प्रवासाचे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते, असे मत एसबाय म्युच्युअल फंडच्या प्रवक्त्यांनी व्यक्त केले. एसआयपी बाजारातील विविध चक्रांमधून पुढे जाण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे शिस्तबद्ध गुंतवणूक करणाऱ्या ग्राहकांना दीर्घकाळात फायदा होतो.

एसआयपी थांबवल्याने गुंतवणूकदारांचे काय नुकसान होते

१. चक्रवाढीचे लाभ मिळत नाहीत- एसआयपीसाठी सातत्यपूर्णता खूप महत्त्वाची आहे. मध्येच थांबल्यामुळे चक्रवाढीचे चक्र थांबते आणि एकूणच मालमत्ता निर्मिती कमी होते.

२. रूपया खर्च सरासरीचे नुकसान अस्थिर बाजारपेठेमुळे कमी किमतीत अधिक युनिट्स खरेदी करण्याचा फायदा मिळतो. एसआयपी थांबवल्याने गुंतवणूकदारांना हा स्वयंचलित सरासरी लाभ गमवावा लागतो.

३. विलंबित आर्थिक उद्दिष्टे - निवृत्तीसाठी बचत असो, मुलांचे शिक्षण असो किंवा स्वप्नातील घर असो, गुंतवणूकीत आलेला व्यत्यय हा कालावधी वाढवू शकतो.

बाजारातील मंदीमध्ये एसआयपी सर्वोत्तम काम करतात

बाजारातील चढउतारांदरम्यान एसआयपी सुरू ठेवणे बहुतेकदा गुंतवणूकदारासाठी फायद्याचे ठरते. कमी मूल्यांकनावर अधिक युनिट्स खरेदी करून एसआयपीचे गुंतवणूकदार त्यांची सरासरी किंमत कमी करतात आणि बाजार पुन्हा वाढल्यावर अधिक नफा मिळवू शकतात. ऐतिहासिक पुराव्यांवरून असे दिसते की, मंदीदरम्यान गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांना अखेर बाजारातील पुनर्प्राप्तीचा फायदा झाला.

उदाहरणार्थ, २००८ आणि २०२० च्या बाजारातील सुधारणांदरम्यान ज्यांनी एसआयपी सुरू ठेवल्या त्या एसआयपीमध्ये बाजार पुन्हा उसळी घेत असताना लक्षणीय वाढ दिसून आली. त्यामुळे शिस्त वेळेपेक्षा जास्त महत्त्वाची आहे या तत्त्वाला बळकटी मिळाली.

## जयपूर रग्सचा रग उत्सव २०२५ : जिथे लक्झरी वारशाची भेट घेते आणि प्रत्येक धागा जीवन बदलतो




**नागपूर, ५ सप्टेंबर :** हस्तकला आणि सामाजिक उद्योजकतेचे जागतिक प्रतीक असलेले जयपूर रग्ज ३ सप्टेंबरपासून सर्जनशीलता, संस्कृती आणि प्रभावाचा भव्य उत्सव, रग उत्सव घेऊन येत आहे. या वर्षीची आवृत्ती इतर कोणत्याही आवृत्तीपेक्षा वेगळी आहे, ज्यामध्ये १४,००० हून अधिक हस्तनिर्मित रग्जांचा आश्चर्यकारक संग्रह प्रदर्शित केला आहे जो आजच्या डिझाइनसह भारताच्या विणकाम परंपरेच्या आत्म्याला सुंदरपणे मिसळतो.

या वर्षीच्या क्युरेशनमध्ये आलम, जेनेसिस, सवाना, कॉन्कोक्शन, दा हास, वंडरकॅमर, कॅलिडो, क्लॅन, बेसिस, लॅकुना, एर्बे, इंडसबार, नोर्मंडिक थ्रेड्स, आकार आणि कॉन्टूर असे स्वाक्षरी संग्रह आहेत. या महोत्सवाचे आकर्षण म्हणजे पुरस्कार विजेत्या मंचहा संग्रहातील जवळजवळ २०० अद्वितीय गालिचे, जे ग्रामीण कारागिरांच्या कल्पनेतून थेट विणलेले आहेत, प्रत्येक गालिचा वैयक्तिक आणि गहन कथा सांगतो.

संग्राहकांसाठी, रग उत्सव २०२५ एक दुर्मिळ संधी घेऊन येतो: २००० विंटेज रग्ज (३०-५० वर्षे जुने) आणि २५० अँटीक रग्ज (१०० वर्षांहून अधिक जुने). यामुळे हे त्याच्या प्रकारचे सर्वात मोठे रग्ज प्रदर्शन बनते.

बदलत्या जागतिक व्यापार समीकरणे आणि वाढत्या निर्यात शुल्कादरम्यान, जयपूर रग्जने ग्राहक-प्रथम पाऊल उचलले आहे: पहिल्यांदाच, संपूर्ण संग्रह ६०% पर्यंत सवलतीत ऑफर केला जात आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर ओळखले जाणारे, डिझायनर-निर्मित रग्ज डिझाइन प्रेमी आणि संग्राहकांसाठी अधिक सुलभ होत आहेत.

रग उत्सव हा केवळ डिझाइनचे प्रदर्शन नाही, तर तो सन्मान, वारसा आणि उद्देशाबद्दल आहे. या उत्कृष्ट निर्मिती सर्वोत्तम किमतीत देऊन, आम्ही जगभरातील घरांमध्ये कला आणत नाही तर त्या तयार करणाऱ्या कारागिरांना थेट पाठिंबा देत आहोत, असे जयपूर रग्सचे संचालक योगेश चौधरी म्हणाले.

रग उत्सवाच्या प्रत्येक आवृत्तीचा उद्देश एका उद्देशाशी जोडलेला आहे. २०२५ मध्ये, महोत्सवातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा एक भाग ग्रामीण विणकाम क्षेत्रात आरोग्यसेवा आणि स्वच्छ पाण्याच्या सुविधा निर्माण करण्यासाठी समर्पित केला जाईल, जे दोन्ही कारागीर समुदायांसाठी अत्यंत आवश्यक आहेत. या उपक्रमाचा हजारो विणकर आणि त्यांच्या कुटुंबांना फायदा होण्याची अपेक्षा आहे.

रग उत्सव २०२५ जयपूर रग्सच्या प्रमुख दुकानांमध्ये (दिल्ली, मुंबई, चेन्नई, रायपूर, जयपूर, गुजरात, पुणे आणि बंगळुरू) आणि जयपूर रग्सच्या वेबसाइटवर (www.jaipurrugs.com) ऑनलाइन अनुभवता येईल.

## दत्ता मेघे इंस्टिट्यूट सावंगी (मेघे), वर्धामध्ये १.९ किलो नवजात शिशुवर जीवनरक्षक हृदय शस्त्रक्रिया



**अकोला, ५ सप्टेंबर :** दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे एका उल्लेखनीय कामगिरीत कार्डिओलॉजी विभागाने केवळ १.९ किलो वजनाच्या गंभीर आजारी नवजात शिशुवर पेटंट डक्टस आर्टेरिओसस स्टेंटिंग ही जटिल व जीवनरक्षक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. ही अत्यंत नाजूक आणि उच्च-जोखमीची शस्त्रक्रिया कार्डिओलॉजी विभागप्रमुख डॉ. गजेंद्र अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट्सच्या समर्पित टीमने केली. या टीममध्ये डॉ. आकाश लोखंडे, डॉ. वैभव राऊत, डॉ. अक्षय दफळ, डॉ. वैभव महल्ले, डॉ. पृथ्वी मुंदडा आणि डॉ. करण सिंह यांचा समावेश होता.

शस्त्रक्रियेपूर्वी बाळाचे ऑक्सिजन सॅच्युरेशन केवळ ४५% इतके धोकादायकरीत्या कमी झाले होते. मात्र पीडीए स्टेंटिंग यशस्वी झाल्यानंतर लगेचच ऑक्सिजन स्तर ८५% पर्यंत सुधारला आणि बाळाच्या प्रकृतीत आमूलाग्र बदल घडून आला.

पीडीए स्टेंटिंग ही एक जटिल इंटरव्हेन्शनल पद्धत आहे जी नवजात शिशूमध्ये डक्ट-डिपेंडंट सर्क्युलेशन असताना रक्तप्रवाहासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध करून देते. कमी वजनाच्या बाळावर ही प्रक्रिया करणे अत्यंत कठीण असते, कारण रक्तवाहिन्या लहान, शरीररचना नाजूक व शस्त्रक्रियेतील धोके मोठे असतात.

शस्त्रक्रियेनंतरची देखरेख एनआयसीयू टीमने केली. या टीमचे नेतृत्व डॉ. सागर करोटकर आणि डॉ. महावीर लकडा यांनी केले. बारकाईने देखरेख केल्याने बाळाचे पुनर्वसन सुरळीत झाले.

सध्या बाळ पूर्णपणे बरे झाले असून सुरक्षितरीत्या डिस्चार्ज देण्यात आले आहे. या यशामुळे बाळाच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून उपचार करणाऱ्या डॉक्टरांच्या टीममध्ये आनंद व समाधान व्यक्त होत आहे.

या यशाबद्दल बोलताना डॉ. गजेंद्र अग्रवाल म्हणाले, अशा गंभीर आजारी नवजात शिशूचे व्यवस्थापन करणे म्हणजे केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे, तर काटेकोर टीमवर्क आणि नियोजन आवश्यक असते. आमचा विभाग सर्वात कठीण प्रकरणांमध्येही अत्याधुनिक हृदयविकार उपचार उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध आहे. दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस सावंगी (मेघे), वर्धा अशा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांसाठी आणि समाजाची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर आहे.

## फ्लाईटची नवीन ब्रँड ॲम्बेसेडर सान्या मल्होत्रा



**मुंबई, ५ सप्टेंबर :** रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेडचा एक ब्रँड असलेल्या 'फ्लाईट' ने प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री सान्या मल्होत्राला त्यांचा नवीन ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषित केले आहे. फ्लाईट हा भारतातील एक आघाडीचा कौटुंबिक फॅशन फुटवेअर ब्रँड आहे. या घोषणेसोबतच, फ्लाईटने येणाऱ्या सण आणि लग्नसराईसाठी खास डिझाइन केलेली नवीन श्रेणी बाजारात आणली आहे. यामुळे ग्राहकांना प्रत्येक प्रसंगासाठी स्टाईलिश पर्याय उपलब्ध होतील. ही घोषणा एका दमदार ३६० - डिग्री मार्केटिंग मोहिमेला धरून आहे, जी आत्मविश्वास, वेगळेपणा आणि स्टाईलसह पुढे जाण्याचा संदेश देते.

गौरव कुमार दुआ, पूर्ण वेळ संचालक रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेड म्हणाले, सान्याला 'फ्लाईट' चा चेहरा बनवून आम्हाला खूप आनंद झाला आहे. या वर्षी आम्ही तरुणाईला आकर्षित करणारी, त्यांच्या व्यक्तिमत्वाला साजेशी एक नवीन आणि आकर्षक डिझाईन बाजारात आणत आहोत. तरुण, महत्त्वाकांक्षी आणि डिझाइनची जाण असलेली सान्या आजच्या भारताचे प्रतिनिधित्व करते. फ्लाईट एक असा फॅशन फुटवेअर ब्रँड आहे जो आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर लोकांना साथ देतो, त्यांना स्टाईल आणि आत्मविश्वासाने पुढे जाण्यास मदत करतो. सान्याला फ्लाईट ची ब्रँड ॲम्बेसेडर बनवून आणि आमच्या नवीन मोहिमेसोबत, आम्ही 'सर उठा कदम बढा' हे ब्रीदवाक्य एका नव्या उंचीवर नेत आहोत. प्रत्येक पावलावर आत्मविश्वासाने आणि स्टाईलने पुढे जाण्यासाठी आम्ही भारताला प्रेरणा देत आहोत.

मनोज लालवाणी, उपाध्यक्ष मार्केटिंग, रिलॅक्सो फुटवेअर्स लिमिटेड, या मोहिमेबद्दल म्हणाले: सान्यासोबतची ही भागीदारी केवळ एक ब्रँड भागीदारी नसून, आमच्या प्रवासातील एका नवीन आणि रोमांचक अध्यायाची सुरुवात आहे. आम्ही ही भागीदारी ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक ३६० डिग्री मोहीम सुरू करत आहोत. ही मोहीम डिजिटल माध्यमांपासून रिटेलपर्यंतच्या अनेक ठिकाणांहून ग्राहकांशी जोडली जाईल. प्रत्येक पावलावर ग्राहकांना स्टाईल आणि आत्मविश्वास स्वीकारण्यासाठी प्रेरणा देईल. 'हर कदम स्टाईलिश' ही तुमची जीवनशैली आणि 'सर उठा कदम बढा' हा तुमचा पुढील मार्ग असावा, यासह आम्हाला विश्वास आहे की, देशभरातील ग्राहकांकडून या मोहिमेला जोरदार प्रतिसाद मिळेल आणि ती ग्राहकांच्या मनात घर करून बसेल.

या मोहिमेद्वारे, फ्लाईटने एक साधा पण शक्तिशाली संदेश दिला आहे: खरा आत्मविश्वास स्टाईलने सुरू होतो. आणि तुम्ही उचललेले प्रत्येक पाऊल, तुम्ही कोण आहात आणि कुठे जात आहात, हे ठळकपणे सांगू शकते.

## आज का अंदाज

शनिवार ६ सप्टेंबर २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | मुंबई बाजार |
|---|---|
| ० १ ४ ७ | |
| २८० १०० १६७ ८९० | |
| ३७० २९० ३४७ ३७७ | |
| ४६० ३८० २३९ ४६७ | |
| ०२ १२ ४३ ७३ | |
| ०५ १५ ४६ ७६ | |
| ०८ १८ ४९ ७९ | |

### ६ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ७८ | ०८ |
| ३२ | ६२ | ७९ | ०९ |
| ३५ | ६५ | ७४ | ०० |
| १३९ | १७८ | १२४ | २३५ |
| २५६ | २६८ | २७८ | ४७९ |
| ३४६ | ३६७ | ४६७ | ३८९ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

८ ९ ० १ २

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## एक दिव्य सुरुवात : कहानी हर घर की या आपल्या नवीन शोच्या प्रीमिअरपूर्वी जूही परमारने प्रतिष्ठित परेलचा राजा चे दर्शन घेतले!



**मुंबई, ५ सप्टेंबर :** या गणेश चतुर्थीनिमित्त झी टीव्हीने पुन्हा एकदा मुंबईतील प्रसिद्ध परेलचा राजा मंडळासोबत सणाच्या उत्साहात भर टाकली आहे. भक्तांना आपल्या लाडक्या बाप्पाचे आशीर्वाद घेण्यासाठी एक दिव्य असा अनुभव देणारी ही जागा सजवण्यात आली होती. सुंदररित्या साकारलेली मूर्ती भक्तांच्या श्रद्धेला आणि आपुलकीच्या भावनेला उजाळा देणारी होती, ज्यातून भव्यता आणि शांततेचा संगम अनुभवायला मिळत होता.

कहानी हर घर की या बहुप्रतिक्षित शोच्या लॉंचपूर्वी, शोची होस्ट जूही परमार हिने झी टीव्हीच्या परेलचा राजाचे दर्शन घेत बाप्पाचे आशीर्वाद मागितले. तिने महाआरतीत सहभाग घेतला, धान्यदान केले, चाहत्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि इतर भक्तांसोबत सणाच्या उत्सवात सहभागी झाली.

जूही परमार म्हणाली, दरवर्षी मी बाप्पाला घरी आणते आणि मोठ्या भक्तिभावाने गणेशोत्सव साजरा करते, पण यावर्षीचा अनुभव खरोखरच खास ठरला. मला पंडाल आणि मित्रांच्या घरी जाऊन बाप्पाचे आशीर्वाद घेण्याची संधी मिळाली, आणि झी टीव्हीच्या परेलचा राजा येथे येणे हा एक अद्भुत अनुभव होता. महाआरती करणे, धान्यदान करणे आणि इथल्या लोकांची भक्तीभावना व ऊर्जा अनुभवणे यामुळे मी कृतज्ञतेने भारावून गेले. कहानी हर घर की प्रेक्षकांच्या मनाला तितक्याच खोलवर भिडावी जितकी तिने माझ्या मनाला स्पर्श केला आहे अशी मी प्रार्थना केली. बाप्पा सर्वांना शांती आणि आनंद देवो. गणपती बाप्पा मोरया!

## राशीभविष्य

**मेष :** सामाजिक जीवनात तुम्ही लोकांना आकर्षित कराल आणि नवीन संपर्क साधण्यात यशस्वी व्हाल. हे सर्व तुमच्यासाठी उत्कृष्ट ठरेल. तुमचे विचार आणि भावना मोकळेपणाने व्यक्त करा.

**वृषभ :** आज व्यवसायात पैशाच्या व्यवहारात घाई करू नका. आज तुमचे लक्ष केंद्रित करून तुमचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. आज तुमचे वैवाहिक जीवन आनंदी राहील, मुले देखील आनंदी राहतील.

**मिथुन :** व्यवसायात काही अनियमितता असू शकतात, वैयक्तिक नातेसंबंधांमध्ये अंतर किंवा कटुतेची चिन्हे दिसू शकतात, म्हणून संयम आणि समजूतदारपणाने वागा. आरोग्याबाबत काळजी घ्या.

**कर्क :** आवडीच्या गोष्टी एक्सप्लोर करण्यासाठी हा एक आदर्श काळ आहे. तुमच्या शब्दांमध्ये विशेष शक्ती असेल. अंत:प्रेरणा आणि सर्जनशीलता तुमच्या विचारांमध्ये स्पष्टता आणेल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुम्हाला व्यवसायात चांगला नफा मिळेल, भौतिक सुखसोयी वाढतील. आज तुम्ही तुमच्या मार्गात येणाऱ्या समस्या सोडवण्यात यशस्वी व्हाल.

**कन्या :** आजचा दिवस खूप सकारात्मक संकेत घेऊन येईल. आज तुमची संवेदनशीलता आणि सर्जनशीलता शिगेला पोहोचेल. तुम्ही तुमची भावनिक बाजू समजून घेण्यात आणि व्यक्त करण्यात यशस्वी व्हाल.

**तुळ :** तुम्हाला थोडे असुरक्षित आणि चिंताग्रस्त वाटू शकते. महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी नीट विचार करा. हा आत्मपरीक्षण करण्याचा काळ आहे; तुमच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा. धीर धरणे महत्त्वाचे आहे.

**वृश्चिक :** दिवस चांगला जाईल. आज तुम्ही भागीदारीत काही काम सुरू कराल, भविष्यात तुम्हाला चांगले फायदे मिळतील. अडकलेली कामं पूर्ण करा, म्हणजे तुमची इतर कामे देखील पुढे नेऊ शकाल.


**धनु :** तुम्हाला चांगल्या कंपनीकडून ऑफर मिळण्याची शक्यता आहे. आज ऑफिसच्या कामात इतरांचा सल्ला घेणे टाळा, तुमच्या जवळच्या व्यक्तीची मदत घेतल्यास तुमचे काम सहज यशस्वी होईल.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. तुम्ही तुमच्या दिवसाची सुरुवात एका चांगल्या सवयीने कराल ज्यामुळे तुमचे आरोग्य चांगले राहील. आज तुम्ही सामाजिक कार्यात व्यस्त असाल,

**कुंभ :** या राशीच्या विद्यार्थ्यांचा दिवस आनंदाचा जाईल, तुम्हाला परीक्षेच्या पेपरमध्ये चांगले गुण मिळतील. आज तुम्ही इतरांच्या म्हणण्याला महत्त्व द्याल आणि त्यांना चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न कराल.

**मीन :** या राशीचे लोक आज त्यांच्या जोडीदारासोबत एखाद्या धार्मिक स्थळी जाऊ शकतात. कामाच्या बाबतीत काही अडचणी येऊ शकतात, परंतु धैर्याने त्या सोडवण्यात यशस्वी व्हाल.

## शब्दकोडे क्रमांक २२१२



**आडवे शब्द :-**
१) जमिनीपासून मिळणारे सरकारचे उत्पन्न
६) संदेश
८) जिंकणारा
१०) संगीतातील एक राग
११) धक्का
१२) प्रजा
१३) मृत्यू
१५) नूतन
१७) धैर्य, हिंमत
१८) ठराविक पैसे
१९) दृढता, सोशिकपणा
२१) रसाळ
२३) पोते शिवण्याची सुई
२५) राबता, जाणेयेणे
२७) पराजय
२८) संगीतातील एक राग
२९) ओढा पण मनाचा
३०) बारदान
३१) मुसलमानांचा उपवासाचा महिना
३२) शपथ
३३) ढग
३६) कुराणातील वचने
३८) चामखीळ
४०) प्रसिद्धी, गप्पांचे आगर
४४) एक तारवाद्य
४६) कर्ज
४७) ताठा, गुर्मी, जोर
४८) ओझी वाहणारा
४९) सुसर
५०) कमीतकमी व जास्तीतजास्त
५३) आश्रय
५६) मोहरी
५७) पाणी वाहण्याची कातडी पिशवी
५८) बडबड
६०) बोटाच्या टोकावरील आवरण
६२) मणका
६३) दूध वा दुधाचे पदार्थ
६४) मडके
६५) पुरुष
६६) फुरसत
६७) लोटी
६८) विशेष
६९) नृत्य
७०) अंगारा, रक्षा
७१) पादत्राण
७२) टेहाळणी करणारा
७४) पृथ्वी
७६) दुर्गंधी येऊ लागलेला
७७) पागोट्याव बांधण्याचे रत्नजडित तुरा
७८) अहंकार

**उभे शब्द :-**
१) जलाशय, समुद्र
२) नेत्र
३) माझे
४) हत्या, खून
५) बारीक सारीक
६) आधार नसलेला
७) घराचा मागचा दरवाजा
८) वापर
९) आग्रा येथील ऐतिहासिक वास्तू
१४) पावसाचे साठवून ठेवलेले पाणी
१६) पराक्रमी
२२) दरवाजा
२४) महाराष्ट्राची देवता
२६) घोड्याची गाडी,
२८) मारणारा
२९) पाऊल
३०) गाईचे घर
३४) चंद्र,
३५) स्नानगृह
३७) हावरटपणा
३९) किरकोळ सामान
४०) कडक
४१) पत्र
४२) मवाळ धोरण
४३) आकाश
४५) खरकट्याचा ढीग
४८) नक्की, खात्रीने
५१) फक्त, केवळ
५२) संगीतातील एक घराणे
५४) हावरट,
५५) अवधान, लक्ष
५७) अनुमती
५९) जंगलात राहणारे प्राणी
६१) अफूचे बीज
६२) किंचित कडू चव
६३) मधुर
६४) गावातील जुनी वस्ती
६७) मोजणी करणारा
६८) मीठाची चव
७०) पोपट
७३) दुनिया
७५) मलई

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# विविधा...

## फडणवीस आणि जरांगे, जिंकले कोण?

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

गणेशोत्सवाची धामधुम चालू असताना तब्बल पाच दिवस मुंबईत झालेल्या मराठा आंदोलनाने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले होते. मराठा- कुणबी एकच असा जीआर घेतल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा निश्चय मनोज जरांगे यांनी जाहीर केल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारपुढे मोठा पेच निर्माण झाला होता.

आंदोलन सुरू केल्यावर जरांगे लवकर मागे हटत नाहीत आणि सरकारकडून लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेत नाहीत हा आजवरचा अनुभव आहे. मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील एका लहान गावात पत्र्याच्या घरात राहणाऱ्या पायजमा आणि सदरा अशा साध्या पोशाखात वावरणाऱ्या, चेहऱ्यावर खुरटलेली दाढी असलेल्या मनोज जरांगे या नेत्याने मराठा समाजाचा मोठा विश्वास संपादन केला आहे.

आरक्षण मिळाल्याशिवाय या समाजाच्या लेकराबाळांना भविष्य नाही हे त्यांनी लोकांच्या मनावर ठसवले आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी म्हणून प्रमाणपत्र मिळावे व ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी त्यांनी संघर्ष उभारला आहे. मराठा समाजातील लक्षावधी तरूण त्यांच्या पाठिशी उभे आहेत.

महाराष्ट्रात शरद पवार, वसंतदादा पाटील यांच्यापासून अगदी अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाणापर्यंत एक डझनपेक्षा जास्त मराठा मुख्यमंत्री झाले पण त्यांनी कोणीही या समाजाला आरक्षण दिले नाही. एक म्हणजे त्यांच्या काळात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी प्रखर आंदोलनही कधी झाले नव्हते आणि जरांगेंसारखा हट्टी व निश्चयी नेताही मैदानात उतरला नव्हता.

कोणत्याही राजकीय पक्षाचा टिळा न लावलेल्या जरांगेनी लक्षावधी मराठा तरूणांचा प्रचंड विश्वास संपादन केला आहे. म्हणूनच त्यांनी हाक मारल्यावर आंदोलनात सहभागी होण्यासाठी तरूणांच्या फौजा मिळेल त्या वाहनाने व सापडेल त्या मार्गाने धावत येतात हेच नेहमी दृश्य दिसते.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गणेशोत्सवात मुंबईत येऊन धडकणार असे जरांगे यांनी चार महिन्यापूर्वीच जाहीर केले होते, ते २९ ऑगस्टला आझाद मैदानावर येऊन थडकले. त्यांच्या पाठापाठ हजारो आंदोलक मोटारी, बसेस, टेम्पो आदी वाहनानी मुंबईत येऊन पोचले. चार दिवस दक्षिण मुंबईचे जनजीवन पार विस्कळीत झाले होते. वाहतुकीचे तीन तेरा वाजले होते. लक्षावधी चाकररमान्यांचे हाल झाले.

न्यायालयाने आंदोलकांवर व सरकार ताशेरे मारल्यावर सरकारचे डोळे उघडले. रस्ते, पदपथ, रेल्वे स्टेशन्स आंदोलकांपासून मुक्त करा, स्वच्छ करा असे न्यायालयाने आदेश दिल्यावर मंत्रालय सतर्क झाले. देशाच्या आर्थिक राजधानीत अराजकासारखी परिस्थिती निर्माण झाली होती, आंदोलकांचे वर्तन फ्री फॉर ऑल होते. त्यांना वेसण घालणे महत्वाचे तर होतेच पण जरांगेंना त्यांच्या मागण्या मान्य झाल्याचे समाधान मिळणेही महत्वाचे होते.

२ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखेपाटील, उदय सामंत, शिवेंद्र राजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे हे जरांगे यांच्याशी चर्चा करायला आझाद मैदानावर पोचले. तासाभरात त्यांच्या मागण्यांविषयक जीआर त्यांच्या हाती सोपवला आणि आपल्या आठ पैकी सहा मागण्या मान्य झाल्याचे समाधानही जरांगे यांना मिळाले.

राज्यात घराघरात टीव्हीच्या पडद्यावर कोट्यवधी जनता राज्याचे पाच मंत्री जरांगे यांना कसे समजावत आहेत हे पाहात होती. आरक्षणाचे काय होणार, कुणबी प्रमाणपत्र कधी मिळणार आणि ओबीसी प्रवगार्तून आरक्षण कधीपासून लागू होणार याची उत्सुकता तमाम मराठा समाजाला आहे. राधाकृष्ण विखेंनी दिलेला जीआर वाचून जरांगे समाधानी झालेच आणि त्यांनी आझाद मैदानावर जमलेल्या तमाम आंदोलकांसमोर जिंकलो रे राजा, आपुन अशी घोषणा दिली.

मुंबईतील आंदोलनानंतर मनोज जरांगे हे मराठा समाजाचे हिरो ठरले. तसेच मराठा आंदोलन संयमाने हाताळल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव होताना दिसतो आहे.

मराठा आरक्षणाच्या संघर्षात आंदोलक विरूध्द सरकार आणि जरांगे विरूध्द फडणवीस असे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या वर्षी फडणवीस हे मुख्यमंत्री असताना आंतरवाली सराटी येथे आंदोलकांवर झालेल्या लठीमारानंतर जरांगे यांनी फडणवीसांना खलनायक ठरवले होते. त्यानंतर फडणवीसांना आंदोलक नेत्यांनी व विरोधी पक्षांनी जणू टार्गेट बनवले.

फडणवीस हे मराठा आरक्षण विरोधी आहेत असे चित्र रंगवले गेले. बामनीकावा, अनाजीपंत, कपटी, खोटारडा, पाताळयंत्री अशा शिवराळ भाषेचा वापर केला. पण देवाभाऊंनी अशा टीकेला एका शब्दानेही प्रत्युत्तर दिले नाही किंवा पोलिसांच्या फौजा पाठवून मुख्यमंत्र्यांची बदनामी केली म्हणून कारवाई केली नाही.

विरोधी पक्षातील एका गटाने तर फडणवीसांच्या विरोधात सोशल मिडियावर व्यावसायीक कंत्राट देऊन प्रचार मोहीम मोहीम चालवली. त्याचे सुरूवातीला केंद्र छत्रपती संभाजी नगर होते नंतर ते नवी मुंबईत हालविण्यात आले, त्याची सर्व माहिती फडणवीसांपर्यंत पोचली होती.

मराठा समाजाला पहिले आरक्षण दिले फडणवीसांनी आणि आता पुन्हा देऊ केले तेही फडणवीसांनीच. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कर्ज वाटप, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या, सारथीची स्थापना हे सर्व फडणवीसांनीच केले पण जरांगेंनी त्यांचे विरोधक समजून त्यांच्यावर टीकास्त्र सोडले. मनासारखा जीआर मिळाल्यावर जरांगे यांनी फडणवीसांचे आभार मानताना आता आपले वैर संपले असे जाहीर करून टाकले.

फडणविसांनी आंदोलकांच्या मागण्या मान्य झाल्याचे श्रेय घेतले नाही किंवा जरांगे यांनी उपोषण सोडावे म्हणून त्यांना सरबत देण्यास गेले नाहीत, उलट त्यांनी ते काम राधाकृष्ण विखेपाटलांवर सोपवले. आंदोलन मिटल्याचे सारे श्रेय मुख्यमंत्र्यांनी विखेपाटलांच्या उपसमितीला दिले. मराठा आंदोलन संपल्यावर सोशल मिडियावर धन्यवाद देवाभाऊ अशा पोस्टचा वर्षाव होत राहीला. देवाभाऊंचा मास्टर स्ट्रोक असेही कौतुक झाले. जरांगे व फडणवीस यांच्या अभिनंदनाचे फलक अनेक ठिकाणी लागले.

मराठा आरक्षण आंदोलनात एकनाथ शिंदे, अजितदादा पवार, गिरीश महाजन, चंद्रकांत पाटील हे मान्यवर कुठे दिसले नाहीत. विखेपाटील हे नवे संकट मोचक म्हणून पुढे आले. आता सरकारच्या जीआर विरोधात ओबीसी नेत्यांनी दंड थोपटले आहेत तर दुसरीकडे सरकारे मराठा समाजाच्या तोंडाला पुन्हा पाने पुसली अशी टीका सुरू झाली आहे. फडणवीसांचा जीआर म्हणजे एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच्या काढलेल्या जीआरची किंचित सुधारीत आवृत्ती आहे, जुनी दारू नवीन बाटली असे वर्णन केले जात आहे.

आंदोलन काळात समाज माध्यमांवर दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुखांच्या भाषणाची एक क्लिप प्रचंड व्हायरल झाली. व्यासपीठावर दिवंगत मुख्यमंत्री मनोहर जोशी, त्यांच्या शेजारी गोपीनाथ मुंडे व आर. आर. पाटील हे दिसत आहेत. विलासराव त्यांच्या भाषणात म्हणतात- आपण आरक्षणाच्या विरोधात नाही, गोरगरीबांना ते मिळालेच पाहिजे . मात्र जातीनिहाय आरक्षण देणार असाल तर भविष्यातही संघर्ष चालूच राहील.

आरक्षण हेआर्थिक निषकांवर मिळाले मिळाले पाहिजे. जातीनिहाय आरक्षण दिले गेले तर प्रत्येक जण आपली जात शोधत राहील. आर्थिक निकषावर आरक्षण दिले जावे यासाठी सर्वपक्षीय सहमती करायला हवी. महाराष्ट्राच्या नेतृत्वाने संकुचित विचार करता कामा नये.

## शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

किरण वाघ
विभागीय संपर्क अधिकारी
मंत्रालय, मुंबई.

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी रूपये २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी रूपये २४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

**अभियानाचे उद्दिष्ट**

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे.

सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

**अभियानाचे ७ प्रमुख घटक**

१. सुशासनयुक्त पंचायत – पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन
२. सक्षम पंचायत – आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (उरफ) व लोकवर्गणी
३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव – पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन
४. योजनांचे अभिसरण – मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी
५. संस्था सक्षमीकरण – शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी
६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय – रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण
७. लोकसहभाग व श्रमदान – ग्रामस्थांचा प्रत्यक्ष सहभाग व श्रमदान

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रुपाने होईल.

पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

**पुरस्कार रचना :**

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल.

**विभागस्तरीय पुरस्कार -**
प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख.

**जिल्हास्तरीय पुरस्कार -**
प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख.

**तालुकास्तरीय पुरस्कार :-**
प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख.

**विशेष पुरस्कार :** प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.

विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.

पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे

जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.

या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल.

प्रत्येक ग्रामपंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल. अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

■ ■

## बिहारमध्ये महाआघाडीचे पारडे जड!


अभय गोखले

बिहार मधील व्होटर अधिकार यात्रेत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या बरोबर राजदचे नेते तेजस्वी यादव हेही सहभागी झाले आहेत. या यात्रेला बिहार मधील जनतेचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

या यात्रेतील शेवटच्या टप्प्यात एके ठिकाणी भाषण करताना तेजस्वी यादव यांनी स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करुन खळबळ माजवली.बिहार मध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीत काँग्रेस,डावे पक्ष आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे. महाआघाडीतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या राजदचे नेते म्हणून तेजस्वी यादव यांचा मुख्यमंत्री पदावरील दावा समजण्यासारखा आहे.

व्होटर अधिकार यात्रेच्या दरम्यान जेंव्हा जेंव्हा राहुल गांधी यांना मुख्यमंत्री पदाच्या संभाव्य उमेदवाराबाबत विचारणा झाली तेंव्हा त्यांनी काही तरी गुळमुळीत उत्तर देऊन तो प्रश्न टाळला.तेजस्वी यादव यांनी बरेच दिवस वाट पाहिली आणि शेवटी स्वतःला मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करुन, राहुल गांधी यांची कोंडी करण्यात यश मिळवले.आता राहुल गांधी यांना त्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावीच लागेल.

बिहार मध्ये लवकरच होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी व्होटर अधिकार यात्रेद्वारे राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी चांगली वातावरण निर्मिती केली आहे. निवडणूक आयोगाने बिहार मध्ये जी विशेष सखोल फेरतपासणी मोहीम राबवली आहे, त्यावर राहुल गांधी आणि तेजस्वी यादव हे कडाडून टीका करत आहेत. ही मोहिम भाजपाच्या फायद्यासाठी राबवली जात असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.यात्रेच्या दरम्यान व्होट चोर गद्दी छोड अशा घोषणा दिल्या जात असून,त्याचा जनमानसावर नक्कीच परिणाम होत आहे.

बिहार मधील विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेत ६५ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली असून त्या बाबतची कारणमिमांसाही निवडणूक आयोगाकडून स्पष्ट करण्यात आली आहे.जी नांवे वगळण्यात आली आहेत, त्यामध्ये मृत्यू पावलेले मतदार, कायम स्वरुपी राज्याबाहेर गेलेले मतदार, एकाहून अधिक ठिकाणी नांव नोंदवलेले मतदार यांचा समावेश आहे.निवडणूक आयोगाने वगळलेल्या मतदारांची यादी प्रसिद्ध केली असून,त्या बाबत आक्षेप नोंदवण्यासाठी पुरेसा वेळ दिला आहे.

लवकरच होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकांसाठी राजद प्रणित महाआघाडी मधील जागा वाटप अद्याप पार पडलेले नाही.२०२० च्या विधानसभा निवडणुकीत राजदने ७५ जागा जिंकून प्रथम क्रमांक पटकावला होता. महाआघाडीतील काँग्रेसला १९ जागांवर विजय मिळाला होता. प्रतिस्पर्धी, रालोआ मधील भाजपाला ७४ जागांवर विजय मिळाला होता,तर संयुक्त जनता दलाने ४३ जागा जिंकल्या होत्या. या खेपेस महाआघाडी आणि रालोआ यांच्यातील जागा वाटप सोपे असणार नाही. महाआघाडीत सर्वात जास्त जागा राजदच्या वाट्याला येतील. मात्र काँग्रेसला गेल्याखेपेइतक्या जागा मिळण्याची शक्यता फार कमी आहे.

२०२० च्या विधानसभा निवडणुकीत महाआघाडीच्या जागा वाटपात, काँग्रेसला ७० जागा सोडण्यात आल्या होत्या. मात्र काँग्रेसला त्यापैकी फक्त १९ जागा जिंकता आल्याने महाआघाडीच्या एकूण कामगिरीवर त्याचा विपरीत परिणाम झाला होता. महाआघाडीचे बहुमत थोडक्यात हुकले होते.काँग्रेसची गेल्या खेपेची निराशाजनक कामगिरी पाहता या खेपेस जागा वाटपात काँग्रेसच्या वाट्याला पुर्वी इतक्या जागा येण्याची शक्यता दिसत नाही. महाआघाडीत काही पक्षांची नव्याने एंट्री झाल्याने, त्यांना काही जागा सोडाव्या लागतील.रालोआमध्येही जागा वाटप सोपे असणार नाही. गेल्याखेपेस भाजपा पेक्षा ३१ जागा कमी मिळूनही, संयुक्त जनता दल जागा वाटपात पुर्वी इतक्याच जागा मागण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपा आणि संयुक्त जनता दल हे रालोआ मधील मित्र पक्ष समसमान जागा लढविण्याची शक्यता दिसत आहे.

चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती पार्टी हा पक्ष रालोआ मधील महत्वाचा घटक पक्ष आहे.मात्र या पक्षाची निश्चित भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.रालोआमध्ये राहून, चिराग पासवान हे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीका करत आहेत. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान हे स्वतंत्रपणे लढले होते. त्यांनी स्वबळावर विधानसभेच्या १३५ जागा लढवल्या होत्या. त्यांच्या पक्षाला त्या निवडणुकीत केवळ एक जागा जिंकता आली होती.ते स्वतंत्रपणे लढल्याचा सर्वात मोठा फटका संयुक्त जनता दलाला बसला होता. चिराग पासवान यांच्या पक्षाने मतविभागणी घडवून आणल्याने, संयुक्त जनता दलाला २५ च्या आसपास जागा गमवाव्या लागल्या होत्या.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत चिराग पासवान यांच्या पक्षाला पाच जागा सोडण्यात आल्या होत्या.त्यासर्व जागा जिंकून त्यांच्या पक्षाने शंभर टक्के यश मिळविले होते. त्यांच्या पक्षाने जिंकलेल्या लोकसभा मतदारसंघांत येणाऱ्या विधानसभेच्या ३० जागांपैकी २९ जागांवर त्यांच्या उमेदवारांनी आघाडी घेतली होती. याचा अर्थ चिराग पासवान हे जागा वाटपात किमान तीस जागा आपल्या पक्षाकरता मागतील, ही गोष्ट निश्चित आहे.

त्याशिवाय हिंदुस्थानी अवाम मोर्चा आणि राष्ट्रीय लोक मोर्चा या अनुक्रमे जितनराम मांझी आणि उपेंद्र कुशवाहा यांच्या पक्षांसाठी रालोआला काही जागा सोडाव्या लागणार आहेत. राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेला बिहार मधील जनतेकडून जो भरघोस प्रतिसाद मिळाला, तो पहाता सध्यातरी महाआघाडीचे पारडे जड दिसत आहे.अर्थात दोन्ही आघाड्यांचे विधानसभा निवडणुकीतील यशापयश हे जागा वाटप कसे होते, यावर अवलंबून रहाणार आहे. जागा वाटपाच्या मुद्द्यावरून महाआघाडीसाठी काँग्रेस आणि रालोआसाठी चिराग पासवान हे डोकेदुखी ठरू शकतील.

■ ■ ■

# आजच्या आणि पूर्वीच्या शिक्षकातील सरस निरसता

शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ.
७०५७१८५४७९

आजचे शिक्षक हे पूर्वीच्या शिक्षकांपेक्षा सरस आहेत का? हे सांगणे खूप अवघड झाले आहे. आधी पण शिक्षक चांगले होते आणि आता सुद्धा शिक्षक चांगले आहेत. प्रत्येक नोकरी प्रमाणे काही शिक्षक आधी पण चांगले नव्हते आणि आता सुद्धा चांगले नाहीत.

आधी शिक्षकांना तुटपुंज्या पगारावर काम करावे लागायचे आणि पदोन्नतीच्या संधी कमी होत्या. पण आता तसे नाही. शिक्षकांना चांगला पगार आहे. पदोन्नतीच्या संधीही उपलब्ध आहेत. कार्यक्षम आणि मेहनत घेणा-या व्यक्तींची नेमणूक होण्याची गरज आहे. शिक्षक हा आपल्या ज्ञानार्जनातून पिढी घडवत असतो. म्हणून फक्त सर्वोत्तम व्यक्तींनीच या क्षेत्रात उतरावे.

पण दुर्दैवाने नेमणुका करतांना बोकाळलेला भ्रष्टाचार बघता नवीन रुजू होणारे बहुतांशी शिक्षक पैसा देऊन ती नोकरी विकत घेत असतात. मग लाखो रुपये देऊन नोकरीला लागलेल्या शिक्षकांकडून तो चांगले शिकविल ही अपेक्षा आपण कशी करावी?

चांगला पगार आहे, सर्वोत्तम व्यक्तींची निवड करून नेमणूक केली, तर विद्यार्थ्यांना चांगले शिक्षक मिळतील. पण तसे होताना दिसत नाही. इतर नोकरीत आठवड्यात ४० तास काम करावे लागते. तुलनेत शिक्षकांना काम कमी असते. शिक्षकांनी त्या फावल्या वेळेचा उपयोग स्वतःला अद्यावत करण्यासाठी वापरावा ही अपेक्षा असते.

त्यांचे काही मित्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रम मंडळात आहेत. अभ्यासक्रम बदलायचा तथा अद्यावत करण्याचा प्रयत्न केला तर प्राध्यापक मंडळी विरोध करतात. कशाला आमचे काम वाढवता असे त्यांचे म्हणने असते. कारण कधीतरी दहा-पंधरा वर्षांपूर्वी एखाद्या हुशार विद्यार्थ्याने तयार केलेल्या नोट्स वापरून शिकवण्याची सवय झालेली असते.

आज फार फरक दिसून येतो. निश्चितपणे चांगल्याकडून वाईटपणाकडे झाला आहे. शिक्षकातील काहीजण त्यांच्या वागण्यामुळे मान देण्यास पात्र नाहीत, तर अट्टल गुन्हे आणि गैरवर्तन करणारे आहेत.

शिक्षक म्हणून पदाचा गरिमा म्हणजे पदाचा आब राखणे, पदाची गरज, पावित्र्य व शान राखणे हे खरे तर त्यांचे कर्तव्य आहे. पण यातच अनेक जण वाईटरित्या उघडे पडतात. जसे दारू पिऊन मुलांसमोर येणे, आश्रम शाळेत मुलींबरोबर बलात्कार करणे, व्यसन करणे, शाळांतील पैसा खाणे, न शिकवणे, वाईट भाषा वापरणे, पेपर फोडणे, पैसे घेऊन मार्क देणे, मुलांकडून घरची कामे करून घेणे, बेशिस्त वर्तन, मुलींना फुस लावून पळवून नेणे अशा काही प्रकरणातून त्यांचे गुण उघड होताना दिसून येते.

जर शिक्षक त्यांचे काम व्यवस्थित करत नसतील तर त्यांना सरळ टर्मिनेट करावे. कारण शिक्षकच आता खोट्या गोष्टी करून, भ्रष्टाचार करून टीईटी देतात. त्यात खोटेपणा करतात.

आता शिक्षकांना परीक्षा नको म्हणतात. मुलांच्या खोट्या हजेरी लावून पगार घेणे, मुलींशी गैरवर्तन करणे असे सर्व दुर्गुण हल्ली त्यांच्यात भरले आहेत. हे पेपर मध्ये येणा-या विविध बातम्या वाचून कळते. खांद्यावर हात ठेवणे हे त्या व्यक्तीचे गुण जेव्हा मुलांसमोर येतात तेव्हा आदर्शच असावे. जसे तोंडात पानाचा तोबरा, हातात सिगरेट हे सर्व चुकीचे आहे. त्यांच्या वागण्यामुळे आज असे करणारे शिक्षक त्यांचा मान सन्मान हरवून बसले आहेत आणि आदरयुक्त मानसन्मान मिळवणे नाही, तर नाव कमावणे ही पूर्णपणे त्यांचीच जबाबदारी आहे.

पूर्वी शाळेतला शिक्षक सोडला, तर इतर कुठूनही ज्ञान मिळण्याची व्यवस्था नव्हती. आई-वडील शिकलेले असतील तर थोडी मदत होत असे. पण मुलांना शिकवण्याचा पूर्ण भार शाळेवर होता. एकदम 'ढ' विद्यार्थी शिकवणी लावायचा. यामुळे इतर मुलं चिडवायची आणि ते पालकांना परवडत सुध्दा नव्हते.

पूर्वी शिक्षा करण्याचा अधिकार होता. त्यामुळे शिक्षक मुलांना चोपून काढू शकत होते आणि घरी कळलं तर घरून वेगळा मार बसायचा. त्यामुळे मनात शिक्षकांविषयी भिती होती. गुरु म्हणजे देव असतो. शिक्षक कसाही असला तरी तो व्यक्ती आपल्याला ज्ञान देतो आहे, तो गुरु आहे असे संस्कार होते. त्यामुळे गुरु विषयी अपशब्द वापरले जात नव्हते. पूर्वी शिक्षक आपल्या कामाशी प्रामाणिक होते (सगळेच नाही पण मोठ्या प्रमाणात). ज्ञानदान करणे पुण्य कर्म मानले जायचे, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा चांगला होता. कितीही वर्ष शिकवत असले तरी आपल्या विद्यार्थ्यांना हे शिक्षक ओळखू शकत होते. म्हणजे हजारो मुलांना शिकवलं तरी हा माझा विद्यार्थी असा प्रत्येकाशी त्यांचा भावनिक बंध होता. मुलांच्या मनात सुद्धा शिक्षकांविषयी प्रेम आणि आदर होता.

आताची परिस्थिती काय आहे? माहितीच्या उपलब्धतेमुळे माहिती सगळीकडे नदी सारखी वाहत आहे. मोबाईल उचलला की हवी ती माहिती मिळते. मग शिक्षक कशाला हवे? शिवाय शिकवणी वर्ग आहेतच की जिथे पैसे भरून ज्ञान मिळवता येतं. शाळेत का लक्ष द्यायचं?

मुलांना काही म्हणण्याची मुभा नाही. मारणे तर दुरच मुलांना शिस्त लावण्यासाठी काही बोलणे सुध्दा शिक्षकांना कठीण होऊन बसले आहे. लगेच पालक शाळेत धावून जातात. त्यामुळे नोकरी जाण्याची भिती असते. आजकाल शिक्षक सर्विस देतो, ज्ञान नाही. अभ्यासक्रम पूर्ण करणे, मुलांचे मनोरंजन करणे आणि त्यांना परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी मदत करणे हे आजच्या शिक्षकाचे काम आहे. मी शाळेत जातो, दिलेला तास शिकवतो आणि पगार घेतो. मुलांच्या भविष्याशी माझे काही देणे घेणे नाही. पालक सरळ असे म्हणतात की, असा कसा माझा मुलगा-मुलगी नापास झाले. काय शिकवता तुम्ही? पैसे भरले आहेत तर मुलं पास झालीच पाहिजे. अशाप्रकारे पालकांची अरेरावी वाढत जात आहे.

ही झाली वरवरची कारणे, तर मुळ मुद्दा काय आहे? आजकाल ज्ञान फार कमी मुलांना हवं आहे. मुलांना फक्त पदवी प्राप्त करायची आहे. असं का? तर आपला अभ्यासक्रम फार जूना आहे, नवीन गोष्टी त्यात शिकवल्या जात नाहीत. एक इंजिनिअर जेव्हा पदवीधर होतो तेव्हा बरेचदा त्याला नोकरीवर जे काम करायचे आहे ते येतच नसते, ते शाळा, कॉलेज मध्ये शिकवले नसते. त्यासाठी कंपनीत वेगळे प्रशिक्षण देण्यात येते. मग शिक्षक जे शिकवतो त्याचा उपयोग काय? ऐकलं काय आणि नाही ऐकलं काय सारखंच. फक्त नावापुरतेच तास करायचे, शिकवणी वर्ग लावायचे आणि उत्तीर्ण झाले की काम झालं.

आजकाल मुलं शाळेत, महाविद्यालयात मौजमजा करण्यासाठी जातात. काही नावाजलेले शाळा-कॉलेज सोडली, तर इतर ठिकाणी नुसता बाजार भरला आहे. ग्रामीण भागातील सरकारी शाळेत शिकलेल्या मुलांना साधं अक्षर ज्ञानसुध्दा नसतं.

ती मुलं शाळेत जातात ते विविध योजनेतून तांदूळ, जेवण मिळवण्यासाठी आणि शिक्षक येतात ते पगारासाठी. यातूनही जर एखादा शिक्षक शिस्त लावण्याचा प्रयत्न करतो, तर शाळा, कॉलेज प्रशासन त्यांनाच बाहेरचा रस्ता दाखवतात. काही ठिकाणी रेटिंग सिस्टीम असते, म्हणजे वर्ष अखेरीस मुलं आपल्या शिक्षकांबद्दल फिडबॅक देतात.

ते शिक्षक चांगले आहेत की नाही वैगरे. या रेटिंगवर शिक्षकांचे वेतनवाढ, पदोन्नती या गोष्टींचे निर्णय घेण्यात येतात. मग शिक्षक का मुलांशी पंगा घेईल? शिक्षक मग मित्रांसारखाच वागेल ना.

जेव्हा दोन मुलं अभियांत्रिकीला असताना एक सिनीयर असतो, जो दरवर्षी नापास होतो आणि शेवटच्या वर्षाची परीक्षा सोबत देते, ते त्यातही नापास होते. चार वर्षांची अभियांत्रिकीची पदवी त्यांनी आठ वर्षात मिळवली.

आज ते एका पोलीटेक्निक विद्यालयात शिक्षक आहेत. मी असं म्हणत नाही की ते शिकवू शकत नाही. ते मुलांना भरपूर इंटर्नल मार्क्स देतात. मुलांसोबत त्यांचे फोटो फेसबुकवर सतत येत असतात आणि त्यांना दरवर्षी छान रेटिंग मिळतं. अशी देवाण घेवाण चालते.

बाकी शिक्षणाचा खेळ खंडोबा झाला आहे. शेवटी काय? दोष फक्त शिक्षकांचा नाही, तर सिस्टीमचा आहे. पण राजकारणी लोक जोपर्यंत शाळा, कॉलेज चालवतील तोपर्यंत बदलाची शक्यता आहे का? निश्चितच नाही.

■ ■ ■

# चारकोपचा गणराज



श्री साई मित्र मंडळ (रजि.)
सेक्टर ५, चारकोप, कांदिवली (प.)

## दैनिक महासागर प्रस्तुत 'आमचा लाडका गणेश'

**दैनिक महासागर प्रस्तुत "आमचा लाडका गणेश" या सदरासाठी आपल्या घरगुती तसेच सार्वजनिक बाप्पांचे सुबक छायाचित्रे 9137362297 या क्रमांकावर पाठवावेत. चांगल्या छायाचित्रांना दैनिक महासागर मध्ये ठळकपणे प्रकाशित करण्यात येईल...**



जय शिव सेवा मित्र मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव-२०२५ (भाबरेकर नगर मार्केटचा राजा) रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सत्यनारायण महापूजा व भव्य महाप्रसाद भंडारा आयोजित केला होता.मंडळाचे अध्यक्ष संजय बिरादार, सचिव मारुती बिरादार, खजिनदार कृष्णा कुळे तसेच मंडळातील सर्व सभासद, महिला सभासद व सर्व तरुण मंडळींनी मोठ्या उत्साहाने बाप्पाचा महाप्रसाद वाटप केला. तसेच मंडळाचे सभासद हरीश खर्से यांनी मंडळाच्या वतीने रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मोठ्या उत्साहाने देणगी देणाऱ्यांचे आभार मानले.



श्री विठ्ठल गणपती चौगुले, मु.पो. बेलेवाडी मासा, तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर. यांचे घरी वर्षांनुवर्षे शाडूची मूर्ती स्थापन करून परंपरा जपली जाते.



विनोद बनकर यांचा लाडका बाप्पा. ( मुरुड )



साई कृपा मित्र मंडळ, चिंचपाडा चा विघ्नहर्ता कल्याण पूर्व ची मनमोहक लालबागच्या राजाची १६फुटी प्रतिकृती वर्ष..२५ वे अध्यक्ष..राजेश महावीर सौरे (राजपूत)

# चढ-उतारामुळे बाजार सपाट बंद
## ऑटो शेअर्समध्ये सर्वाधिक वाढ



मुंबई, दि. ५ प्रतिनिधी

आशियाई बाजारातील सकारात्मक ट्रेंडमध्ये भारतीय शेअर बाजार शुक्रवारी ५ सप्टेंबर रोजी अस्थिर व्यवहारात जवळजवळ सपाट स्थितीत बंद झाला. दिवसाची सुरुवात जोरदार असली तरी बाजारात दबाव दिसून आला. एफएमसीजी समभागांमध्ये नफा बुकिंग आणि आयटी समभागांमध्ये घसरण यामुळे बाजार खाली आला. ऑटो समभागांमध्ये खरेदीने बाजाराला आधार दिला.

सेन्सेक्स ८१,०१२.४२ वर उघडला. त्यानंतर तो जवळजवळ ३०० अंकांनी वाढला. सुरुवातीच्या काळात निर्देशांकात चढ-उतार दिसून आले. ट्रेडिंग दरम्यान तो ८१,०३६ अंकांच्या उच्चांकावर आणि ८०,३२१ अंकांच्या नीचांकी पातळीवर गेला. शेवटी ७.२५ अंकांनी




घसरून ८०,७१०.७६ वर बंद झाला. त्याचप्रमाणे निफ्टी २४,८१८.८५ अंकांवर जोरदारपणे उघडला. परंतु ट्रेडिंग दरम्यान घसरला. अस्थिरतेत निफ्टी अखेर ६.७० अंकांच्या किरकोळ वाढीसह २४,७४१ वर जवळजवळ स्थिर राहिला.

सेन्सेक्स कंपन्यांमध्ये महिंद्रा अँड महिंद्रा, मारुती सुझुकी आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे शेअर्स वधारले. तर आयटीसी, एचसीएल टेक्नॉलॉजीज आणि टीसीएस हे शेअर्सही वाढवे.

**सेन्सेक्स 80,710**

**निफ्टी 24,741**

एनएसईवर आयशर मोटर्स, श्रीराम फायनान्स आणि महिंद्रा अँड महिंद्रा आयटीसी, सिप्ला आणि एचसीएल टेक्नॉलॉजीज हे शेअर्स घसरले.

निफ्टी मिडकॅप १०० निर्देशांक ०.२० टक्क्यांनी वधारून बंद झाला, तर निफ्टी स्मॉलकॅप १०० निर्देशांक ०.१९ टक्क्यांनी वधारून बंद झाला.

क्षेत्रीय आघाडीवर निफ्टी ऑटोने सर्वाधिक वाढ नोंदवली. तो १.२५ टक्क्यांनी वधारून बंद झाला. त्यानंतर, धातू क्षेत्राने ०.६८ टक्के आणि मीडिया क्षेत्राने ०.५९ टक्के वाढ नोंदवली. दुसरीकडे, निफ्टी आयटी सर्वाधिक १.४४ टक्क्यांनी घसरून बंद झाला. त्यानंतर, एफएमसीजी १.४२ टक्क्यांनी आणि रिअल्टी क्षेत्र १.१६ टक्क्यांनी घसरले.

पुढील काही दिवस शेअर बाजारातील सेटलमेंटची गती थोडी मंदावणार आहे. त्याचे कारण म्हणजे आज म्हणजेच ५ सप्टेंबर (शुक्रवार) आणि ८ सप्टेंबर (सोमवार) रोजी एनएससीने सेटलमेंट हॉलिडे घोषित केले आहे. खास बाब म्हणजे आधी केवळ शुक्रवार, ईद-ए-मिलाद निमित्त सुट्टी होती, परंतु आता RBI ने महाराष्ट्रातील हा सार्वजनिक सुट्टीचा दिवस सोमवारसाठी हलवला आहे.



श्री संजय दत्तू माने
मु. पो. बेलेवाडी मासा तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर यांच्या घरी चिंतामणी गणेश मूर्तीची स्थापना...!!

# अजित पवारांचा पिंपरी चिंचवड दौरा ऐनवेळी रद्द

पुणे, दि. ५ प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा आजचा पिंपरी-चिंचवडमधील नियोजित दौरा अचानकपणे रद्द करण्यात आला. अजित पवार आज शहरातील विविध गणेश मंडळांना भेटी देणार होते त्याचबरोबर दर्शनाचा कार्यक्रम नियोजित करण्यात आला होता. मात्र पावणे दोन वाजता अचानकपणे मुंबईला रवाना झाले. शहरातील जवळपास चाळीस मंडळांना भेटी देऊन दर्शन घेणार होते. मात्र दौरा रद्द झाल्यानं समर्थकांचा हिरमोड झाला.

शहरातील अनेक प्रमुख मंडळांनी अजित पवारांच्या स्वागतासाठी विशेष तयारी केली होती. सजावट, मंडप उभारणी, बॅनर्स-होर्डिंग्ज, त्याचबरोबर कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला होता, अजित पवार आपल्या मंडळाला भेट देणार यामुळे वातावरण गजबजले होते. मात्र, दौरा रद्द झाल्याने कार्यकर्त्यांबरोबरच पदाधिकाऱ्यांनाही मोठा हिरमोड झाला. दौरा का रद्द झाला, याबाबत अधिकृत कारण समजू शकलेले नाही. अजित पवारांचा हा दौरा रद्द झाला त्यानंतर अजित पवार मुंबईला रवाना झाले.

१२.३० वाजता अजित पवार येणार होते, मात्र पावणे दोन वाजता अचानकपणे मुंबईला रवाना झाले. शहरातील जवळपास चाळीस मंडळांना भेटी देऊन दर्शन घेणार होते. मात्र दौरा रद्द झाल्यानं समर्थकांचा हिरमोड झाला. शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष योगेश बहल यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार तातडीने मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती दिली. "अजितदादांचा दौरा काही कारणास्तव रद्द करण्यात आला आहे. ते मुंबईच्या दिशेने रवाना झाले असून शहरातील मंडळांना भेट देण्याचा कार्यक्रम सध्या रद्द करण्यात आला आहे," असेही त्यांनी सांगितले आहे. अचानक झालेल्या या बदलामुळे कार्यकर्त्यांमध्ये काही प्रमाणाच नाराजी दिसून येत आहे.दोन दिवसांपासून आम्ही स्वागताची तयारी करत होतो. पण अखेर क्षणी दौरा रद्द झाल्याने हिरमोड झाला," अशी चर्चा कार्यकर्त्यांमध्ये पाहायला मिळाली. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून काहींनी या दौऱ्यामुळे राजकीय शक्तीप्रदर्शनाची तयारीही केली होती, मात्र दौऱ्यामुळे सगळं फसलं. यावर्षीचा दौरा रद्द झाल्याने शहरातील गणेश मंडळांचा उत्साह कमी झाल्याचे पाहायला मिळाले.

# हा टॅरिफ संघर्ष तात्पुरता - मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन

नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लागू केलं आहे. याचा देशाच्या आर्थिक वाढीवर परिमाण होईल आणि इथली व्यावसायिक परिस्थिती कठीण होईल", असं वक्तव्य भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी केलं आहे. "ट्रम्प यांच्या टॅरिफ अस्त्रामुळे चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीत याचे परिणाम जाणवतील", असंही त्यांनी म्हटलं आहे.



नागेश्वरन यांनी विश्वास व्यक्त केला की "हा टॅरिफ संघर्ष तात्पुरता असेल यावर दुसऱ्या बाजूने (अमेरिका) काही प्रमाणात पुनर्मूल्यांकन होईल. कारण सध्याची स्थिती प्रदीर्घ काळ अशीच राहिली तर ते दोन्ही देशांच्या परस्पर संबंधांसाठी सकारात्मक ठरणार नाही. मला असं वाटतं की हे (उच्च आयात शुल्क) फार काळ टिकणार नाही. हे तात्पुरतं असेल."

# ऐन सणासुदीत केरळमध्ये मद्यपींनी रिचवली 826 कोटींची दारू !

तिरुवनंतपुरम, दि. ५ वृत्तसंस्था

केरळमध्ये सध्या ओणम सणाची धूम पाहायला मिळत आहे. दरवर्षी या महिन्यात केरळमध्ये हा उत्सव साजरा केला जातो. शेतीवाडीत पिकपाण्याला सुरुवात करताना केरळवासी हा सण साजरा करतात. पण यावर्षी या सणासुदीच्या काळातील एक वेगळीच आकडेवारी समोर आली आहे. केरळमध्ये यंदाच्या ओणम सणाच्या काळात तब्बल ८२६ कोटींच्या दारूची विक्री झाल्याची माहिती समोर आली आहे. केरळ स्टेट बेवरेजेस कॉर्पोरेशनच्या दुकानांच्या माध्यमातून ही विक्री करण्यात आली आहे. BEVCO या नावाने केरळमध्ये KSBC ची दुकाने आहेत.



केरळमध्ये दरवर्षी ओणम सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केरळमध्ये शेतीकामांची सुरुवात हा सण साजरा करून केली जाते. त्याचप्रमाणे मल्याळी नववर्षाचं प्रतिक म्हणूनही या सणाला महत्त्व आहे. ओणम सणाच्या निमित्ताने केरळमध्ये राजा महाबलीच्या वार्षिक स्वागताचा स्वागताचा मुहूर्त म्हणूनदेखील या सणाकडे पाहिलं जातं. या सणाच्या निमित्ताने केरळमध्ये ठिकठिकाणी घरोघरी फुलांची सजावट, कथकली, वल्लमकलीसारखी पारंपरिक नृत्य आणि ओणासद्यासारख्या कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं.

या वर्षीही नेहमीप्रमाणे २५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या काळात केरळमध्ये ओणम सण साजरा केला जात आहे. मात्र, एकीकडे ओणम सणाचा उत्साह असताना दुसरीकडे मद्यखरेदीचाही उत्साह पाहायला मिळत आहे. केएसबीसीनं दिलेल्या आकडेवारीनुसार केरळमध्ये या वर्षीच्या ओणम उत्सवादरम्यान तब्बल ८२६ कोटी ३८ लाख रुपयांची दारू विकली गेली आहे. शुक्रवारी ही माहिती केएसबीसीनं जाहीर केली. त्यानुसार, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी ओणम सणादरम्यान मद्यविक्रीचं प्रमाण तब्बल ६.३८ टक्क्यांनी वाढलं आहे. गेल्या वर्षी या सणादरम्यान केरळमध्ये ७७६ कोटी ८२ लाख रुपयांची दारू विक्री झाली होती.

# लष्करी व मुलकी क्षेत्रासाठी ड्रोनचा वापर

**ड्रोन सारख्या तंत्रज्ञानाचा वापर हा कृषी,उद्योग व्यवसाय,आणि इतर अनेक क्षेत्रात यशस्वी झाल्यानंतर आता ड्रोन तंत्रज्ञानाचा विकस लष्करी आणि मुलकी क्षेत्रासाठी आणि व्यापारी हेतूनेही झपाट्याने होत आहे. आपले दैनंदिन जीवन सुकर करणे आणि सीमांचे रक्षण करणे या दोन्ही उद्देशांची पूर्तता करू शकणाऱ्या या तंत्रज्ञानाविषयी उद्योजक डॉ. रवींद्र उटगीकर यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

**साप्ताहिक संवाद**


१] ड्रोन सारख्या अभिनव तंत्रज्ञानाचा वापर कोणकोणत्या क्षेत्रात होत आहे?

ड्रोन या तंत्राची अचूकता, नेमकेपणा, आणि कार्यक्षमता आणि उत्पादकता लक्षात घेता ड्रोनचा वापर हा अनेक क्षेत्रांमध्ये सातत्याने वाढताना दिसतोय. कोरोना महासाथी च्या काळात या तंत्रज्ञानाने जगभरातील आरोग्यसेवांना गती आणि व्याप्ती देण्यात मोठा हातभार लावला होता. दुर्गम ठिकाणी आरोग्य सेवासुविधा पुरविण्यात या तंत्राचा मोठा वाटा होता. आपत्कालीन परिस्थितीत दुर्घटना स्थळाची तात्काळ पाहणी करून त्याची नेमकी माहिती आणि छायाचित्र उपलब्ध करून देण्यासाठी देखील ड्रोन हे तंत्र महत्वाचे ठरले. भूकंप,दुष्काळ किंवा एखादी आपत्ती असेल तर याच ड्रोन च्या आधारे अगदी ढिगाऱ्याखाली जाऊन ड्रोनच्या साहाय्याने माणसांचा मागमूस घेता येणे शक्य झाले आहे. पायाभूत सोयी सुविधांसोबतच शेती क्षेत्रात अगदी माती परीक्षणापासून ते कीटकनाशक आणि औषधी फवारणी पर्यंतची अनेक काम याच ड्रोन तंत्राने सुलभ झालेली आहेत. आणखी अनेक क्षेत्रात हा वापर वाढतोय.

२]ड्रोन तंत्राचा वापर आता लष्करी आणि मुलकी क्षेत्रांसाठी देखील होणार आहे?

भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये मे २०२५ मध्ये झालेल्या चकमकीमुळे ड्रोन तंत्रज्ञान चर्चेत आले. खरे तर त्याच्याही आधी युक्रेन युद्धात या तंत्राचा वापर केला

**लोकरंग**



गेला. त्यानंतर अपेक्षेप्रमाणे आता अमेरिका आणि चीन या उभय देशांनी द्रोन तंत्रज्ञानाच्या विकासात आघडी घेतली असून या तंत्राचा वापर लष्करात युद्धासाठी आणि मुलकी क्षेत्राच्या टेहळणीसाठी देखील सुरु केला आहे. फ्रांस,जर्मनी इस्रायल सारख्या देशांमध्ये देखील आता याच तंत्राचा वापर सर्रास वाढलेला आहे. आपल्याकडे अगदी दुर्गम भागात ड्रोन नमो दीदी या योजनेमुळे आता ड्रोन चा वापर हा महिलांच्या उन्नतीसाठी देखील फायदेशीर ठरतो आहे.

३] ड्रोन या तंत्राची जोखींम आणि भविष्यातील आव्हान काय आहेत?

उत्तम प्रतीचे छायाचित्रण आणि व्हिडीओ चित्रण हे ड्रोन च्या सह्हायाने सुलभ झाले आहे खरे मात्र,पुरेशा नियामक तरतुदी अभावी ड्रोनचे हेच वैशिष्ट्य डोकेदुखी ठरू शकते याचा अनुभव भारतात येऊ लागलेला आहे.चोऱ्या करण्यापासून इतरांच्या घरात अंडी खाजगी आयुष्यात डोकावण्या पर्यंत वेगवेगळ्या कारणासाठी ड्रोन चा चुकीचा होत असलेला वापर लक्षात घेता पोलिसांसाठी हि आता डोकेदुखी ठरत आहे. या बरोबरच नागरिकांच्या जीवितहानीची आणि देशाच्या सुक्षिततेची देखील जोखीम स्पष्ट दिसू लागली आहे. मात्र हि आव्हान लक्षात घेता या ड्रोन तंत्राचे योग्य नियमन केल्यास हेच तंरज्ञान अनेक अर्थाने फायद्याचे ठरू शकते हे नक्की.

# मुंबईत सुंदरी सिल्कचां साडी मेळा

**नोंद**

चेन्नईची प्रसिद्ध कापड कंपनी सुंदरी सिल्क, मुंबईकरांसाठी ७ आणि ८ सप्टेंबर २०२५ रोजी 'द साडीज मेळा' आयोजित करत आहे. हा दोन दिवसीय कार्यक्रम वांद्रे पश्चिम येथील कॅशे - द आर्ट अँड क्राफ्ट्स गॅलरी येथे सकाळी ११ ते रात्री ९ या वेळेत खुला असेल.या प्रदर्शनात भारतीय वस्त्रकलेचा समृद्ध वारसा अनुभवता येईल. येथे पारंपरिक कांजीवरम सिल्क साड्या, खास वधूसाठीचे पोशाख, तसेच कांची कॉटन, महेश्वरी आणि प्रिंटेड कॉटनचे विविध प्रकार उपलब्ध असतील. यासोबतच, ग्राहकांना आकर्षक तयार कपड्यांचे पोशाख आणि चांदीच्या 'अथिरष्टम' दागिन्यांची खास मालिका देखील पाहता येईल, ज्यामुळे हे प्रदर्शन भारतीय कलाकुसर आणि कारागिरीचा एक खराखुरा उत्सव ठरेल.

या प्रदर्शनाबद्दल बोलताना, सुंदरी सिल्कचे व्यवस्थापकीय भागीदार श्री. मनमोहन राम म्हणाले, "मुंबईने नेहमीच आम्हाला प्रेम आणि आदराने स्वीकारले आहे आणि 'द साडीज मेळा' पुन्हा एकदा शहरात आयोजित करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. हे प्रदर्शन फक्त कपड्यांचे प्रदर्शन नसून, आपल्या वारशाचा, कलेचा आणि हातमागावरील साड्यांच्या चिरंतन



आकर्षणाचा उत्सव आहे. आम्ही मुंबईतील आमच्या ग्राहकांशी पुन्हा जोडले जाण्यास आणि सुंदरी सिल्कच्या प्रत्येक निर्मितीमागील कथा त्यांच्यासोबत शेअर करण्यास उत्सुक आहोत."

आठ दशकांपेक्षा जास्त जुना वारसा असलेल्या सुंदरी सिल्कने आधुनिकतेला सामावून घेत भारतीय हातमागाचे सार जपले आहे. 'द साडीज मेळा' साडीप्रेमी, नववधू आणि वस्त्रकलेची आवड असणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत करत आहे.

# नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचा पटेल बेवरेजसोबत को प्यकिंग करार संपन्न

**दखल**

नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेडनेMपटेल बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेडच्या उत्पादनांचे उत्पादन, पुरवठा आणि सह-पॅकिंग त्यांच्या ट्रेड-नेम/ब्रँड नाव "NOCTRL" सह आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेडला पेये, सॉफ्ट ड्रिंक आणि एनर्जी ड्रिंक सेगमेंटच्या ग्राहक उत्पादन सेगमेंटमध्ये प्रवेश मिळेल ज्यामुळे कंपनीची उत्पादन श्रेणी वाढेल आणि पटेल बेव्हरेजेस प्रायव्हेट लिमिटेडला नवीन क्लायंट मिळतील आणि त्यांच्या उलाढालीत आणि क्षमता वापरात वाढ होईल.

कंपनीच्या उत्पादनांमध्ये विविध प्रकारच्या मखानांचा देखील समावेश आहे ज्यांना चांगली मागणी आहे. नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेडकडे त्यांच्या प्रीमियम अन्न उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करण्याची उत्पादन क्षमता आहे आणि तज्ञांकडून त्याचे निरीक्षण केले जाते.१९८९ मध्ये स्थापित, नाकोडा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज लिमिटेड हे प्रीमियम-गुणवत्तेच्या टुटी फ्रुटी (डाइस्ड चेलोरी), सुकामेवा,




धान्य आणि डाळींच्या उत्पादन आणि व्यापारात एक प्रमुख नाव आहे. सुरुवातीला मालकी हक्क म्हणून स्थापन झालेली ही कंपनी २०१३ मध्ये एका खाजगी मर्यादित कंपनीत विकसित झाली, ज्यामुळे वाढ आणि नावीन्यपूर्णतेचा एक नवीन अध्याय सुरू झाला. ३ दशकांच्या कौशल्यासह, कंपनीने अन्न उत्पादनांच्या विस्तृत श्रेणीच्या उत्पादन आणि वितरणात आणि मूल्यवर्धित ऑफरिंगमध्ये स्वतःला एक अग्रणी म्हणून स्थापित केले आहे. नागपूरमध्ये मुख्यालय असलेल्या कंपनीला देशभर कार्यक्षम आणि वेळेवर वितरण सुनिश्चित करून, अखंड लॉजिस्टिक फायद्यांचा फायदा होतो.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# भारताचा जन्मदर 50 वर्षांत आला निम्म्यावर

नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था

भारत स्वतंत्र झाल्यापासून दर १० वर्षांनी देशात जनगणना होते. करोनामुळे २०२१ साली ही जनगणना होऊ शकली नाही. मात्र, २०२७ मध्ये या जनगणनेचे आकडे जाहीर केले जाणार असल्याचं सांगितलं जात आहे. त्यातच जातीनिहाय गणनेचा मुद्दाही चर्चेत आला आहे. पण या सगळ्यात भारताच्या लोकसंख्येबाबत गेल्या ५० वर्षांत जे घडलं नाही, असे काही महत्त्वपूर्ण बदल झाल्याचं दिसून येत आहे. यात दोन महत्त्वाच्या निकषांचा समावेश करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या २०२३ च्या आकडेवारीच्या आधारे हे दोन निकष ठरवण्यात आले आहेत. त्यात भारतातील जन्मदर आणि भारतातील मृत्यूदर यांचा समावेश करण्यात आला आहे. त्याशिवाय, अर्भक मृत्यूदर, गर्भवती माता मृत्यूदर या निकषांचीही आकडेवारी देण्यात आली आहे. यातील जन्मदर व मृत्यूदर हे ५० वर्षांपूर्वीच्या प्रमाणाच्या तब्बल निम्म्यापर्यंत घटले आहेत.

जन्मदर म्हणजे प्रती १००० लोकसंख्येमागे होणारे जन्म. सरकारी आकडेवारीनुसार, २०१३ साली भारताचा जन्मदर २१.४ टक्के होता. २०२३ मध्ये हे प्रमाण १८.४ टक्के होतं. ५० वर्षांपूर्वी म्हणजे १९७१ साली भारतातील जन्मदर ३६.९ टक्के इतका प्रचंड होता. त्यामुळे गेल्या काही दशकांमध्ये देशातील जन्मदर मोठ्या प्रमाणावर घटल्याचं हे निदर्शक आहे. शहरी व ग्रामीण भागाचा विचार करता शहरांमध्ये जन्मदर जास्त प्रमाणात घटल्याचं दिसून आलं आहे. राज्यांचा विचार करता बिहारमध्ये सर्वाधिक २५.८ टक्के इतका जास्त जन्मदर असून अंदमान-निकोबारमध्ये सर्वात कमी १०.१ टक्के जन्मदर आहे.

मृत्यूदर म्हणजे दर १००० लोकांमागे मृत्यू होणाऱ्या व्यक्तींचं प्रमाण. २०१३ मध्ये भारतातील मृत्यूदर ७ टक्क्यांच्या घरात होता. २०२३ मध्ये हेच प्रमाण ६.४ टक्के झालं आहे. शहरी भागात ५.७ टक्के मृत्यूदर असून ग्रामीण भागात तो जवळपास १ टक्क्यांनी जास्त म्हणजेच ६.८ टक्के इतका आहे. राज्यांमध्ये छत्तीसगडमध्ये सर्वाधिक ८.३ टक्केतर चंदीगडमध्ये सर्वात कमी ४ टक्के मृत्यूदर आहे.


# जीएसटी कपातीमुळे प्रवासी वाहनांच्या मागणीला गती शक्य

नवी दिल्ली, दि. ५ वृत्तसंस्था

वस्तू व सेवाकर परिषदेने व्यापक सुधारणा करत देशातील सर्वाधिक खपाच्या चारचाकी तसेच मोटारसायकलवरील करांत कपात केली. त्यामुळे या क्षेत्रातील खरेदीला गती मिळून मध्यमवर्गीयांचे चार चाकी घेण्याचे स्वप्न आवाक्यात येईल.

वस्तू व सेवा करांमधील बदलांची घोषणा बुधवारी सरकारने केली. हे बदल २२ सप्टेंबरपासून अमलात येणार आहेत. दसरा-दिवाळीच्या तोंडावर लागू होणाऱ्या या निर्णयामुळे बाजारात यामुळे तेजी येईल अशी अपेक्षा आहे. नव्या दरांनुसार १२०० सीसी (पेट्रोल), १५०० सीसी (डिझेल) पेक्षा कमी क्षमतेच्या छोट्या मोटार तसेच चार मीटरपेक्षा कमी लांबीच्या वाहनांवर २८ वरून १८ टक्के कर असेल. त्यामुळे सर्वाधिक खपाची छोटी वाहने स्वस्त होतील.

वाहन निर्मिती क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, लहान वाहनांच्या किमती ४५,००० ते १ लाख रुपयांपर्यंत



कमी होण्याची शक्यता आहे. लहान प्रवासी वाहनांवरील जीएसटी १० टक्क्यांनी कमी झाला तर ग्राहकांसाठी किरकोळ विक्री किंमत ८.५-९ टक्क्यांनी कमी होईल, असे मारुती सुझुकी इंडियाचे अध्यक्ष आरसी भार्गव यांनी सांगितले. लहान वाहन श्रेणीत १२०० अश्वशक्तीपेक्षा कमी क्षमतेच्या पेट्रोल आणि १५०० अश्वशक्तीपेक्षा कमी क्षमतेच्या डिझेल वाहनांवरील जीएसटी कपातीने वाहनांच्या किमती १० टक्क्यांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. १० लाख रुपयांचे वाहन आता ९.१४ ते ९.५० लाख रुपयांना मिळण्याची शक्यता आहे. यामुळे वाहन खरेदीदारांचा ५० हजार रुपयांपर्यंत पैसे वाचू शकतील. तर १५ लाख रुपयांच्या डिझेल वाहनांची किंमत १३.५० ते १४ लाखांपर्यंत कमी होण्याची आशा आहे. यामुळे खरेदीदारांची सरासरी १ लाख रुपयांची बचत शक्य आहे. धाडसी आणि प्रगतिशील सुधारणा असून कर संरचना सुलभ होण्यास मदत होईल. वाहने अधिक परवडणारी बनवणे, विशेषतः कमी किमतीची वाहने आणखी स्वस्त होणार असल्याने पहिल्यांदाच वाहन खरेदी करणाऱ्यांचे स्वप्न साकार होण्यास मदत होईल, अशा भावना फेडरेशन ऑफ ऑटोमोबाइल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष सी.एस. विघ्नेश्वर यांनी व्यक्त केल्या. जीएसटी परिषदेच्या निर्णयानुसार, १,२०० सीसीपेक्षा कमी आणि ४,००० मिमीपेक्षा कमी लांबीच्या पेट्रोल, एलपीजी आणि सीएनजीवर चालणाऱ्या आणि १,५०० सीसीपर्यंत आणि ४,००० मिमीपर्यंत लांबीच्या डिझेल वाहनांवर पूर्वीच्या २८ ऐवजी १८ टक्के दराने कर आकारला जाईल.

महासागर NASHIK Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002. Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**